गणपती बाप्पा मोरया

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

**»» मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**»» पालघर कार्यालय**
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर,
विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

**»» नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर,
धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**»» वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | »» शुक्रवार, २९ ऑगस्ट २०२५ | »» वर्ष: १ »» अंक:८७ | »» पाने-८ | »» किमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## अपघातात चार जण ठार

**चंद्रपूर, दि. २८ प्रतिनिधी**

राजुरा तालुक्यातील कापणगाव येथे ट्रकने रिक्षाला जोरदार धडक दिल्याने रिक्षामधील चार जणांचा जागीच मृत्यू झाला तर तीन जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. प्रकाश मेश्राम (ऑटो चालक), रवींद्र बोबडे, शंकर पिपरे आणि वर्षा मांदाडे अशी मृतांची नावे आहेत. तर गंभीर जखमी असलेल्या तीन जणांना चंद्रपूर येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी पाठवण्यात आलं आहे. एक प्रवासी किरकोळ जखमी असून त्याच्यावर राजुरा येथे उपचार सुरू आहेत. ट्रक हा राजुऱ्याकडून खामोना-पाचगाव येथे जात होता, तर रिक्षा गडचांदूर येथून राजुऱ्याकडे येत होती. कापणगाव येथे सर्विस रोड वरून हायवे वर रिक्षा येताच विरुद्ध दिशेने येणाऱ्या ट्रकने रिक्षाला जोरदार धडक दिली. यामध्ये रिक्षा चालक प्रकाश मेश्राम याच्यासह तीन प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. याचवेळी इथून जात असलेले राजुर मतदारसंघाचे आमदार देवराव भोंगळे यांनी तातडीने अपघातग्रस्तांना मदत दिली.

# विरारमध्ये इमारतीचा भाग कोसळून 17 जणांचा मृत्यू

**वसई. दि. २८ प्रतिनिधी**

**वसई-विरार महानगरपालिका हद्दीतील नारंगी येथील रमाबाई अपार्टमेंट या चार मजली इमारतीचा मागील भाग इमारतीच्या शेजारीत असलेल्या काही चाळींवर मंगळवार, दि. २६ ऑगस्ट रोजी मध्यरात्री कोसळून दुर्घटना घडली. यादुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाला आहे. तर नऊ जण जखमी झाले आहेत. आणखी काही जण ढिगाऱ्याखाली असल्याची शंका असल्याने वसई विरार महापालिका अग्नीशमन दल आणि एनडीआरएफ दलाकडून गुरुवारी संध्याकाळपर्यंत शोधकार्य सुरुच होते. दुर्घटनाग्रस्त रमाबाई अपार्टमेंट अनधिकृत इमारत असून त्यात एकूण ५० सदनिका आहेत. त्यापैकी १२ सदनिकांचा मागील भाग मंगळवारी मध्यरात्री बारा वाजताच्या सुमारास अचानक कोसळला. इमारतीचा कोसळलेला भाग लागूनच असलेल्या काही चाळींवर कोसळल्याने १७ जणांचा मृत्यू झाला आहे. तर नऊ जण जखमी झाले आहेत. जखमीपैंकी तीन जणांवर उपचार करुन त्यांना घरी पाठवण्यात आले आहे.**

या ढिगाऱ्याखाली काही जण अडकल्याची शंका असल्याने महापालिका अग्नीशमन दल आणि एनडीआरएफकडून शोधकार्य सुरुच ठेवण्यात आले आहे. यापथकाने गुरुवारी दुपारी एका तरुणांना सुरक्षितपणे बाहेर काढले. दुर्घटनेनंतर गेले ३६ तास ढिगाऱ्याखाली अडकलेल्या तरुणाचे प्राण वाचले आहेत. गेल्या चाळीस तासाहून अधिक काळ शोधकार्य सुरुच आहे.



इमारत कोसळल्याची माहिती मिळताच जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड, महापालिका आयुक्त मनोजकुमार सुर्यवंशी, आमदार राजन नाईक, आमदार स्नेहा दुबे, माजी आमदार हितेंद्र ठाकूर, माजी आमदार क्षितीज ठाकूर यांनी लगेचच घटनास्थळी धाव घेत मदतकार्यात लक्ष घातले. २७ ऑगस्टच्या संध्याकाळी ६ वाजेपर्यंत १४ जणांना ढिगाऱ्यातून बाहेर काढण्यात आले. त्यापैकी ५ जणांचा मृत्यू झाला होता. तर गुरुवारी दुपारपर्यंत ढिगाऱ्याखालून बाहेर काढण्यात आलेल्यांमधील आणखी बारा जणांचा मृत्यू झाला. ९ जखमी सुखरुप असून त्यातील तीन जणांवर उपचार करुन त्यांना घरी पाठवण्यात आले आहे. तर तीन जखमींवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

दुर्घटनेनंतर अंधेरी येथून एन.डी.आर.एफ. ची अतिरिक्त तुकडीला पाचारण करण्यात आले होते. अग्निशमन दल, स्थानिक पोलीस व महानगरपालिका यंत्रणांच्या मदतीने ढिगारा हटवण्याचे काम गुरुवारी संध्याकाळ पर्यंत सुरू होते. सुरक्षेच्या दृष्टीने रमाबाई अपार्टमेंट शेजारील ४ मजली इमारत व आजूबाजूच्या चाळी रिकाम्या करून रहिवाशांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आले आहे. प्रभावित नागरिकांसाठी समाज मंदिरात तात्पुरते निवारा शिबीर उभारण्यात आले असून, जेवणाची तसेच आवश्यक सुविधाची व्यवस्था करण्यात आली आहे.

रमाबाई अपार्टमधील चौथा मजल्यावर आपल्या लाडक्या उत्कर्षा जोवील या एकवर्षीय मुलीचा वाढदिवस साजरा करत असलेल्या जोवील कुटुंबियांवर काळाने घाला घातला. संपूर्ण कुटुंब इमारतीच्या ढिगाऱ्याखाली दबले गेले होते. यादुर्घटनेत उत्कर्षा जोवील याचिमुरडीसह तिची आई आरोही जोवील (वय २४ वर्षे) हिचा ढिगाऱ्याखाली सापडून त्याच रात्री मृत्यू झाला होता. तर उत्कर्षाचे वडिल ओंकार जोवील (वय २६ वर्षे) यांचा मृतदेह गुरुवारी दुपारी ढिगाऱ्याखालून बाहेर काढण्यात आले.

यादुर्घटनेत दिनेश प्रकाश सकपाळ ( वय ४३ वर्षे), लक्ष्मण किसकू सिंग (वय २६ वर्षे), सुप्रिया निवळकर (वय ३८ वर्षे), अर्णव निवळकर (वय ११ वर्षे), पार्वती प्रकाश सकपाळ (वय ६० वर्षे), दिपेश सोनी ( वय ४१ वर्षे), सचिन निवळकर (लय ४० वर्षे), हरिश सिंग बिष्ट (वय ३४ वर्षे), दीपक सिंग बोहरा (वय २५ वर्षे), सोनाली तेजाम ( वय ४१ वर्षे), कशिस पवन सहेनी (वय १७ वर्षे), शुभांगी पवन सहेनी (लय ४० वर्षे), गोविंदसिंग रावत (वय २८ वर्षे) आणि रोहिणी चव्हाण (वय ३५ वर्षे) यांचा मृत्यू झाला आहे. प्रभाकर शिंदे, प्रमिला शिंदे, प्रेरणा शिंदे, प्रदीप कदम, जयश्री कदम, मिताली परमार, संजॉय सिंग, मंथन शिंदे आणि विशाखा जोवील हे जखमी झाले आहेत.

आमदार राजन नाईक यांनी यादुर्घटनेची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना त्वरीत कळवून मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत करण्याची मागणी केली होती. मुख्यमंत्री फडणवीस यांनी यादुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे. तसेच मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत जाहिर केली आहे. राष्ट्रपती दौप्रदी मुर्म यांनाही संवेदना व्यक्त केल्या आहेत.

दरम्यान, याप्रकरणी विरार पोलीस ठाण्यात बिल्डर आणि जमीन मालकाविरोधात सदोष मनुष्यवधासह एमआरटीपी अंतर्गत गुन्हा दाखल कण्यात आला आहे. बिल्डर नितल गोपीनाथ साने याला अटक करण्यात आली आहे.

## अग्राग्रलेख — खरीखरी

## ट्रम्पाभाराचे आभार

अमेरिकेचे उडाणटप्पू उनाडगिरी करणारे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेला पुन्हा महान बनवण्यासाठी दंड थोपटले आहेत. याचा सरळसरळ अर्थ असा आहे की सध्या अमेरिका अजिबात महान नाही, असे या मनमानी पद्धतीने उनाडगिरी करणाऱ्या ट्रम्पलाही वाटते. घिसाडघाइ करून राष्ट्राध्यक्ष बनलेले या ट्रम्प यांनीच २७ तारखेपासून २५% टॅरीफ वाढ केली आहे. भारत रशियाकडून तेल खरेदी करतो म्हणून ही दरवाढ आहे. खरे तर अमेरिकेच्या नाकावर टिच्चून भारतापेक्षा जास्त किंबहुना जवळपास दुप्पट तेल चीन रशियाकडून खरेदी करीत आहे. पण अमेरिकेला महान बनवणाऱ्या या उनाड ट्रम्पने चीनला हात लावलेला नाही. याचा अर्थ भारताला एक न्याय आणि चीनला दुसरा न्याय अशी पद्धत ट्रम्प याने अवलंबलेली आहे. याचा शांतपणे अर्थ घ्यायचा झाला तर, आली लहर आणि केला कहर असे ट्रम्प याचे वागणे आहे. चीनने अमेरिकेची दादागिरी बंद करण्यासाठी त्यांच्याकडील रेअर अर्थ मटेरियल अमेरिकेला पाठवणे बंद केल्याने अमेरिकेत हाहाकार होऊ शकतो. तसेच अमेरिकेमधील नागरिकांना आता यापुढे भारताच्या वस्तू खरेदी करायच्या असतील तर त्यांच्यावर भुर्दंड पडणार आहे. यामुळे ट्रम्प यांना केवळ त्यांच्या विरोधी असलेल्या डेमोक्रॅटिक पक्षाकडूनच नाही तर त्यांच्या स्वतःच्या रिपब्लिकन पक्षातूनही त्यांच्या जवळच्या आणि आपल्या लोकांच्याही प्रचंड विरोधाचा थेट सामना करावा लागत आहे. ट्रम्प यांचे भूतपूर्व मित्र असलेल्या नरेंद्र मोदी यांच्याशी ट्रम्प यांनी उभा दावा मांडला आहे की काय हेच समजेनासे झालेले आहे. मोदी यांनी बायडन आणि कमला हॅरीस सत्तेवर असताना अमेरिकेचा दौरा केला होता. त्यावेळी मोदींना भेटण्याचे निमंत्रण पाठवूनही मोदी त्यांच्याकडे फिरकले नव्हते. तेव्हापासून मोदी यांचा सतत अपमान करण्याचा निर्धार ट्रम्प यांनी केलेला असावा कारण त्यांनी म्हणजे ट्रम्प यांनी पुन्हा निवडून आल्यावर आपल्या शपथ ग्रहण समारंभाचे मोदींना निमंत्रण दिलेच नाही. त्यानंतर मोदी आल्यावर थेट पत्रकारांसमोर ट्रम्पनेच अर्वाच्य भाषा वापरली. भारताने पाकविरुद्धचे युद्ध २४ तासामध्ये थांबवावे असे आपण म्हटले, पण मोदी यांनी पाच तासातच युद्ध थांबवले. अशा प्रकारे भारतीय पंतप्रधानांचा म्हणजेच भारताचा घोर अपराध आणि अपमान ट्रम्प यांनीच केला असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. अमेरिकेने वाढीव टेरिफ लावण्यामुळे हिरे, सोने-चांदीचे दागिने यांच्या बाजारपेठांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. भारतातून मोठ्या प्रमाणावर वस्त्रे निर्यात होतात. त्यावरही मोठा बोजा पडल्यामुळे भारतात मोठ्या प्रमाणावर नोकर कपात होऊ शकते. सध्याच्या घडीला भारतासारखी मोठी बाजारपेठ जगात दुसरी नाही विशेष म्हणजे भारत आणि अमेरिका लोकशाहीवादी देश आहेत अशा स्थितीमध्येही ट्रम्प मनमानी करण्यास मागे पुढे पाहत नाही. भारताने अमेरिकेच्या दादागिरी विरुद्ध कोणत्याही स्थितीत तडजोड करणार नाही हे स्पष्ट केलेले आहे. ट्रम्प याच्या मनमानी धोरणानुसार अमेरिकेला स्वतःचा शेतमाल भारतातील बाजारात पाठवायचा आहे. अमेरिकेच्या जीएम सोयाबीन, जीएम मका, जीएम गहू भारतात येऊ द्यावा असे ट्रम्प यांचे म्हणणे आहे. भारताने त्याशिवाय दुग्धजन्य पदार्थ आणि पोल्ट्री उत्पादने यावरही आयात कर कमी करावा असे त्यांचे म्हणणे आहे. या वेड्या तुघलकाला भारतातील शेतकऱ्यांची चिंता करण्याची अजिबात गरज वाटत नाही. हा ट्रम्प म्हणजे उलट्या काळजाचा उनाड उद्योगपती आहे त्याला फक्त अमेरिकेचा फायदा करून द्यायचा आहे. तेथील शेतकऱ्यांचा फायदा करून द्यायचा आहे मात्र भारतातील शेतकऱ्यांच्या समस्यांशी त्याला काही देणे घेणे नाही. आपला भारत देश मात्र याबाबतीत ट्रम्प याला कोणतीही सवलत द्यायला तयार नाही. भारतात अमेरिकेच्या मालावर ३९ टक्के कर आकारला जातो. भारत हा जगातील सर्वाधिक कस्टम ड्युटी लावणारा देश आहे, असे ट्रम्प म्हणतो. त्यामुळे आता ट्रम्प सारख्या खडकावर डोके आपटून स्वतःचे डोके फोडून घेण्यापेक्षा आपल्याला वेगळा मार्ग स्वीकारावा लागेल. आपण कच्च्या मालाची जी निर्यात करतो त्या एवजी प्रक्रिया उद्योगात वाढ करून जगाच्या बाजारात आपल्याला उभे राहावे लागेल. काही दिवस आपल्याला नक्कीच त्रास होइल. स्वतःला सिद्ध करावे लागेल पण ते सहन केले की भविष्यात वेगळा मार्ग स्वीकारून देशात नवनवे उद्योग आणि नवनवीन उद्योग केंद्र यांचे वातावरण तयार होण्यास मदत होइल. हेच महत्त्वाचे ठरणार आहे, खरे तर या उनाड ट्रम्पने आपल्याला आत्मनिर्भर बनण्यासाठी प्रोत्साहित केले आहे, असेच आपण समजले पाहिजे. कारण संकट ही एक संधी आहे आणि म्हणूनच या ट्रम्पचे कोटी कोटी आभार!

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# मुंबईत भगवे वादळ



**मुंबई, दि. २८ प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील हे मुंबईतील आझाद मैदानाकडे निघाले आहेत. तेथे शुक्रवारी आंदोलन करणार आहे. आंदोलनासाठी मराठवाड्यातून लाखो मराठा बांधव मुंबईच्या दिशेने निघाले आहेत. त्यांच्या या आंदोलनासाठी एका दिवसाची परवानगी देण्यात आली आहे. यावरून जरांगे पाटलांनी आपली नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी सरकारला परवानगी देण्याचे अधिकार असतानाही तसे झाले नाही. फक्त एक दिवसाची परवानगी दिली आहे. हे मराठ्यांची चेष्टा असल्याचा आरोप जरांगे यांनी केला आहे.

जरांगे पाटील यांनी सरकारच्या अखत्यारीत सगळ्या गोष्टी असतानाही त्या टाळल्या जात आहेत. परवानगी देतानाही फक्त एक दिवसांची परवानगी दिलीय. ही मराठ्यांची चेष्टाच आहे. त्यामुळे आतातरी समाजाचे शहाणे व्हावे. यांच्या मागे जाऊन आजपर्यंत काय मिळवले याचाही विचार करावा. नारायणगावात लाखो लोक एकवटले आहेत. आता पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि विदर्भासहीत मुंबईही यात उतरत आहे. त्यामुळे अजून वेळ गेलेली नाही.

सध्या सरकारने काही मर्यादा घातली असली तरीही पुन्हा विचार करावा. तर जोपर्यंत सगळ्या मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत उपोषण करण्यावर ठाम आहे. तसेच आता ५ हजारांची मर्यादा दिली आहे. पण लोक जास्त जमले म्हणून लाठी काठी उगारू नका. मराठ्यांना त्रास देवू नका, अशी मागणी केली आहे.

## मराठा आंदोलकाचा हार्ट अटॅकने मृत्यू

जुन्नरजवळ मराठा आंदोलकाचा हार्ट अटॅकने मृत्यू झाला आहे. सतीश देशमुख असं मृत व्यक्तीचं नाव असून मुंबईतील मनोज जरांगेंच्या उपोषणापूर्वीच ही घटना घडल्याने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

सतीश देशमुखांच्या मृत्यूनंतर मनोज जरांगे यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मला आता माहिती कळाली की आमचा देशमुख नावाचा बांधव प्रवासात असताना त्यांचा दम छाटला आणि त्यांना अटॅक आला. मी याबाबत अजूनही माहिती घेत आहे. परंतु ही घटना अत्यंत दुःखद आहे. याला जबाबदार फडणवीस साहेब आहेत. तुम्ही आता जर का आम्हाला आरक्षण दिले तर आमचे बळी जाणार नाहीत. आमचे आणखी दोन बळी घेतले आहेत. लातूरला परवाच्या दिवशी अशीच घटना घडली आहे. आज देखील अशीच घटना घडली आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

## ईडब्ल्यूएसची मानसिकता तयार झालेली नाही - मुख्यमंत्री

दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सगळ्याबाबत सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे. माझी मराठा आणि ओबीसी समाजाला विनंती आहे. शासन दोन्ही समाजाच्या हिताचा विचार करेल. कुठल्याही समाजाला दुसऱ्या समाजासमोर आणण्याचा शासनाचा हेतू नाही. कुणावर अन्याय करुन कुणाला देण्याचा प्रश्न नाही, दोघांचेही प्रश्न आम्ही सोडवणार आहोत. ओबीसी समाजानेही हे लक्षात ठेवावं की आम्ही त्यांच्यावर अन्याय होऊ देणार नाही. तसंच मराठा समाजाचे सगळे आम्हीच सोडवले आहेत. सांगावं इतर कुणी सोडवलेत? मी मुख्यमंत्री असताना आणि एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना प्रश्न सुटले आणि आम्हीच सोडवणार आहोत. असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ईडब्ल्यूएस आल्यानंतर बऱ्यापैकी सगळ्यांचा प्रश्न सुटला आहे. पण आपल्याकडे ईडब्ल्यूएसची मानसिकता तयार झालेली नाही त्यामुळे काही प्रश्न गुंतागुंतीचे आहेत. पण आपण तोही प्रश्न सोडवला आहे. आपण आरक्षण दिलेलं आहे आणि कोर्टात ते टिकलं आहे. लोकशाहीमध्ये आपले मुद्दे मांडण्याचा, आंदोलन करण्याचा अधिकार आहे. कुठलंही आंदोलन लोकशाही पद्धतीने चाललं आहे तोपर्यंत आम्हाला काही अडचण नाही. आम्ही चर्चेच्या माध्यमातूनच प्रश्न सोडवू. एक गोष्ट नक्की आहे की मराठा समाजाला आरक्षण दिलं आहे. आता ओबीसीमध्ये आरक्षण द्या म्हणत आहेत. ओबीसीमध्ये ३५० जाती आहेत, मराठा समाजाला १० टक्के वेगळं आरक्षण दिलं आहे. ठीक आहे तरीही गोष्टी समजून घेऊ. कुठलंही आंदोलन लोकशाहीच्या चौकटीच्या बाहेर जाऊ नये ही आमची अपेक्षा आहे. नियम आणि निकषांचे पालन करून आंदोलन केले तर आमचे काही म्हणणे नाही.

## ब्राह्मण असल्यामुळे फडणवीसांचा तिरस्कार, ते जर मराठा असते तर... - चंद्रशेखर बावनकुळे

**नागपूर, दि. २८ प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. देवेंद्र फडणवीसांनी आमच्या वेदना समजून घेणे गरजेचे आहे. देवेंद्र फडणवीस मुंबईत कोणत्याच आंदोलकांना आझाद मैदानावर जाण्यापासून थांबवणार नाहीत आणि गरीबांच्या वेदनेचा सन्मान करतील अशी आम्हाला आशा आहे. पण आंदोलनासाठी एक दिवसाची परवानगी ही मराठ्यांची चेष्टा आहे, अशी टीका जरांगे यांनी केली.

आंदोलनाच्य दिवसापासून जरांगे पाटील फडणवीस यांच्यावर टीका करत आहेत. त्यावर भाजप नेते आणि मसहूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी फडणवीसांची पाठराखण करत जरांगेंचा समाचार घेतला आहे. बावनकुळे म्हणाले की, महाराष्ट्रात आजपर्यंत मराठा समाजाचे अनेक नेते झाले.

अनेक मुख्यमंत्रीही झाले. मात्र, मराठा समाजाला कुणीही आरक्षण देऊ शकले नाही. मराठा समाजाला पहिल्यांदा आरक्षण देण्याचे काम हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. त्यानंतर एकनाथ शिंदे यांनीही आरक्षण दिले. आजही मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी फडणवीस सरकार सकारात्मकच आहे. मात्र, फडणवीस यांच्यावर जरांगे पाटील हे वारंवार टीका करत आहेत. केवळ देवेंद्र फडणवीस ब्राह्मण समाजाचे आहेत म्हणून त्यांच्यावर ही टीका होत आहे का?, ते मराठा असते तर तुम्ही कशी टीका केली असती का?, असा सवाल चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला.

बावनकुळे म्हणाले की, सध्या महाराष्ट्रामध्ये गणपतीसारखा मोठा उत्सव सुरू आहे. प्रत्येकाच्या घरी गणपतीची प्रतिष्ठापना झाली आहे. असे असताना या काळात जरांगेंनी मोर्चा काढणे हे बरोबर नाही. सरकारकडे विविध मागण्या करणे, त्यासाठी मोर्चा काढण्याला कोणाचाही विरोध नाही. मात्र मोर्च्याची वेळ बदलता आली असती. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी भाजप सरकारने अनेकदा प्रयत्न केले आहेत. त्यांच्या आरक्षणासाठी आमचे पूर्ण समर्थन आहे. मात्र मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसी किंवा इतर समाजाचे आरक्षणाला कुठेही धक्का लागायला नको ही भाजपची भूमिका आहे.

देवेंद्र फडणवीस यांचे सरकार असताना २०१४ ते २०१९ या काळातही मराठा समाजाला आरक्षण देण्यात आले होते. त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला आरक्षण दिले. आजही सरकारची भूमिका मराठा समाजाचे आरक्षण देण्याच्या बाजूनेच आहे. मात्र हे आरक्षण देताना इतर कोणत्याही समाजाचे आरक्षणाला धक्का लागू देणार नाही असे बावनकुळे म्हणाले.

## जरांगे पाटलांच्या एका हाकेतून मुंबईकडे नेत्यांची रांग!

**मुंबई, दि. २८ प्रतिनिधी**

मराठा समाजाच्या हक्कासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा मैदानात उतरले आहेत. “ही शेवटची लढाई आहे, आमदार-खासदारांनीही मैदानात यावे” अशा आक्रमक शब्दांत दिलेल्या त्यांच्या हाकेला प्रतिसाद मिळू लागला आहे.

“मी 288 आमदारांना फोन केला आहे, बघतो कोण कोण येतंय,” या इशाऱ्यानंतर नेत्यांची पावले थेट जरांगे पाटलांच्या मोर्चाकडे वळली. परभणीचे खासदार संजय जाधव यांच्यापासून ते बीडचे आमदार संदीप क्षीरसागरपर्यंत, अनेकांनी ‘चलो मुंबई’ ची घोषणा करत प्रत्यक्ष सहभाग जाहीर केला. गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित, माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके, तसेच खासदार बजरंग सोनवणे यांचा पाठिंबा मोर्चाला नवा वेग देतो आहे.

सरकारने दिलेला शब्द पाळावा, अशी मागणी खासदार ओम राजेनिंबाळकर यांनी केली, तर आमदार कैलास पाटील यांनी थेट “मी आंदोलनाला येतोय, तुम्हीही या” असे आवाहन केले. एकनाथ शिंदे गट व अजित पवार गटातील आमदार-खासदारांनी देखील या आंदोलनात उघड पाठिंबा जाहीर करून महायुतीला अडचणीत टाकले आहे. काँग्रेसही मागे नाही. खासदार कल्याण काळे यांनी पैठण येथे भरपावसात जरांगे पाटलांची भेट घेऊन साथ जाहीर केली. जिल्हा-तालुका पातळीवरील काँग्रेस नेते देखील मोठ्या संख्येने मोर्चात उतरले आहेत.

आता सगळ्यांचे लक्ष मुंबईकडे लागले आहे. जरांगे पाटलांचा आवाज आणि नेत्यांची रांग पुढचा राजकीय विस्फोट किती मोठा होणार?

## 3 सप्टेंबरपर्यंत जोरदार पावसाचा इशारा
## सात राज्यांना एलर्ट

**नवी दिल्ली, दि. २८ वृत्तसंस्था**

मागच्या आठवड्यात झालेल्या पावसानंतर काही दिवसांच्या विश्रांतीनंतर आता परत एकदा भारतीय हवामान विभागाने मोठा इशारा दिलाय. थेट मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आलाय. यंदा राज्यात मॉन्सून लवकर दाखल झाला. सुरूवातीला सांगितले गेले की, ऑगस्ट महिन्यात पाऊस कमी असणार आहे. मात्र, प्रत्यक्षात जोरदार पाऊस होताना दिसतोय. आता गणपती आगमनानंतर पावसाचा जोर वाढताना दिसत आहे. आज भारतीय हवामान विभागाकडून मराठवाडा, कोकण, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्र पावसाचा इशारा देण्यात आला आहे. यासोबतच सकाळीच मुंबईत जोरदार पावसाला सुरूवात झाली आहे.

देशात पावसाचा जोर वाढताना दिसत आहे. छत्तीसगढ, आंध्रप्रदेश, गोवा, महाराष्ट्र, ओडिसा भागात जोरदार पाऊस होणार असल्याचा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. यासोबतच आसाम, मेघालय, राजस्थान, गुजरात, हरियाणा, चंदीगढ, दिल्ली, हिमाचल प्रदेश, कर्नाटक, पंजाब, तामिळनाडू या भागात पाऊस होईल. 28 ऑगस्ट ते 3 सप्टेंबरपर्यंत जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्याने राज्यामध्ये पावसाला पोषक वातावरण निर्माण झालंय. घाटमाथ्यावर जोरदार पावसाचा अंदाज आहे. मराठवाडा, कोकण आणि विदर्भात ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. यासोबतच विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याची शक्यता आहे. घाटमाथा, पालघर, कोकण. रायगड, रत्नागरी, नाशिक, सिंधुदुर्ग, जालना, परभणी, भंडारा, नांदेड, गोदिंया गडचिरोली, चंद्रपूर या भागात जोरदार पाऊस होणार आहे.

नाशिकमध्ये यंदा गणेशोत्सवावर पावसाचे सावट बघायला मिळतंय. उद्या आणि परवा नाशिकमध्ये येलो अलर्ट जारी करण्यात आलाय. नाशिकला पाणीपुरवठा करणारे गंगापूर धरण 98% टक्के भरले आहे. जिल्ह्यातले बारा धरण 100 टक्के भरले. धरण पाणलोट क्षेत्रात आठ दिवसांपासून पाऊस सुरू आहे. गंगापूर धरणातून 3025 क्यूसेक् पाण्याचा विसर्ग करण्यात आलाय. नदीकाठच्या रहिवाशांना सतर्कतेचा इशारा. परळी आठ दिवसाच्या विश्रांतीनंतर रात्रीपासून परळी तालुक्यात पावसाला जोरदार सुरुवात झाली आहे. रिमझिम पावसामुळे रबीच्या पिकांना फायदा होणार आहे आणि नागरिकांनाही उकड्यापासून चांगला दिलासा मिळाला आहे.

## मुंबईत जोरदार बॅनरबाजी; भाजपचे प्रत्युत्तर




**मुंबई, दि. २८ प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या आंदोलनाने रंग घेत असताना, मुंबईत नवा राजकीय स्फोट घडला आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या मोर्चाला थेट उत्तर देण्यासाठी भाजपने रस्त्यावर बॅनर युद्ध छेडले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समर्थनार्थ शहरात जागोजागी लागलेले भव्य फलक आता चर्चेचा ठराविक विषय ठरले आहेत.

"इतिहास हा कर्तृत्ववाला लक्षात ठेवतो", "मराठा समाजाला पहिल्यांदा आरक्षण देणारे देवेंद्र फडणवीस", "उच्च न्यायालयात आरक्षण टिकवणारे देवेंद्र फडणवीस" अशी घोषवाक्ये बॅनरवर ठळकपणे झळकत आहेत. या बॅनरबाजीमुळे राजकीय वातावरण अधिक तापले असून, मराठा आरक्षणाच्या चळवळीला थेट फडणवीस यांच्या कर्तृत्वाचा प्रत्युत्तरात्मक आधार दिला जात असल्याचे स्पष्ट होते.

भाजप आमदार प्रविण दरेकर, प्रसाद लाड, निरंजन डावखरे आणि नरेंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही बॅनरबाजी करण्यात आली. शहरातील महत्त्वाच्या चौकात लागलेल्या या पोस्टर्समुळे आता राजकीय पातळीवर नवे समीकरण उभे राहणार का, हा प्रश्न अधिकच गडद होत आहे. मराठा समाजाच्या भावना उफाळून आल्या असतानाच भाजपने अशा पद्धतीने आपली बाजू मांडण्याचा मार्ग स्वीकारला आहे. त्यामुळे संघर्षाचा रंग रस्त्यावर दिसू लागला असून, पुढील काही दिवसांत हे बॅनर युद्ध किती तीव्र होणार याकडे सगळ्यांचे डोळे लागले आहेत.

## अरुण गवळीला सुप्रीम कोर्टाकडून १८ वर्षांनी जामीन मंजूर

**नवी दिल्ली, दि. २८ वृत्तसंस्था**

मुंबईतील शिवसेना नगरसेवक कमलाकर जामसांडेकर यांच्या हत्येप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा झालेल्या अरुण गवळीला सुप्रीम कोर्टाने गुरुवारी जामीन मंजूर केला. कोर्टाकडून दिलासा मिळाल्याने तब्बल १८ वर्षानंतर गवळीची जामिनावर सुटका होणार आहे.

मार्च २००७ मध्ये मुंबईतील घाटकोपरमधील शिवसेनेचे नगरसेवक कमलाकर जामसांडेकर यांची राहत्या घरात घुसून हत्या करण्यात आली होती. निवासस्थानी टीव्ही बघत बसलेल्या कमलाकर यांच्यावर दुचाकीवरून आलेल्या हल्लेखोरांनी गोळ्या झाडल्या होत्या. पोलीस तपासात या हत्येची सुपारी अरुण गवळीने दिल्याचे उघड झाल्यानंतर मे २००८ मध्ये गँगस्टर गवळीला अटक करण्यात आली. मुंबईतील न्यायालयाने अरुण गवळीला याप्रकरणात जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. मुंबई उच्च न्यायालयानेही हा निकाल कायम ठेवल्याने गवळीने सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली होती.गुरुवारी सुप्रीम कोर्टात गवळींच्या याचिकेवर सुनावणी झाली. अरुण गवळी व इतर आरोपींवर केलेली कार्यवाही ही नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाशी विसंगत असून अन्यायकारक असल्याचा युक्तिवाद गवळीच्या वकिलांनी केला. तसंच मकोका कायद्याअंतर्गत केलेली कार्यवाहीदेखील बेकायदेशीर असल्याचा दावा गवळीच्या वतीने करण्यात आला.

# तांदूळ बदलून मागणाऱ्या गोदाम व्यवस्थापकांना तात्काळ निलंबित करा - किशोर कऱ्हाडे यांची मागणी

**देसाईगंज, दि. २८ प्रतिनिधी**

अतिदुर्गम, अतिसंवेदनशील गडचिरोली जिल्ह्यातील सिएमआर तांदूळ जमा करण्याकरीता किरायाने घेण्यात आलेल्या देसाईगंज येथील आकाश अग्रवाल गोडाऊन मधुन गुणनियंत्रण अधिकाऱ्याने तपासणी करून स्वीकृत केलेला तांदुळ जिल्ह्यातील तीन शासकीय गोदामात सार्वजनिक वितरणाकरीता पाठविण्यात आला असता तो मानवी खाण्यास अयोग्य असल्याचे गोदाम व्यवस्थापकाच्या तपासणीत आढळून आले. दरम्यान गोदाम व्यवस्थापकाने संबंधित राईसमिलर्स व मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ स्वीकृत करणाऱ्या गुणनियंत्रण अधिकारी यांचे विरूद्ध नियमानुसार योग्य कारवाई करण्यासंदर्भात प्रकरण वरिष्ठांकडे पाठवणे आवश्यक असतांना निकृष्ट तांदूळ बदलून मागण्याचे कोणतेही अधिकार नसतांना परस्पर संबंधीत राईसमिलर्सना तांदूळ बदलून मागीतले. एकुणच प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता संगनमतातुन राईसमिलर्ससह गुणनियंत्रण अधिकारी यांना वाचविण्याचा प्रयत्न करून कर्तव्यात हयगय केल्या प्रकरणी जबाबदार धरून संबंधित गोदाम व्यवस्थापकांना तात्काळ निलंबित करावी मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे.

केलेल्या तक्रारीत कऱ्हाडे यांनी म्हटले आहे की गडचिरोली जिल्ह्याच्या देसाईगंज तालुक्यातील खाजगी गोडाऊन मालकांचे सिएमआर तांदूळ जमा करण्याकरीता दोन गोडाऊन किरायाने घेण्यात आले आहेत. यात आकाश अग्रवाल गोडाऊन नैनपुर (वडसा) व पंकज मोटवानी गोडाऊन कुरुड यांचा समावेश आहे. शासन नियमानुसार या गोदामात सिएमआर तांदुळ जमा करतांना पुरवठा विभागाचे गुणनियंत्रण अधिकारी यांनी सदर तांदळाची रासायनिक तसेच शारिरीक तपासणी करून सदर तांदूळ गुणवत्तापूर्ण असल्यासच स्वीकृत करणे अनिवार्य होते.मात्र देसाईगंज येथील आकाश अग्रवाल गोडाऊन मध्ये स्वीकृत करण्यात आलेले सिएमआर तांदूळ सार्वजनिक वितरणाकरीता जिल्ह्यातील अहेरी,मुलचेरा येथील दोन शासकीय गोडाऊन व गडचिरोली येथील शासकीय गोदामात पाठविण्यात आले असता सदर तांदूळ तेथील गोदाम व्यवस्थापकांनी ताब्यात घेऊन सदर तांदूळ मानवी खाण्यास अयोग्य असल्याचे आढळून आल्याने या संदर्भात वरिष्ठांना माहिती देऊन वरिष्ठांच्या आदेशानुसार कारवाई करणे अपेक्षित होते. मात्र येथील गोदाम व्यवस्थापकांनी आपल्या अधिकार क्षेत्रा बाहेर जाऊन कोणतेही अधिकार नसतांना सदर तांदूळ बदलून देण्यासंदर्भात राईसमिलर्सना परस्पर पत्र दिल्याची गंभीर बाब समोर आली आहे.

अहेरी, मुलचेरा व गडचिरोली येथील गोदाम व्यवस्थापकांवर कर्तव्यात कसूर केल्या प्रकरणी जबाबदार धरून तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याची मागणी कऱ्हाडे यांनी राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे.या संदर्भात काय कारवाई केली जाते,याकडे येथील नागरीकांचे लक्ष लागून आहे.

# || गणपती माझा नाचत आला...||

गणपती बाप्पा आले घरा घराचे मंदिर झाले बघा... मोरयाऽ मोरयाऽ गणपति बाप्पा मोरया, गणपती माझा नाचत आला, आला रे आला गणपती आलाऽ.. असा जयजयकार करून आपण आज गणपतीची स्थापना करत आहोत. गणेश उत्सव हा भारतीय संस्कृतीतील एक महत्त्वाचा आणि लोकप्रिय असा सण आहे. दरवर्षी भाद्रपद महिन्यात शुक्ल चतुर्थीला गणेश उत्सवाची सुरुवात होते. या दिवशी श्री गणेशाची प्रतिष्ठापना करून दहा दिवसांच्या उत्सवाला प्रारंभ होतो. हा उत्सव केवळ धार्मिक उत्सव नसून सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यावरणीय, आर्थिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाचा आहे. गणेशोत्सव हा सर्वप्रथम धार्मिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा आहे. भगवान श्री गणेश हे बुद्धी, ज्ञान, समृद्धी आणि संकट अडथळे दूर करणारे देव मानले जातात. विघ्नहर्ता म्हणतात प्रत्येक शुभ कार्याच्या प्रारंभी गणपतीची पूजा केली जाते.

गणेश चतुर्थीच्या दिवशी गणेशाची मूर्ती घरी किंवा सार्वजनिक ठिकाणी स्थापित करून विधिपूर्वक पूजा केली जाते. दहा दिवसांच्या उत्सवामध्ये रोज आरती, भक्तिगीते, स्तोत्रपठण आणि प्रसाद यांचा समावेश असतो. अनेक घरांमध्ये मंडळामध्ये पेढ्याचा मोदक तसेच उकडीचे मोदक आणि ओल्या नारळाचे मोदक करून गणपतीला २१, १०१, १००१ मोदकांचा नैवेद्य दाखवला जातो. अनेक मंडळांमध्ये गणपती अथर्वशीर्ष चे सामूहिक पठण होत असते पुण्यामध्ये तर दगडूशेठ हलवाई गणपतीसमोर हजारो स्त्रिया ऋषिपंचमीच्या दिवशी सामूहिक अथर्वशीर्ष पठण करत असतात. श्री गणेशाच्या या पूजेमुळे लोकांमध्ये श्रद्धा, भक्ति आणि समर्पणाची भावना जागृत होते. गजानना श्री गणराया आधी वंदू तुज मोरया... दाता तू गणपती गजानना... गणराज रंगी नाचतो नाचतो... चिकमोत्याची माळ, होती ग तीस तोळ्याची ग... अशी गणपतीची सुंदर सुंदर गाणे या काळात आपल्या कानावर पडतात. गणेश उत्सवाच्या निमित्ताने समाजात एकात्मता आणि बंधुभाव वाढतो. या उत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी लोक एकत्र येतात, एकमेकांना सहकार्य करतात आणि सामाजिक बंधनं मजबूत करतात. सार्वजनिक गणेशोत्सवांमध्ये मंडळं, समाजाचे विविध घटक एकत्र येऊन गणेश मूर्तींची स्थापना करतात. एकत्रितपणे होणाऱ्या या उत्सवामुळे समाजात एकात्मता आणि आपुलकीची भावना वाढीस लागते. लहान-मोठे, गरीब-श्रीमंत, सर्वजण या उत्सवात एकत्र सहभागी होतात आणि समानतेचा संदेश देतात. धर्मिक महत्त्वासोबतच सांस्कृतिक महत्त्वही तेवढेच आहे. गणेश उत्सव हा सांस्कृतिक महोत्सव म्हणूनही महत्त्वाचा आहे. या उत्सवाच्या दरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य, गायन, नाटकं आणि स्पर्धा आयोजित केल्या जातात. निरनिराळे देखावे करून आरास केली जाते. या कार्यक्रमांमधून भारतीय संस्कृतीचे विविध पैलू, कला आणि परंपरांचा प्रचार आणि प्रसार होतो. अनेक ठिकाणी शाळा, महाविद्यालयं आणि सांस्कृतिक संस्थांमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं. यामुळे नवोदित कलाकारांना आपली कला सादर करण्याची संधी मिळते आणि संस्कृतीचे संवर्धन होते. हे सर्व साजरे करत असताना पर्यावरणाचा समतोल राखून प्रदूषण निर्माण होणार नाही याबाबतीतही लक्ष देणे तेवढेच आवश्यक आहे. गणेश उत्सवाच्या काळात पर्यावरणाशी संबंधित समस्या देखील वाढत आहेत. आरोग्याला घातक रंगाचा वापर, घातक प्लास्टिक प्लास्टिकची फुले,निर्माल्य, परंतु सध्या पर्यावरण संरक्षणाची जागरूकता वाढली आहे आणि यासाठी अनेक उपाययोजना केल्या जात आहेत. गणेश मूर्तींमध्ये प्लास्टर ऑफ पॅरिसऐवजी मातीच्या मूर्तींचा वापर, नद्यांमधील प्रदूषण टाळण्यासाठी कृत्रिम विसर्जन तलावांचा वापर, नैसर्गिक रंगांचं महत्त्व आणि गणेशोत्सवाच्या काळात प्लास्टिकमुक्त वातावरणाची गरज यांसारख्या मुद्द्यांवर चर्चा केली जाते. त्यामुळे गणेश उत्सव पर्यावरणपूरक साजरा करण्याचं महत्त्व लोकांमध्ये रुजत आहे. तरीही अजून सुधारण्याला भरपूर वाव आहे असे म्हणावे लागेल. गणेश उत्सवाच्या काळात लोककला आणि हस्तकलांच्या प्रचाराचा एक महत्त्वाचा कालखंड असतो. गणेशाच्या मूर्ती तयार करणारे कलाकार, पारंपारिक शिल्पकला, चित्रकला आणि विविध हस्तकलांचा विकास होतो. गणेश मूर्तींमध्ये विविध पारंपारिक पद्धतींनी केलेली कारागिरी पाहायला मिळते. यामुळे लोककला



आणि हस्तकला यांचा विकास होऊन त्या कलेत गुंतलेल्या कारागिरांना रोजगाराची संधी मिळते. आणि लोककला आणि हस्तकला यांचेही संवर्धन होत असल्याचे आपणास दिसते. गणेश उत्सवाच्या काळात महिला देखील विविध कार्यक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी होतात. महिला मंडळं उत्सवाचं आयोजन, सांस्कृतिक कार्यक्रम, रांगोळी स्पर्धा, पाककला स्पर्धा इत्यादीतून आपले कौशल्य दाखवतात. यामुळे महिलांना समाजात सन्मान मिळतो आणि त्यांचं सक्षमीकरण होतं. सार्वजनिक गणेशोत्सवांमध्येही महिलांना महत्त्वाची भूमिका दिली जाते, ज्यामुळे महिलांच्या सहभागाचं महत्त्व अधोरेखित होतं. आता गणपतीच्या मिरवणुकीमध्ये मुलींच्या ढोल ताशा पथकाचा समावेश असतो ही खूप उल्लेखनीय बाब आहे त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास ही वाढतो.खंबीरपणा येतो. गणेश उत्सवाचा आर्थिक परिणामही महत्त्वाचा आहे. या उत्सवाच्या काळात बाजारपेठेत विविध वस्तूंची मागणी वाढते. गणेश मूर्ती, सजावट साहित्य, पूजा साहित्य, वस्त्र, फळं, मिठाई, आणि इतर वस्तूंच्या विक्रीत वाढ होते. यामुळे अनेकांना रोजगाराची संधी मिळते. विशेषतः हस्तकला, मूर्तीकला आणि वस्त्रउद्योग यांना चालना मिळते. यामुळे स्थानिक व्यवसायिकांना फायदा होतो आणि अर्थव्यवस्थेत योगदान मिळतं. गणेश उत्सवात शैक्षणिक महत्त्वही आहे. गणेश उत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा आणि इतिहासाबद्दल माहिती मिळते. शाळांमध्ये गणेशोत्सव साजरा केल्याने विद्यार्थ्यांमध्ये एकात्मतेची भावना वाढते. विविध स्पर्धांमधून विद्यार्थी आपले कौशल्य दाखवतात. त्याचप्रमाणे गणेशाच्या उपदेशांवर आधारित शैक्षणिक संदेश दिले जातात, व्याख्यानमाला आयोजित केल्या जातात ज्यामुळे विद्यार्थ्यांना चांगले विचार, संस्कार मिळतात. गणेश उत्सवाच्या काळात आधुनिकतेचा आणि पारंपारिकतेचा संगम पाहायला मिळतो. काही ठिकाणी आधुनिक संगीत, डीजे, लेझर लाईट शो यांचा समावेश असतो, तर काही ठिकाणी पारंपारिक नृत्य, गायन आणि वाद्य संगीताचे कार्यक्रम असतात. यामुळे पारंपारिकतेला सन्मान दिला जातो, तसेच आधुनिकता स्वीकारून उत्सव अधिक आकर्षक बनतो. परंतु सध्या डीजे लेझर लाइटिंग शो ह्याचा अतिरेक झाल्यामुळे अनेक वाईट गोष्टी घडतात त्याच्या प्रकाश, आवाजामुळे कर्णबधिरता येणे, हार्ट अटॅक येणे, लहान मुलांना, रुग्णांना त्रास होणे, अंधत्व येणे अशा अनेक गोष्टी घडतात की त्यामुळे आता बरेच गणेश मंडळांनी त्याचा वापर बंद केला आहे. परंतु अशी फार कमी मंडळ आहेत. त्यामुळे त्याच्यावर बंदी सुद्धा आणली गेली होती. आता तर गणेशोत्सव राज्याचा महोत्सव म्हणून साजरा केला जाणार आहे, त्या दृष्टीने कार्यवाही सुरू आहे. सर्वांनीच हा गणेशोत्सव यशस्वी करायचा आहे आणि ती जबाबदारी ही शासनासोबत गणेश मंडळाची आणि सर्व जनतेही आहे हे लक्षात ठेवायला हवे. गणेशोत्सवाच्या काळात गावोगावी एक चांगले वातावरण निर्माण झाले असते. अगदी लहान लहान खेडेगावापासून तर अगदी मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, सर्व ठिकाणी हा उत्सव अतिशय आनंदात आणि उत्साहात साजरा होत असतो. पुण्यातील दगडूशेठ हलवाई गणपती, राजूरचा गणपती, तसेच जळगाव जिल्ह्यातील पद्मालय येथील गणपती, ठाणे जिल्ह्यातील टिटवाळा येथील गणपती, यवतमाळ जिल्ह्यातील कळंबचा गणपती, नागपूरचा टेकडी गणपती, सांगलीचा पटवर्धन बागेतील गणपती, मुंबईचा सिद्धीविनायक गणपती, लालबागचा गणपती, पुण्यातील कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी गणपती, गुरुजी तालीम गणपती, तुळशीबाग गणपती, मंडई गणपती, जिलब्या मारुती मंडळाचा गणपती, केसरी वाडा गणपती, भाऊसाहेब रंगारी गणपती.सारसबाग गणपती, अशी अनेक प्रसिद्ध गणपती मंदिरे महाराष्ट्रात आहेत. गणेश उत्सव हा केवळ धार्मिक सण नसून त्याचा सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरण, आर्थिक आणि शैक्षणिक महत्त्व आहे. या उत्सवामुळे समाजात एकात्मता, समर्पण आणि सद्भावना वाढीस लागते. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करून आपण पर्यावरणाचं संरक्षण करू शकतो. तसेच, सांस्कृतिक आणि पारंपारिकतेचं जतन करणे आणि आधुनिकतेचा स्वीकार करून उत्सव अधिक समृद्ध करणे हे आपल्या हातात आहे. गणेश उत्सव साजरा करताना त्याच्या विविध पैलूंना सन्मान देऊन आपण एक समृद्ध आणि सशक्त समाज निर्माण करू शकतो. एका मोठ्या विचाराने लोकमान्य टिळकांनी, भाऊसाहेब रंगारी यांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले ते आपण टिकवायला हवे.अनेक वाईट अप्रिय घटना समाजात घडताहेत त्या कुठेतरी बंद व्हायला हव्यात. गजाननाचे आगमन होत आहे तेव्हा आपण आपल्या देशात शांतता नांदावी, एकमेकात बंधुभाव निर्माण व्हावा, देशभक्ती वाढीस लागावी, आपली संस्कृतीचा जोपासना व्हावी. या देशात पोशिंदा म्हणतो त्या बळीराजाला चांगले दिवस यावे,तरुणांच्या हाताला काम मिळावे म्हणून प्रार्थना करू या. तेव्हा आमची प्रार्थना ऐकून घे रे बा गजानना!!!



विशेष



दिलीप देशपांडे

जामनेर, जिल्हा जळगाव

८९९९५६६९१७

dilipdeShpande24@gmail.com

## महत्त्वाचे

### साहित्यिकाची भूमिका स्पष्ट असावी : घोडेराव

**नाशिक ।** साहित्याची निर्मिती निसर्ग, प्रेम, दु:ख, वेदना यांतून होते. साहित्यात समाजमनाचं प्रतिबिंब दिसून येत असतं. म्हणूनच आपल्या




साहित्यात विचार मांडताना साहित्यिकाची भूमिका स्पष्ट असावी, असे विचार अरुण घोडेराव यांनी मांडले. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हुतात्मा स्मारकात आयोजित 'पुस्तकावर बोलू काही' या अभिनव उपक्रमाचे १७६वे पुष्प गुंफताना 'काफीरनामा' या पुस्तकावर ते बोलत होते. गझलकार प्रा.निशांत गुरू अध्यक्षस्थानी होते. अरुण घोडेराव पुढे म्हणाले की, साहित्य एकांगी नसावे. आयुष्यात जसे परिवर्तन घडत जाते, तसे साहित्यात घडायला हवे. कित्येक दिवस नुसतेच दु:ख कवटाळून बसायचे, याचाही विचार साहित्यिकांनी केला पाहिजे. आयुष्यात घडलेल्या अनेक प्रसंगात अनेक माणसं भेटली आणि त्यातून सामाजिक भान आले. काफीरनामा संग्रहात सामाजिक जाणिवांचे आत्मभान जागवणाऱ्या आणि समाजाला दिशा देणाऱ्या कविता आहेत, असेही ते म्हणाले. विजयराव खंडेराव, डॉ.ठकसेन गोराणे या भाग्यवान श्रोत्यांना ग्रंथभेट देऊन सन्मानीत करण्यात आले. मधुकर गिरी यांनी स्वागत केले. सुरेश पवार यांनी सूत्रसंचालन केले तर अलका दराडे यांनी आभार मानले. दरम्यान येत्या शुक्रवारी (२९) प्राचार्य डॉ.किशोर पवार 'अंधश्रद्धेचे ग्रहण' या पुस्तकावर ऐसपैस गप्पा करणार आहेत.

### 'रोपटे आमचे अंगण तुमचे' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण

**नाशिक ।** तरुप्रीत प्रकल्पाच्या माध्यमातून गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने बीजारोपण व वृक्षारोपण करणाऱ्या डॉ. मंगल सांगळे व प्रियांका केदार यांनी सिन्नर तालुक्यातील कणकोरी




गावातील नागरिक शरद दत्तात्रय सांगळे व कैलास दत्तात्रय सांगळे यांच्या अंगणात 'रोपटे आमचे अंगण तुमचे' या उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पेरू व खिरणीची रोपे लावून निसर्ग संवर्धनाचा संदेश देण्यात आला. जागतिक तापमान वाढीसारख्या समस्यांना सामोरे जाऊन जीवसृष्टी वाचवायची असेल तर अधिकाधिक वृक्षारोपण व बीजारोपण करण्याची नितांत गरज असल्याचे यावेळी डॉ. मंगल सांगळे यांनी सांगितले. तसेच हिरवळ पसरविण्यासाठी आम्ही तरुप्रीत प्रकल्पाच्या माध्यमातून अविरतपणे कार्यरत आहोत व यापुढेही हा उपक्रम आणखी वृद्धिंगत करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू, असे मत प्रियांका केदार ह्यांनी व्यक्त केले. दरवर्षी तरुप्रीत प्रकल्पाच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण संकल्पना राबवून त्या पर्यावरणपूरक काम करीत असतात. 'रोपटे आमचे अंगण तुमचे' ह्या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. असेही त्यांनी नमूद केले.

# एकदिवसीय कृतीसत्र कार्यशाळेला कला शिक्षकांचा प्रतिसाद

**नाशिक ।** कलाशिक्षक हा शाळेचा आत्मा असून समाजाला घडवण्याबरोबर कलागुण संस्कार घडवून मुलांचा सर्वांगीण विकासात कला शिक्षक मोलाची भूमिका बजावतात. पाचशे विद्यार्थ्यांमागे एक कला शिक्षक ही शासनाची ही भूमिका घातक असून हे कुठे तरी थांबायला हवे. यामुळे कला शिक्षक आणि शाळा संपुष्टात येतील. कला जिवंत राहिली तरच शाळा जिवंत राहतील, असे प्रतिपादन खासदार भास्कर भगरे यांनी केले. ते माध्यमिक शिक्षण विभाग के के वाघ शिक्षण प्रसारक मंडळ आणि कला शिक्षक महासंघ, व्हिजन कला शिक्षक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने पंजाबराव देशमुख हॉल येथे आयोजित सुधारित अभ्यासक्रमावर आधारित कला शिक्षकांसाठी प्रात्यक्षिक मार्गदर्शन कृतीसत्र कार्यशाळेप्रसंगी बोलत होते.





अध्यक्षस्थानी कलाशिक्षक महासंघाचे संस्थापक प्रदेशाध्यक्ष प्रल्हाद साळुंखे होते. प्राचार्य सचिन जाधव, अधिष्ठाता बाळ नगरकर, प्राचार्य मुरलीधर रोकडे, चंद्रशेखर चिंचोले, चंद्रशेखर देशपांडे, सुरेश लासुरे आदी मान्यवर उपस्थित होते. खा. भगरे पुढे म्हणाले की, शासनाची धोरण शिक्षण क्षेत्राला मारक असून ज्या शिक्षणा क्षेत्रावर देशाच उद्याचं भवितव्य घडणार आहे, त्यावरच शासन कात्री लावण्याचे काम करत आहे ही शोकांतिका आहे. शासनाने शिक्षण क्षेत्रावर सहा टक्के निधी खर्च केला पाहिजे, पण तो अडीच टक्केच केला जात आहे, हे दुर्दैव आहे. सहा टक्के निधी शिक्षण क्षेत्राला मिळावा म्हणून माझा पाठपुरावा सुरु असून पाचशे विद्यार्थ्यांमागे एक कलाशिक्षक ह्या जाचक निर्णयाविरुद्ध केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांची शिष्टमंडळासह भेट घेऊन २४० विद्यार्थ्यांमागे एक कलाशिक्षक यांची नेमणूक पवित्रपोर्टल मार्फत करण्यात यावी. नाशिक जिल्ह्यातील कलाशिक्षकांची थकीत बिले, ए टी डी टू ए एम स्केल मान्यताचे प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यासाठी शिक्षण उपसंचालक यांची भेट घेणार असल्याचे शेवटी त्यांनी नमूद केले. गेल्या अनेक महिन्यापासून कंत्राटी कर्मचाऱ्यांचा आंदोलन सुरु आहे, त्यांच्या रास्त मागणीला पाठिंबा दर्शवत त्यांच्या लढ्यात सहभागी होऊन केंद्रशासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. प्रास्ताविकातून दत्तात्रय सांगळे यांनी कलाशिक्षक संघटनेच्या कार्याचा आढावा घेऊन शासनाच्या जाचक निर्णया विषयी नाराजी व्यक्त केली. यावेळी नाशिक जिल्ह्यातून इडियन आयडॉल या स्पर्धेत निवड झाल्याबद्दल प्रतिक सोळसे याचा खा. भगरे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

> भारतीय संस्कृतीला नृत्य शैलीचा अथांग वारसा लाभलेला आहे. प्राचीन शास्त्रीय नृत्य शैलीचे जतन करणे काळाची गरज आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शालेय अध्यापनात नृत्याचा समावेश करण्यात यावा.
>
> **– कीर्ती भवाळकर, (प्रख्यात शास्त्रीय कथक नृत्य दिग्दर्शक, नृत्यांगणा)**

> नाशिक जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी यांनी शासन निर्णयाचा अभ्यास करून ए टी डी टू ए एम स्केल मान्यता साठी अडवणूक करू नये. धुळे जिल्यात सर्व मान्यता मिळाल्या असून कलाशिक्षक महासंघ, व्हिजन कला शिक्षक संघटना सातत्याने कला शिक्षकांच्या प्रश्न सोडवण्यासाठी पाठपुरावा करत आहे. सर्व कला शिक्षकांनी एकजुट होऊन संघटनेच्या पाठीशी उभे राहणे काळाची गरज आहे.
>
> **– प्रल्हाद साळुंखे, (संस्थापक प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कला शिक्षक महासंघ)**

**नृत्यांगनानी सादर केलेल्या कलेची वाहवा**

कार्यशाळेच्या सत्रात प्रख्यात नृत्य दिग्दर्शक नृत्यांगना कीर्ती भवाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली नृत्यांगनानी सादर केलेल्या शिववंदना कथक नृत्य अविष्काराने उपस्थितांची वाहवा मिळवली. सुनीता शिंदे नृत्यगायन, प्रतिक सोळसे, ओंकार वैरागकर नाट्य, गणेश गायकवाड, प्रा. भूषण कोंबडे, रवींद्र कांगणे डिजिटल पेंटिंग, स्वप्नील अहिरे फलक लेखन, देव हिरे, भारत पवार निसर्गचित्र, दीपक वर्मा स्थिर चित्र, राजेश सावंत कॅलिग्राफी, महेंद्र जगताप स्मरण चित्र, राहुल पगारे यांनी प्रात्यक्षिक सादर करून करून मार्गदर्शन केले. दरम्यान कलाशिक्षकांच्या पद भरती तसेच इतर मागण्यांविषयी लेखी निवेदन व ठराव करण्यात आला. प्रदेश कार्यकारिणी सदस्य दत्तात्रय सांगळे, विभागीय अध्यक्ष चंद्रशेखर सावंत, जिल्हाध्यक्ष राजेंद्र लोखंडे, जिल्हाध्यक्ष सचिन पगार, सचिव मिलिंद टिळे, संदीप पवार, उपाध्यक्ष योगेश रोकडे, भारत पवार, संजय बोरसे, देव हिरे, महेंद्र झोले, प्रदीप अहिरे यांनी केले.सूत्रसंचालन योगेश कड तर आभार सचिन पगार यांनी मानले. दरम्यान सोमेश्वर मुळाने यांनी संकलित केलेल्या ८० देशातील पोस्टाची तिकिटे, ३१ देशातील चलन, शिवरायांच्या काळातील शिवराय, मोहरा, चांदीची नाणी प्रदर्शन भरवण्यात आले होते. त्याचे उदघाटन प्रल्हाद साळुंखे, संजय चव्हाण, राजेंद्र लोखंडे यांच्या हस्ते करण्यात आले.

# साल्हेर किल्ला जागतिक पर्यटन, रोजगाराचे केंद्र होईल : वास्तुविशारद प्रा. कासार




**नाशिक ।** कळसुबाई शिखरानंतर महाराष्ट्रातील सर्वाधिक उंचीचा किल्ला म्हणून साल्हेर किल्ला ओळखला जातो. या किल्ल्यावर दुर्मिळ अशा १६५ वेगवेगळ्या वनस्पतींच्या प्रजाती आहेत. त्यामध्ये कार्वी ही दुर्मिळ वनस्पती असून, ती दर १२ वर्षांनी फुलते. साल्हेर किल्ल्याला युनेस्को ने महाराष्ट्रातील प्रमुख १२ किल्ल्यांमध्ये समावेश केल्याने साल्हेर किल्ला जागतिक पर्यटन व रोजगाराचे केंद्र होईल असा विश्वास वास्तूविशारद आणि पुरातत्व विद्या अभ्यासक प्रा स्मिता कासार पाटील यांनी व्यक्त केला.

के.टी.एच.एम. महाविद्यालय आय क्यू ए सी व इतिहास विभाग आयोजित साल्हेर किल्ला : जागतिक मानांकन आणि आपली जबाबदारी' या विषयावर सूक्ष्मजीवशास्त्र विभाग येथे त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ कल्पना अहिरे होत्या. व्यासपीठावर आय क्यू ए सी समन्वयक व उपप्राचार्य डॉ एन डी गायकवाड, डॉ सोमनाथ शिरसाठ, इतिहास विभागप्रमुख डॉ. संतोष शेलार उपस्थित होते. प्रा. पाटील यांनी पुढे बोलतांना साल्हेर किल्यात एकूण १५ दरवाजे , १२ गुफा , १२ पाण्याचे साठे, दगडात तयार केलेले यज्ञकुंड व ५ वेगवेगळ्या दगडांवर किल्याच्या माहिती संदर्भात सूचना नोंदविलेल्या आहेत. या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांनी किल्याच्या परिसर स्वच्छतेसंदर्भात काळजी घेणे महत्वाचे आहे.या ठिकाणी जागतिक पर्यटन व रोजगार निर्मितीसाठी गिर्यारोहणाची प्रशिक्षित ट्रेकर, आपत्ती व्यवस्थापन केंद्र,कॅफे, होम स्टे, टुरिस्ट गाईड यांसारखी सुविधा होणे आवश्यक असल्याचे पाटील यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना युनेस्कोचे जागतिक मानांकन मिळाले हे आपल्या दृष्टीने मोठी गौरवस्पद बाब आहे. या प्रक्रियेत केटीएचएम महाविद्यालयाच्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला असे प्राचार्य डॉ. श्रीमती कल्पना अहिरे यांनी सांगितले.

# चित्तपावन ब्राह्मण संघातर्फे गणेशोत्सवानिमित्त पावन स्वर

**नाशिक ।** चित्तपावन ब्राह्मण संघातर्फे गणेशोत्सवानिमित्त पावन स्वर या मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दि. ३० ऑगस्ट रोजी सुप्रसिद्ध गायक डॉ. आशिष रानडे यांची ही मैफल सायंकाळी ६ वाजता सी.बी. एस.जवळ श्री परशुराम भवन येथे बापये सभागृहात होईल.



या मैफलीत डॉ.रानडे शास्त्रीय, उपशास्त्रीय संगीत व नाट्यगीते सादर करणार आहेत. त्यांना दिव्या रानडे व रसिक कुलकर्णी साथसंगत करतील. चित्तपावन ब्राह्मण संघातर्फे पूर्वी दरवर्षी गणेशोत्सवात उत्तम गानमैफली होत असत. त्यामध्ये तेव्हाचे होतकरू व नंतर नावारूपाला आलेल्या गायक कलाकारांच्या झालेल्या मैफली आजही अनेकांच्या स्मरणात आहेत. त्या उपक्रमाचे यंदा पुनरुज्जीवन होत आहे. सर्व रसिकांनी व सभासद ज्ञातीबांधवांनी या सांगीतिक मेजवानीचा आनंद घ्यावा असे आवाहन अध्यक्ष विजय साने, सचिव नितीन सहस्त्रबुद्धे व विश्वस्त, कार्यकारी मंडळाने केले आहे.

# लासलगाव महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनीचे यश


## एक बहीण झाली सीए तर दुसरी बहीण सीएस...

महेश साळुंखे

**लासलगाव ।** येथील नूतन विद्या प्रसारक मंडळाच्या इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये इयत्ता दहावी पर्यंतचे शिक्षण घेऊन इयत्ता बारावी पर्यंतचे शिक्षण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय लासलगाव येथे वाणिज्य शाखेतून घेऊन तृप्ती गांगुर्डे या विद्यार्थिनीने अतिशय अवघड समजली जाणारी सीए (चार्टर्ड अकाउंटंट) ची परीक्षा उत्तीर्ण केली. तर तिच्याच पावलावर पाऊल टाकत तिच्या लहान बहिणीने देखील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय लासलगाव येथूनच वाणिज्य शाखेतून शिक्षण घेत सीएस (कंपनी सेक्रेटरी) या परीक्षेत यश मिळविले आहे.

लासलगावसारख्या ग्रामीण भागातून शिक्षण घेऊन पहिल्याच प्रयत्नात तृप्ती ने चार्टर्ड अकाउंटंट (CA) होऊन तर प्रीतीने देखील पहिल्याच प्रयत्नात कंपनी सेक्रेटरी (CS) होऊन इतिहास घडवला आहे. साधारणपणे सीए आणि सीएस या दोन्ही परीक्षा देशातील सर्वात कठीण परीक्षांपैकी एक मानल्या जातात. अनेकांना या परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी वर्षानुवर्षे प्रयत्न करावे लागतात, पण तृप्ती आणि प्रीती या दोघी बहिणींनी अपूर्व मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर हे स्वप्न कमी वयात पूर्ण केले. लहानपणापासूनच दोघींनाही अभ्यासात प्रचंड आवड होती. इयत्ता बारावी मध्ये अकाउंट विषयात तृप्तीने 100 पैकी 100 गुण मिळवत वाणिज्य शाखेतून नासिक विभागात प्रथम येण्याचा मान मिळविला होता. वडिलांचे छत्र हरपल्यानंतर आईने मोठ्या जिद्दीने व संघर्षाने शिवणकाम करून मुलींचे शिक्षण पूर्ण केले. तृप्तीने बारावी नंतर





सीए तर प्रीतीने बारावी नंतर सीएस अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला आणि आपल्या ध्येयावर प्रचंड लक्ष ककेंद्रीत केले. दोघींच्याही यशामागे केवळ अभ्यास नाही तर शिस्तबद्ध दिनक्रम, योग्य नियोजन आणि अपयशाला न घाबरण्याची वृत्ती होती. तृप्ती नेहमी म्हणते की, "कितीही मोठं लक्ष्य असलं तरी मेहनत आणि सातत्य असेल तर काहीही अशक्य नाही.

तृप्ती आणि प्रीती यांनी आपल्या आईच्या कष्टाचे खऱ्या अर्थाने चीज केले आणि पहिल्याच प्रयत्नात तृप्ती सीए झाली तर प्रीती देखील पहिल्याच प्रयत्नात सीएस झाली आहे हे त्यांच्या यशाचे फलित आहे. काल मुंबई येथे पार पडलेल्या सीएच्या पदवीग्रहण समारंभासाठी तृप्ती आपल्या आई समवेत उपस्थित होती. ती सध्या बेंगलोर येथे PwC (Price water house Coopers) या कंपनीत सनदी लेखापाल म्हणून कार्यरत आहे तर प्रीती सध्या लॉच्या अंतिम वर्षाला आहे सोबतच ती इंटर्नशिप देखील करत आहे. लासलगावसारख्या ग्रामीण भागातून असलेल्या एकाच कुटुंबातील एक बहिण सर्वात तरुण सीए तर दुसरी बहीण देखील सर्वात तरुण सीएस बनते, हा प्रवास सोपा नव्हता. पण दोन्ही बहिणींनी हे दाखवून दिले की जर स्वप्नं मोठी असतील आणि मेहनत प्रामाणिक असेल तर यश नक्की मिळते.

# अप्रशिक्षित अभियंत्यांमुळे जिल्हा परिषदेच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह

## तांत्रिक ज्ञानाशिवाय शाखा अभियंते कार्यरत सा.बां. विभाग संशयाच्या भोवऱ्यात

**सुधीर उमराळकर**

नाशिक । नाशिक जिल्ह्याचे मिनी मंत्रालय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या विभागात तांत्रिक ज्ञान नसलेले, अप्रशिक्षित व अनुभवहीन शाखा अभियंते कार्यरत असल्याचे उघड झाले आहे.यातील गंभीर बाब म्हणजे या अभियंत्यांना अंदाजपत्रके तयार करणे, मोजमाप पुस्तके (एमबी रेकॉर्ड) लिहिणे यांसारखी मुलभूत तांत्रिक कामे देखील करता येत नसल्याची माहिती बाहेर आली आहे. परिणामी जिल्ह्यातील तालुकास्तरावर केलेल्या विविध बांधकामांच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, या अभियंत्यांच्या कामकाजाचा त्रयस्थ यंत्रणेमार्फत तपास करावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागात कार्यरत असलेल्या शाखा अभियंत्यांची संख्या सर्वाधिक असून, त्यातील किमान २० ते २५ अभियंत्यांच्या पात्रता व तांत्रिक ज्ञानावर संशय व्यक्त केला जात आहे. काहींना तर अगदी साधे अंदाजपत्रक किंवा मोजमाप पुस्तक तयार करणेही जमत नाही. ही कामे ते इतरांकडून करून घेत असल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. या गंभीर दुर्लक्षामुळे




जिल्हा परिषदेच्या कामकाजाच्या पारदर्शकतेवर आणि विश्वासार्हतेला गालबोट लागले आहे. विशेष म्हणजे, काही अप्रशिक्षित शाखा अभियंते निवृत्त होऊन गेले असून त्यापैकी काहींनी कर्मचारी संघटनेचे नेतृत्वदेखील केले होते. याव्यतिरिक्त, तांत्रिक ज्ञान नसलेल्या या अभियंत्यांच्या हाताखाली स्थापत्य अभियांत्रिकी पदवीधर सहाय्यक काम करत आहेत. पदवीधर असूनही ते अप्रशिक्षित अधिकाऱ्यांच्या आदेशाखाली काम करीत आहेत, यामुळे लाखो रुपयांचा पगार घेणारे शाखा अभियंते कशासाठी हवेत, असा सवाल उपस्थित केला जात आहे. तांत्रिक ज्ञान असूनही प्रत्यक्ष कामात काहीच योगदान देऊ न शकणाऱ्या अभियंत्यांची शोकांतिका वेगळीच आहे. जिल्हा परिषदेत तांत्रिक सहाय्यक म्हणून नियुक्ती झालेल्यांना पदोन्नती देण्यात आली, मात्र त्यांचे तांत्रिक कौशल्य तपासण्याची कोणतीही तसदी प्रशासनाने घेतली नाही. केवळ रिक्त पदे भरण्यापुरतेच प्रमोशन दिल्याचा आरोप होत आहे. नियमांची मोडतोड करून झालेल्या या प्रक्रियेमुळे अप्रशिक्षित अधिकाऱ्यांना संधी मिळाली आणि दर्जेदार कामे होण्याऐवजी जिल्ह्यातील विकासकामांवर परिणाम झाला.

यातील आणखी धक्कादायक प्रकार म्हणजे निफाड तालुक्यातील मैल बिगाऱ्याला देखील शाखा अभियंता म्हणून पदोन्नती देण्यात आली होती. तांत्रिक ज्ञानाचा कोणताही संबंध नसलेल्या व्यक्तींना अशा जबाबदाऱ्या सोपवणे म्हणजे शासनाच्या तिजोरीवर डल्ला आणि जनतेच्या विश्वासाला तडा देण्यासारखे असल्याचा आरोप केला जात आहे. जिल्हा परिषदेतील या गैरप्रकारां बाबत सर्वसामान्य जनतेत आणि राजकीय वर्तुळात मोठा संताप व्यक्त केला जात आहे. जबाबदाऱ्यांची कामे इतरांकडून करणाऱ्या अप्रशिक्षित शाखा अभियंत्यांना त्वरित कामावरून कमी करण्यात यावेत आणि सक्षम, पात्र अभियंत्यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी जोरदार मागणी होत आहे. नुकतेच रुजू झालेले जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी या बाबत सुधारणा करतील का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नाशिक शहर पोलिसांच्या ताफ्यात नवी मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन दाखल



**नाशिक ।** नाशिक शहर पोलीसांच्या ताफ्यात दि २७ ऑगस्ट रोजी न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, गृह विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या मार्फत नवी मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन समाविष्ट करण्यात आली आहे. नव्या फौजदारी कायद्याची अंमलबजावणी होऊन गुन्ह्यांमधील शाबितीचे प्रमाण वाढावे या उद्देशाने गृह विभागाकडून नाशिक शहर पोलीसांना ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

गंभीर व संवेदनशील गुन्ह्यांच्या घटनास्थळी या व्हॅनद्वारे तत्काळ भेट देण्यात येणार असून पुरावे संकलन, गुन्हे उघडकीस आणणे व दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्यासाठी ही व्हॅन महत्वाची ठरणार आहे. या मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनचे उद्घाटन पोलीस आयुक्त संदिप कर्णिक यांच्या हस्ते पोलीस आयुक्तालय, नाशिक शहर येथे करण्यात आले. या प्रसंगी पोलीस उप आयुक्त मुख्यालय चंद्रकांत खांडवी, उप संचालक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा नाशिक राहुल पवार, सहा. पोलीस आयुक्त गुन्हे संदिप मिटके, प्रशासकीय अधिकारी नागेश हडपे, पोलीस निरीक्षक विशेष शाखा युवराज पत्की, पोलीस निरीक्षक मोटार परिवहन विभाग पंकज पवार तसेच न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा नाशिक येथील सहाय्यक संचालक वैभव देशपांडे, सहायक रासायनिक तज्ञ पूजा जाधव, वैज्ञानिक अधिकारी दिपक शिंदे, आदर्श चव्हाण, सहाय्यक रासायनिक विश्लेषक धनश्री पवार, हर्षदा कापडनिस, वैज्ञानिक सहायक ऋषिकेश दाभाडे, शेखर गिरासे व धनश्री सोनवणे उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### सर्वाधिक २९ गट अनुसूचित जमातीच्या वाट्याला जाण्याची दाट शक्यता

**नाशिक ।** जिल्हा परिषदेच्या गट-गण रचनेनंतर पुढील टप्प्यात काढण्यात येणाऱ्या आरक्षण सोडतीकडे इच्छुकांचे लक्ष लागले आहे. दरम्यान ७४ सदस्यांच्या सभागृहात तब्बल ३८ महिला सदस्य प्रवेश करणार असून सर्वाधिक सदस्य हे अनुसूचित जमातीचे असणार आहेत. जिल्हा परिषदेचे ७४ गट तर पंचायत समित्यांचे १४८ राहणार आहेत. आतापर्यंत चक्राकार पध्दतीने आरक्षण निश्चित केले जात होते. यावेळी मात्र लोकसंख्येच्या उतरत्या क्रमाने आरक्षण काढण्यात येणार आहे. म्हणजे ज्या गटात ज्या जातीची लोकसंख्या अधिक तो गट त्या जातीसाठी आरक्षित केला जाणार आहे. गट-गण रचनेचे प्रारूप अंतिम झाले असून ते गेल्या आठवड्यात राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले आहे. पुढील टप्पा आरक्षण सोडतीचा असून साधारणतः गुरूवारी कार्यक्रम जाहिर होण्याची दाट शक्यता आहे. दरम्यान, राजकीय विश्लेषकांनी नेमके किती गट आरक्षित आणि किती गट सर्वसाधारण राहतील, याचा अंदाज बांधला आहे. ७४ पैकी २९ गट अनुसूचित जमातीसाठी राखीव असणार आहेत. तर पाच गट अनुसूचित जातीसाठी राखीव असतील, असा अंदाज बांधण्यात आला आहे. उर्वरित ४० पैकी २० गट इतर मागासवर्गीयांसाठी राखीव राहणार असून २० गट सर्वसाधारण असतील, असेही सांगण्यात आले आहे. इतर मागासवर्गीयांसाठी जे २० गट राखीव राहणार आहेत, ते चिठ्ठी पध्दतीने आरक्षित करण्यात येतील. महिलांसाठी सगळ्याच गटांमध्ये पन्नास टक्के आरक्षण राहणार असल्याने तब्बल ३८ महिला जिल्हा परिषदेत सदस्य म्हणून निवडून येतील. अनुसूचित जमातीच्या १५ तर अनुसूचित जातीच्या तीन महिला निवडून येतील. चिठ्ठी काढून महिलांचे आरक्षण निश्चित केले जाईल, अशी माहिती सूत्रांनी दिली.

### राष्ट्रवादी 'सामाजिक न्याय' विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी भारत जाधव

**नाशिक ।** नाशिक जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या 'सामाजिक न्याय' विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी



जुने निष्ठावंत कार्यकर्ते भारत जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पुरवठामंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते जाधव यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष अॅड. रवींद्र पगार, बाळासाहेब कर्डक, यशवंत शिरसाठ, बाळू आठवले, संतोष डोंगरे, किरण जाधव, गुलाब सय्यद, दीपक कांबळे, दिलीप जाधव, कामिनी पटेल, रुक्मिणी म्हस्के आदी. उपस्थित होते. भारत जाधव यांच्या नियुक्तीमुळे आनंदाचे वातावरण झाले असून, सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

### शंकरराव वाजे विद्यालयाचे विद्यार्थी एमटीएस परीक्षेत यशस्वी

**सिन्नर ।** महाराष्ट्र टॅलेंट सर्च (एम.टी.एस.) परीक्षेमध्ये लोकनेते शंकरराव बाळाजी वाजे विद्यालयाचे विद्यार्थी अनंत धात्रक, सिद्धांत




गोरडे आणि श्लोक कांगणे यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल विद्यालयात त्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक आर. वाय. रायते, उपमुख्याध्यापिका मंगल हांडे, पर्यवेक्षक पी. आर. करपे, व्ही. बी. कुमावत प्रवीण पाळदे लालजी हिरे, सुषमा भवर, संगीता वाडकर, उषा जाधव यांच्यासह सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. मुख्याध्यापक श्रायते यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा पाठिंबा कारणीभूत असल्याचे त्यांनी नमूद केले.

### फलक रेखाटणातून झणझणीत फटकार...

**नाशिक ।** ढोल-ताशांचा गजर, फुलांचा वर्षाव, मिरवणुकांची रंगत... राज्य महोत्सवाच्या



दर्जाने नटलेल्या गणेशोत्सवाचं स्वागत साऱ्या महाराष्ट्रात जल्लोषात होतंय; पण या उत्सवाच्या आनंदातही एक कडवट वास्तव डोळ्यासमोर उभं राहतंय. गावोगावी, शहरात रस्त्यांवर पसरलेले खड्डे! भक्तगण बाप्पाच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहत असतानाच, या खड्ड्यांनी उत्साहावर विरजण घातलंय. "रस्त्यांना लागलेलं खड्ड्यांचं ग्रहण दूर कर बाप्पा!" अशीच साद गणेशभक्तांच्या मनातून उमटते. याच लोकभावनेला जिवंत रुप दिलंय भाटगाव (ता. चांदवड) येथील कला शिक्षक देव हिरे यांनी. फलकरेखाटनातून रस्त्यांच्या व्यथा मांडत, गणरायाच्या स्वागताची वाट मोकळी करून देणारी त्यांची ही कलाकृती सोशल मीडियावर चांगलीचं व्हायरल होतं आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दिवाळीनंतर; भूमिगत नेते सक्रीय; बॅनरबाजी, भेटीगाठींना वेग

**संतोष जाधव**

**सटाणा ।** गेल्या चार वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल अखेर दिवाळीनंतर वाजणार असल्याचे संकेत मिळताच तालुक्यात आणि सटाणा शहरात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. अनेक वर्षे शांत बसलेले व भूमिगत झालेल्या नेत्यांनी पुन्हा सक्रीय होण्यास सुरुवात केली असून शहर-गावांमध्ये बॅनरबाजी, पोस्टरबाजी आणि भेटीगाठींना वेग आला आहे. गेल्या चार वर्षांपासून जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिकांवर प्रशासकीय राजवट सुरू आहे. आरक्षणासह इतर कारणांमुळे निवडणुका वारंवार पुढे ढकलल्या जात




दोन ते तीन टप्प्यात निवडणुका होण्याची दाट शक्यता आहे. गणपती बाप्पाच्या आगमनानिमित्त तालुक्यात आणि शहरात राजकीय हालचालींना वेग आला आहे. भावी उमेदवारांनी आपापल्या गटातील गावांना मदत करून उपस्थिती दर्शवली आहे. काहींनी गणपती मंडळांना आर्थिक हातभार लावून मतदारांमध्ये आपली छाप पाडण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. तर काहींनी बॅनरबाजी, पोस्टरबाजी करून आपली ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.




भावी उमेदवारांचे सध्या सर्वाधिक लक्ष आरक्षणावर केंद्रित झाले आहे. कोणत्या वर्गासाठी किती जागा राखीव राहतील यावरच त्यांचे राजकीय भविष्य ठरणार आहे. त्यामुळे आरक्षणाचा निर्णय जाहीर होण्याआधीच अनेकांनी तयारी सुरू केली असली तरी अंतिम आरक्षणानंतरच खरी लढत रंगणार आहे. मिनी मंत्रालय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषदेसह पंचायत समित्या आणि नगरपालिकांमध्ये उमेदवारीसाठी इच्छुकांनी गटबांधणी सुरू केली आहे. गावोगाव फिरून मतदारांशी संवाद साधण्याचे, "मीच सरस उमेदवार" असल्याचे पटवून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. काही ठिकाणी आगामी निवडणुकांसाठी गटातील स्थानिक कार्यकर्त्यांची ताकद तपासली जात आहे.अद्याप अधिकृत अधिसूचना निघालेली नसली तरी निवडणुकीची चाहूल लागल्याने उमेदवारांची चळवळ सुरू झाली आहे. दिवाळीनंतर निवडणूक प्रक्रियेला अधिकृत स्वरूप मिळेल आणि त्यानंतर खरी रणधुमाळी सुरू होणार आहे. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण तालुका व शहरात राजकीय घडामोडींना वेग आला असून, दिवाळीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रंगतदार ठरणारयात शंका नाही.

# नांदगावच्या विकासाचे वास्तव!

## स्मशानभूमीत अंधारात मोबाईलच्या उजेडावर अंत्यसंस्कार

**नांदगाव ।** नांदगाव नगर परिषदेच्या बेफिकिरीचे आणखी एक ज्वलंत उदाहरण समोर आले आहे. शहर व तालुक्याच्या विकासाच्या नावाखाली मोठमोठ्या घोषणा केल्या जात असल्या, तरी प्रत्यक्षात नागरिकांना मुलभूत सुविधा मिळणेही कठीण झाले आहे. एवढेच नव्हे तर, मृत व्यक्तींच्या अंत्यसंस्कारासाठी देखील नागरिकांना कठीण परिस्थितीचा सामना करावा लागत आहे.

बुधवारी (दि.२७) रात्री नांदगाव शहरातील स्मशानभूमीत काळ्याकुट्ट अंधारात मोबाईलच्या उजेडावर अंत्यसंस्कार करण्याची वेळ नागरिकांवर आली. शहरातील गणेश चौधरी व गौरव चौधरी यांचे वडील शंकरराव चौधरी यांच्या अंत्यसंस्कारावेळी ही गंभीर परिस्थिती निर्माण झाली. स्मशानभूमीत दिवे नसल्यामुळे नागरिकांना मोबाईलच्या टॉर्चच्या उजेडावर अंत्यसंस्कार पार पाडावे लागले. या प्रकारानंतर नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. नांदगाव



नगर परिषदेचे अधिकारी व लोकप्रतिनिधी विकासाचे फुगे फुगवत असले, तरी रस्ते उखडून पडलेले, पिण्याच्या पाण्याचा नियमित पुरवठा नाही, अनेक भागात रस्त्यावर अंधाराचे साम्राज्य असे वास्तव सर्वत्र दिसून येत आहे. "जिवंत माणसांना सुविधा नाहीत, आणि मृत झाल्यावरही सन्मानाने अंत्यसंस्काराची व्यवस्था नाही, मग हा विकास आहे की भकास?" असा जळजळीत सवाल नांदगावकर नागरिक करत आहेत.

# मनपाच्या पंचवटी विभागीय कार्यालयात श्रीगणेशाची स्थापना



**नाशिक ।** येथील नाशिक मनपाच्या पंचवटी विभागीय कार्यालयात गणेशोत्सव साजरा केला जात आहे.यानिमित्ताने आज (दि.२७) रोजी 'गणेश चतुर्थी' दिवशी सकाळी घरपट्टी विभागात 'गणपती बाप्पा मोरया..मंगलमूर्ती मोरया..' च्या जयजयकारात श्रीगणेश मूर्तीची विधीवत स्थापना झाली.

यावेळी मनपा पंचवटी विभागीय अधिकारी मदन हरिश्चंद्र यांच्या हस्ते लक्षवेधी श्रीगणेश मूर्तीचे विधिवत पुजन करण्यात आले.तर यावेळी उपस्थित सहा.निरीक्षक विकास देवरे, प्रशांत राऊत, सुयोग शिरसाठ, संतोष खांदवे, प्रकाश उखाडे, स्वप्नाली पिंगळे, प्रदीप सोनवणे, किरण निकम, कैलास जाधव, भाऊसाहेब साळवे, सोनवणे मॅडम, संतोष जाधव, विष्णू तुपलोंढे, दत्तू सानप, किशोर निकम, संजय बोरसे, सचिन गवळी, देवेंद्र चव्हाण, संतोष जाधव, प्रवीण मोरे, आप्पा थेटे आदी अधिकारी व कर्मचारी यांच्या हस्ते श्रीगणेश महाआरती करण्यात आली. शेवटी सर्व गणेश भक्तांना मोदकांचा प्रसाद वाटप करण्यात आला.

# आनंदीबाई पेशवेंची मूळ प्रतिमा लढाऊ स्त्री : देशपांडे

**नाशिक ।** आनंदीबाई पेशवे या मराठा साम्राज्याचे अकरावे पेशवे रघुनाथराव उर्फ राघोबादादा यांच्या पत्नी होत्या. नारायणराव पेशवांच्या हत्येच्या कटात त्यांनी सक्रिय भूमिका बजावली म्हणून त्यांची प्रतिमा एक कारस्थानी स्त्री म्हणूनइ गणली गेली. त्यांची मूळ प्रतिमा तशी नव्हती तर एक लढाऊ स्त्री म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात असल्याचे प्रतिपादन लेखक रमाकांत देशपांडे यांनी केले.




## गो. ह. देशपांडे वाचनालयात व्याख्यान कार्यक्रम

सार्वजनिक वाचनालयाच्या गंगापूररोडवरील गो. ह. देशपांडे वाचनालयात (दि. २३) व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. 'श्रीमंत आनंदीबाई पेशवे' हा त्यांचा व्याख्यानाचा विषय होता. देशपांडे म्हणाले की, आनंदीबाईंना रामायण आणि महाभारताचे ज्ञान होते आणि त्यांनी स्वतःची पत्रेही लिहिली. त्यांचे व्यक्तिमत्व शूरवीर होते आणि त्या पेशवे घराच्या हितासाठी धडपडत होत्या. ऑगस्ट १७७३ मध्ये आनंदीबाई यांनी सतरा वर्षीय पेशवा नारायणराव यांच्या हत्येचा कट रचला, ज्यात त्यांचे पती रघुनाथराव पेशवेपदावर बसणार होते. या घटनेमुळे त्यांची प्रतिमा कारस्थानी स्त्री म्हणून झाली. त्यांनी रघुनाथरावांचे साहित्य आणि पेशवाई सांभाळण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या बुद्धिमत्तेचा आणि ज्ञानाचा उपयोग झाला नाही. त्यांनी 'चूल आणि मूल' या पलीकडे एक आदर्श निर्माण केला. त्या नाशिक येथे मुक्कामी होत्या. येथील गणपतीला नवस केल्याने त्यांना पुत्ररत्न प्राप्त झाले. हा गणपती नवसाला पावतो म्हणून त्या गणपतीचे नाव नवश्या गणपती पडले. पुत्रप्राप्तीचा आनंद ज्या गावात झाला त्या गावाला आनंदवली असे नाव देण्यात आले. असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके, कार्प्रायाध्यक्ष संजय करंजकर, प्रमुख सचिव सुरेश गायधनी, सहाय्यक सचिव प्रा. सोमनाथ मुठाळ, पुस्तक मित्र मंडळ प्रमुख मंगेश मालपाठक, ग्रंथ सचिव देवदत्त जोशी,डॉ. धर्माजी बोडके, सांस्कृतिक सचिव जयप्रकाश जातेगावकर, नाट्यगृह सचिव जयेश बर्वे, समिती सदस्य रमेश कडलग उपस्थित होते. सूत्रसंचलन प्रा. वंदना रकिबे यांनी केले.

# महायुती सरकारच्या विरोधात काढणार जनआक्रोश मोर्चा

## मनसे-शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी सहभागी होण्याचे आवाहन

**देवळा ।** महायुती सरकारच्या विरोधात पुढील महिन्यात काढण्यात येणाऱ्या जनआक्रोश मोर्चात देवळा तालुक्यातील शिवसेना व मनसेच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन शिवसेनेचे संपर्कप्रमुख जयंत दिंडे यांनी येथे केले.

रविवारी (दि २४) देवळा येथे हॉटेल आमंत्रणमध्ये महायुती सरकारच्या विरोधात काढण्यात येणाऱ्या जनआक्रोश मोर्चा संदर्भात शिवसेना व मनसेच्या पदाधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेण्यात आली. यावेळी त्यांनी वरील आवाहन केले.




या बैठकीत शिवसेनेचे जिल्हाप्रमुख डी. जी सूर्यवंशी, मनसेचे प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील यांनीही उपस्थित बैठकीत मार्गदर्शन केले. महायुती सरकारच्या कार्यकाळात महिला सुरक्षित नाहीत. कांद्यासह इतर शेत मालाला भाव नसल्याने शेतकरी वर्ग कर्जबाजारी होत चालला असून, आत्महत्या वाढल्या आहेत. बेरोजगार वाढली आहे. वाढत्या महागाईने सर्व सामान्य जनतेला जगणे मुश्कील झाले आहे. आदी समस्यांनी राज्यातील जनता त्रस्त झाल्याने शिवसेना व मनसेच्यावतीने येत्या १२ सप्टेंबर रोजी शासनाला जाग आणण्यासाठी जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. यासाठी देवळा येथे संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात आले होते . याप्रसंगी ग्रामीण जिल्हाप्रमुख नितीन आहेर, शिवसेनेचे तालुकाप्रमुख प्रशांत शेवाळे , मनसेचे प्रदेश उपाध्यक्ष रतनकुमार इचम, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, मनसेचे तालुकाप्रमुख दत्ता पवार यानंसह बापू जाधव, भरत देवरे, दीपक देवरे, विजय जगताप, सुनील शिंदे, बाबूलला पवार, भास्कर आहिरे, सुनील निकम, शरद गांगुर्डे, संजय ठाकरे, विलास शिंदे, विजय आहेर, गोरख गांगुर्डे, किरण जाधव, प्रेमनाथ देवरे, नितीन शेवाळे, उत्तम शेवाळे, बबन शेवाळे, संभाजी शेवाळे, चेतन शेवाळे, निंबा शेवाळे, खंडू जाधव आदी उपस्थित होते.

# राष्ट्रीय क्रीडा दिन ध्यानचंदचं अढळ स्थान !

राष्ट्रीय क्रीडा दिन हा विविध देशांमध्ये राष्ट्रीय क्रीडा संघ आणि त्या देशांच्या क्रीडा परंपरांचा सन्मान करण्यासाठी साजरा केला जाणारा सार्वजनिक सुट्टीचा दिवस आहे. या दिवशी विविध वयोगटातील लोक खेळांमध्ये भाग घेतात. दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी भारतात हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या स्मरणार्थ जयंती दिवशी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. ध्यानचंद या दिवशी जन्मलेल्या सर्वकालीन महान हॉकी खेळाडूंपैकी एक. हा दिवस भारतासाठी ऑलिम्पिकमध्ये तीनदा सुवर्णपदक जिंकणारे हॉकीपटू मेजर ध्यानचंद सिंग यांचा वाढदिवस आहे. त्यांच्या आत्मचरित्र गोल्स नुसार त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत १९२६ ते १९४९ मध्ये ९०० गोल केले. त्यांनी त्यांच्या घरच्या आणि आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत १८५ सामन्यांमध्ये ५७० गोल केले. १९५६ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मभूषण, भारतातील तिसरा-सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान केला, त्याच वर्षी ते मेजर पदासह सैन्यातून निवृत्त झाले.

मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार हा भारतातील खेळ जगतातला सर्वात उच्च पुरस्कार आहे. ध्यानचंद पुरस्कार अधिकृतपणे क्रीडा व खेळांमधील ध्यानचंद जीवन गौरव पुरस्कार हा खेळ जगतातील आजीवन कर्तृत्वासाठीचा भारतीय सरकार तर्फे देण्यात येणारा पुरस्कार आहे. १९२६ ते १९४८ या काळातील २० वर्षांपेक्षा जास्त कारकिर्दीत १००० पेक्षा अधिक गोल नोंदविणाऱ्या भारतीय हॉकीपटू ध्यानचंद यांच्या नावावर हा पुरस्कार देण्यात आला आहे. हा पुरस्कार दरवर्षी क्रीडा व युवा मंत्रालयाद्वारे सादर केला जातो. पहिला पुरस्कार हा २००२ साली देण्यात आला होता. ह्या पहिल्या पुरस्काराचे मानकरी होते शाहूराज बिराजदार (मुष्टियुद्ध), अशोक दिवाण (हॉकी) आणि अपर्णा घोष (बास्केटबॉल). दरवर्षी हा पुरस्कार ३ ते ५ खेळाडूंना देण्यात आला आहे.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आम्ही भारतीय खेळाडूंच्या कर्तृत्वाचा गौरव करतो आणि आपल्या संस्कृतीतील खेळांच्या मूल्याबद्दल जागरुकता निर्माण करतो. याशिवाय मेजर ध्यानचंद यांच्या वारशाचा आणि भारतीय खेळांसाठीच्या त्यांच्या बांधिलकीचा सन्मान करण्याचा हा दिवस आहे. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त देशभरात अनेक क्रीडा उपक्रम होतात. वय, लिंग किंवा क्षमता पातळी विचारात न घेता, कोणीही या इव्हेंटमध्ये सहभागी होऊ शकतो. लोकांना खेळांमध्ये सहभागी होण्यासाठी आणि निरोगी आणि सक्रिय जीवनशैलीला प्रोत्साहन देणे हे ध्येय आहे. राष्ट्रीय क्रीडा दिनी प्रमुख ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान केले जातात. ज्या खेळाडूंनी क्रीडा क्षेत्रात अपवादात्मक कामगिरी केली आहे ते ही पारितोषिके मिळविण्यास पात्र आहेत, जे भारतीय क्रीडा क्षेत्रातील सर्वात मोठे सन्मान आहेत.

आंतरराष्ट्रीय हॉकीमध्ये मेजर ध्यानचंद हे दिग्गज होते. १९२८, १९३२ आणि १९३६ च्या उन्हाळी ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकून भारताच्या पहिल्या ऑलिम्पिक हॅट्ट्रिकमध्ये त्याने महत्त्वाची भूमिका बजावली. ध्यानाला चांद म्हणून ओळखले



जात असे कारण तो दिवसभराच्या नियमित कामानंतर रात्री हॉकीचा सराव करत असे. त्याच्या कलेबद्दलचे समर्पण दाखवून खेळाडूंचे आश्चर्यकारक पराक्रम आणि त्यांचा समाजावर खोल प्रभाव, त्यांच्या वचनबद्धतेची आणि अपवादात्मक कामगिरीची आठवण करून देणारा हा महत्त्वाचा दिवस आहे. क्रीडा जगतात अमिट छाप सोडणाऱ्या खेळाडूंनाही हा



**प्रविण बागडे, नागपूर**
मो.नं. ९९२३६२०९१९
ई-मेल
pravinbagde@gmail.com

दिवस श्रद्धांजली अर्पण करतो.

राष्ट्रीय क्रीडा दिन हा ॲथलेटिसिझम, सांघिक कार्य आणि खिलाडूवृत्तीचा देशव्यापी उत्सव असल्याचे वचन देतो. दिवंगत भारतीय हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांना सन्मानित करणाऱ्या या वार्षिक सोहळ्यात, सक्रिय आणि निरोगी जीवनशैलीला चालना देण्यासाठी खेळाचे महत्त्व मान्य करण्यासाठी देशभरातील समुदाय एकत्र येतील. यावर्षी राष्ट्रीय क्रीडा दिन तीन दिवसीय फिटनेस चळवळ म्हणून साजरा केला जाईल, ज्याचे नेतृत्व फिट इंडिया मिशन करेल. विद्यार्थ्यांच्या जीवनात खेळ आणि शारीरिक तंदुरुस्तीच्या मूल्यावर भर देण्यासाठी या वर्षीच्या उत्सवाचा भाग म्हणून अनेक रोमांचकारी कार्यक्रम आणि उपक्रम आयोजित केले जातील. राष्ट्रीय क्रीडा दिन हा खेळाडूंच्या भावनेचा आणि शारीरिक तंदुरुस्तीच्या महत्त्वाचा उत्सव आहे. संघटित होण्याची, आमच्या खेळाडूंना पाठिंबा देण्याची आणि क्रीडा नायकांच्या आगामी पिढीला प्रेरित करण्याची ही वेळ आहे. त्यांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी, भारताने २०१२ मध्ये राष्ट्रीय क्रीडा दिनाची स्थापना केली. क्रीडा नायकाला श्रद्धांजली अर्पण करणे आणि शारीरिक तंदुरुस्ती आणि आरोग्यावर भर देऊन, दैनंदिन जीवनातील खेळांच्या मूल्याबद्दल जनजागृती करणे हे या उत्सवाचे उद्दिष्ट आहेत. या दिवशी, प्रमुख क्रीडा तारे भारताच्या राष्ट्रपतींकडून खेलरत्न, अर्जुन, द्रोणाचार्य आणि ध्यानचंद पुरस्कार यासारखे महत्त्वाचे पुरस्कार प्राप्त करतात.

मेजर ध्यानचंद मैदानी हॉकीपटू हे आतापर्यंतचे सर्वोत्कृष्ट खेळाडू असल्याचे अनेकांचे मत आहे. ध्यानचंद यांचा जन्म २९ ऑगस्ट १९०५ रोजी अलाहाबाद येथे कुशवाह राजपूत कुटुंबात झाला. ते रामेश्वर सिंह आणि शारदा यांचे पुत्र होते. मूल सिंग आणि रूप सिंग हे ध्यानचंद यांचे दोन भाऊ. नंतरचे एक हॉकीपटू तसेच, फील्ड हॉकीमध्ये भारतासाठी स्पर्धा केली आणि १९३२ आणि १९३६ ऑलिम्पिकमध्ये सुवर्ण पदके जिंकली. चंदच्या वडिलांनी ब्रिटिश भारतीय सैन्यात सेवा दिली, जिथे ते हॉकी संघाचे सदस्य होते. चंद त्याच्या अपवादात्मक चेंडू हाताळणी आणि गोल करण्याच्या कौशल्यासाठी प्रसिद्ध होते. या विजयांच्या पलीकडे, त्याचा प्रभाव १९२८ ते १९६४ दरम्यान झालेल्या आठ ऑलिम्पिकमध्ये दिसून येतो, जिथे भारताने सात वेळा फील्ड हॉकी स्पर्धा जिंकली.

राष्ट्रीय क्रीडा दिन विविध स्पर्धा, क्रीडा कार्यक्रम आणि शाळा, महाविद्यालये आणि क्रीडा संघटनांमध्ये उपक्रमांसह साजरा केला जातो. इव्हेंटमध्ये वारंवार मॅरेथॉन, शाळांमधील फिटनेस स्पर्धा, थलीट श्रद्धांजली समारंभ आणि फिटनेस आव्हाने यांचा समावेश होतो. यावर्षी राष्ट्रीय क्रीडा दिनाची अधिकृत थीम अद्याप घोषित झालेली नाही, परंतु शांततापूर्ण आणि सर्वसमावेशक समाजांना प्रोत्साहन देण्यासाठी खेळ आणि एक तास, खेळाच्या मैदानावर या सारख्या थीमचा उल्लेख वेगवेगळ्या स्त्रोतांमध्ये केला जात आहे. ही थीम थलेटिक्स सामाजिक बंधने कशी मजबूत करू शकतात, व्यक्तींना एकत्र आणू शकतात आणि सर्वसमावेशकता आणि शांतता वाढवण्यासाठी समुदायांना आवश्यक असलेली साधने कशी देऊ शकतात यावर प्रकाश टाकते. आज त्यांच्या १२० व्या जयंती निमित्त सर्वांना राष्ट्रीय क्रिडा दिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

जीवनाच्या या पथावर, थांबला तो संपला।
राहिला चालत निरंतर, तोच येथे जिंकला।।

# पाकिस्तानचा उद्दामपणा !

पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री इशाक दार यांनी नुकतीच बांगलादेशला भेट दिली.२०१२ साली पाकिस्तानच्या तत्कालीन परराष्ट्रमंत्री हिना रब्बानी खार यांनी बांगलादेशला भेट दिली होती.त्यानंतर १३ वर्षांनी पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री बांगलादेशच्या दौऱ्यावर गेले.शेख हसीना वाजेद या जेंव्हा बांगलादेशच्या पंतप्रधान होत्या, तेंव्हा त्यांनी पाकिस्तानला खड्यासारखे बाजूला ठेवले होते, परंतु २०२४ मध्ये झालेल्या विद्यार्थ्यांच्या हिंसक आंदोलनानंतर, शेख हसीना यांना बांगलादेश मधून पळ काढावा लागला आणि त्यांच्या जागी आलेल्या मोहंमद युनूस यांच्या सरकारने पाकिस्तान बरोबर जवळीक साधायला सुरुवात केली.

मध्यंतरी दोन वेळा बांगलादेशचे मुख्य सल्लागार मोहंमद युनूस हे काही कार्यक्रमाच्या निमित्ताने पाकिस्तानचे पंतप्रधान शहाबाज शरिफ यांना भेटले.या पार्श्वभूमीवर इशाक दार यांचा बांगलादेश दौरा महत्वाचा मानावा लागेल.इशाक दार हे बांगलादेशचे परराष्ट्र सल्लागार तौहिद हुसेन यांना भेटले.बांगलादेश बरोबरचे राजनैतिक संबंध सुधारण्याबरोबरच व्यापार, सांस्कृतिक संबंध वृद्धिंगत करण्याबाबत दोन देशांमध्ये करारमदार झाले.

मात्र बांगलादेशने आपल्या पुर्वीच्या काही मागण्या इशाक दार यांच्या समोर जोरदारपणे मांडल्या.सर्वात महत्वाची मागणी म्हणजे बांगलादेश स्वातंत्र्य संग्रामात पाकिस्तानी लष्कराने, पूर्व पाकिस्तानातील जनतेवर जे अनन्वित अत्याचार केले,जो नरसंहार केला त्याबद्दल पाकिस्तानने, बांगलादेशची अधिकृत माफी मागितली पाहिजे.बांगलादेश स्वतंत्र झाल्याला आता ५४ वर्षे उलटून गेल्यानंतरही, पाकिस्तानने अद्याप बांगलादेशची अधिकृत माफी मागितलेली नाही.इशाक दार यांनीही माफी मागितली नाहीच.हा विषय १९७४ साली आणि नंतर २००२ साली जेंव्हा परवेझ मुशर्रफ हे पाकिस्तानचे अध्यक्ष होते तेंव्हा सोडविण्यात आला आहे,असे गुळमुळीत उत्तर,इशाक दार यांनी दिले.

बांगलादेशची दुसरी मागणी अशी होती की १९७१ साली जेंव्हा बांगलादेश स्वतंत्र झाला तेंव्हा पुर्वीच्या पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान यांच्या ज्या संयुक्त मालमत्ता होत्या,त्यांची वाटणी झालीच नाही.त्याकरता बांगलादेशचा हिस्सा म्हणून पाकिस्तानने बांगलादेशला ४.५२ बिलियन डॉलर्स इतकी रक्कम द्यावी,अशी मागणी बांगलादेशकडून यापूर्वी वारंवार करण्यात आली आहे.मात्र पुर्वीच्या पाकिस्तानी राज्यकर्त्यांप्रमाणे,इशाक दार यांनीही बांगलादेशच्या या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लावल्या.



अभय गोखले

बांगलादेशची आणखी एक महत्त्वाची मागणी म्हणजे, बांगलादेश स्वातंत्र्य संग्रामाला,बांगलादेशस्थित,ज्या पाकिस्तान्यांनी तेंव्हा विरोध केला, त्यांना पाकिस्तानने परत घ्यायला हवे.या पाकिस्तान्यांनी, ज्यांमध्ये जमाते इस्लामी पक्षाच्या कार्यकर्त्यांचा मोठ्या प्रमाणात समावेश होता, त्यांनी पाकिस्तानी लष्कराला सर्वप्रकारची मदत केली होती.पाकिस्तानी लष्कराने, बांगलादेशी जनतेवर जे अत्याचार केले त्यांमध्ये या कार्यकर्त्यांनी पाकिस्तानी लष्कराला मदत तर केलीच शिवाय ते अत्याचार करण्यात सहभागीही झाले होते.

बांगलादेश स्वतंत्र झाल्यानंतर अवामी लीगच्या कार्यकर्त्यांनी,त्याचा सूड घेतला, त्यामुळे भयभीत झालेल्या, बांगलादेशस्थित पाकिस्तानी नागरिकांनी अशी मागणी केली की पाकिस्तानने त्यांना परत घ्यावे,परंतु तत्कालीन पाकिस्तानी राज्यकर्त्यांनी त्यांना परत घेण्यास नकार दिला कारण पाकिस्तानच्या लेखी त्यांची गरज आता संपली होती.मात्र बांगलादेशने गेली अनेक वर्षे ही मागणी लावून धरली असून, पाकिस्तानने त्या मागणीला वारंवार नकार दिला आहे.

इशाक दार यांनी बांगलादेशचे मुख्य सल्लागार मोहंमद युनूस यांची भेट घेतली.युनूस यांनी पदभार स्वीकारल्यानंतर पाकिस्तानबरोबरील संबंध वृद्धिंगत करण्यावर विशेष भर दिला आहे.बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीच्या प्रमुख खलेदा झिया यांनी नेहमीच पाकिस्तानला अनुकूल अशी भूमिका घेतली आहे.तसेच जमाते इस्लामी हा पक्ष तर उघडपणे पाकिस्तानवादी आहे.शिवाय सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षणाला प्रखर विरोध करून, त्याविरोधात हिंसक आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी नेत्यांनी मध्यंतरी नॅशनल सिटिझन्स पार्टी या पक्षाची स्थापना केली असून हा पक्षही पाकिस्तानशी जवळीक साधून आहे.या सर्वांची इशाक दार यांनी भेट घेतली.या सर्वांमध्ये एक गोष्ट कॉमन आहे,ती म्हणजे ते कट्टर भारत विरोधी आहेत.

शेख हसीना या बांगलादेशच्या पंतप्रधान असताना त्यांनी, भारताबरोबर नेहमीच जिव्हाळ्याचे संबंध राखले होते.बांगलादेश स्वातंत्र्य संग्रामाला ज्यांनी विरोध केला आणि देशाशी गद्दारी केली त्यांच्या विरोधात, शेख हसीना यांनी खटले दाखल केले आणि त्यांना शिक्षा देववली.परंतु जुलै २०२४ मध्ये आरक्षणाविरोधात विद्यार्थ्यांनी जे आंदोलन केले ते आंदोलन, शेख हसीना यांना व्यवस्थितपणे हाताळता आले नाही.त्यांनी पाशवी बळाचा वापर करून ते आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न केला.त्यामुळे आंदोलन चिघळले आणि परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे,त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी बांगलादेश मधून पलायन करण्याचा निर्णय घेतला.शेख हसीना यांचे पलायन पाकिस्तानच्या पथ्यावर पडले असून, बदलत्या परिस्थितीत, बांगलादेशला आपल्या बाजूला वळवण्यासाठी पाकिस्तानचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत.बांगलादेश स्वातंत्र्य संग्रामात पाकिस्तानी लष्कराने पूर्व पाकिस्तानातील जनतेवर जे अनन्वित अत्याचार केले,त्याबद्दल पाकिस्तानने बांगलादेशची अधिकृत माफी मागावी अशी मागणी बांगलादेशकडून पुन्हा एकदा करण्यात आली असली तरी, पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री इशाक दार यांनी तिला वाटाण्याच्या अक्षता लावल्याने, पाकिस्तानचा खरा चेहरा पुन्हा एकदा बांगलादेशच्या जनतेसमोर आला आहे.

## वाचक लिहितात

### कार्यकर्त्यांवर नियंत्रण ठेवा !

गणेशोत्सव काळात मुंबईतील लालबाग, परळ, खेतवाडी, गिरगाव ही खास आकर्षण केंद्र असतात. मुंबईतीलच नव्हे, तर राज्यासह देश विदेशातील भाविक, पर्यटक या ठिकाणी गणपती पाहण्यासाठी दरवर्षी गर्दी करतात. लांबच लांब रांगा, रस्त्यावरील विद्युत रोषणाई आणि विक्रेत्यांनी समस्त परिसर दिवस रात्र गजबजलेला असतो. या कालावधीत गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांना मात्र वेगळेच बळ आलेले असते. दूरवरचा प्रवास करून तासन तास रांगेत उभे राहणाऱ्या भक्तांना धक्काबुक्की करणे, त्यांच्याशी विनाकारण वाद घालणे, शिवीगाळ करणे, धमकावणे, स्त्रियांशी असभ्य भाषेत बोलणे, परिचयाच्या माणसांना रांगेत पुढे घेऊन जाणे यांसारखे प्रकार काही मंडळाच्या कार्यकर्त्यांकडून घडताना सर्रासपणे पाहायला मिळतात. कार्यकर्त्यांच्या आणि सुरक्षा रक्षकांच्या अरेरावीचे अनेक प्रसंग या ठिकाणी प्रतिदिन घडत असतात. त्यामुळे गणेशोत्सवाचा राजा नेमका कोण ? गणपती कि कार्यकर्ता हा प्रश्नच पडतो. कार्यकर्त्यांच्या अशा वागण्याने मंडळासह उत्सवाच्या प्रतिमेलाही धक्का लागतो. त्यामुळे अशा अतिउत्साही कार्यकर्त्यांवर मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी नियंत्रण ठेवण्याची नितांत आवश्यकता आहे.

**सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

### गणपती बाप्पा मोरया !

गणपती उत्सव २०२५ संपूर्ण भारतात आणि जगभरात तेवढ्याच भक्तिभावाने आणि उत्साहाने साजरा केला जाणार आहे. हा उत्सव विघ्नहर्ता, बुद्धीचा देव, समृद्धी आणि सौभाग्याचा अधिपती असलेल्या श्री गणेशाच्या जन्मोत्सवाचे प्रतीक आहे. घराघरात आणि सार्वजनिक मंडळांत गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करून आरती, पूजन आणि प्रसाद म्हणून मोदकांचा नैवेद्य अर्पण केला जातो. हा उत्सव केवळ धार्मिकच नाही तर सांस्कृतिक दृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा असून यात कला, संगीत आणि सामूहिक एकोप्याचा सुंदर संगम दिसतो. गणपती उत्सवाचे महत्त्व समाजात एकता, भक्तीभाव आणि सकारात्मकता निर्माण करण्यात आहे. हा उत्सव नवीन उपक्रम सुरू करण्याची प्रेरणा देतो, ज्ञानाची आणि यशाची वाट दाखवतो तसेच अडचणींवर मात करण्याचे बळ प्रदान करतो. विसर्जनाची प्रथा जीवनातील निर्माण आणि विलय यांचे तत्त्व शिकवते व आसक्ती सोडून देण्याचे महत्व पटवते. २०२५ मध्येही हा उत्सव आशा, सौहार्द आणि सांस्कृतिक अभिमानाचा दीपस्तंभ ठरेल आणि लोकांना श्री गणेशाच्या दैवी उपस्थितीची अनुभूती देत समाजबंध दृढ करेल. गणपती बाप्पा मोरया याच गजरात सर्वत्र गणेश बाप्पाचे आगमन केले जाते. बाप्पा येताना सुख समृध्दी घेऊन येतो आणि आपल्याला शुभाशीर्वाद देऊन जातो. म्हणूनच भक्तिभावाने आणि श्रद्धेने त्याचे अस्तिव अनुभवण्याचा प्रयत्न करून आनंदात गणेशोत्सव साजरा करूया.

**आल्हाद माळगावकर , पनवेल**

### ऑनलाइन गेम्स : नवे संकट

भारतात ऑनलाइन गेमिंग प्लॅटफॉर्मच्या वाढत्या वापरामुळे व्यसनाधीनता, मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम, तसेच आर्थिक शोषण यांसारख्या समस्या गंभीर स्वरूपात दिसत आहेत. अनेक युवक अभ्यास, झोप आणि सामाजिक आयुष्याकडे दुर्लक्ष करून सतत गेम खेळतात, ज्यामुळे चिडचिडेपणा, तणाव आणि चिंता वाढते. या समस्यांवर उपाय म्हणून वेळेची मर्यादा, पालक नियंत्रण, खर्चाची मर्यादा, वय तपासणी प्रणाली, तसेच या गेम्सचे प्लॅटफॉर्म रद्द करणे आवश्यक आहे. तसेच, सायबरसुरक्षा आणि वैयक्तिक माहितीचे संरक्षण हा एक गंभीर मुद्दा आहे. अनेक गेम्स वापरकर्त्यांकडून वैयक्तिक तपशील घेतात, ज्यामुळे फसवणूक आणि डेटा चोरीचा धोका वाढतो. यासाठी राष्ट्रीय सायबर सुरक्षा निकष, सामग्रीचे नियमन, -आधारित फिल्टर्स, चॅट मॉनिटरिंग, आणि कडक समुदाय मार्गदर्शक तत्त्वे आवश्यक आहेत. यासोबतच शाळा, शिक्षक आणि पालकांनी एकत्र येऊन सकारात्मक डिजिटल वर्तन प्रोत्साहन देणाऱ्या मोहिमा राबवणे, हेही दीर्घकालीन समाधान ठरू शकते.

# आद्य गणेश..आरंभ गणेश..!



लवकरचं श्री गणेशाचे मोठ्या प्रेमाने, हर्षाने, भक्तिभावाने आगमन होईल. शास्त्रोक्त पद्धतीने भाद्रपद शुक्ल श्रीगणेश चतुर्थी पासुन ते अनंत चतुर्दशी पर्यंत बाप्पा आपल्या सर्वांना तन-मन-धनाने सेवा समर्पित करण्याची संधी देणार आहे. महाराष्ट्रात गणेशत्सोवाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. धार्मिक परंपरा भक्तिभावाची अतूट जोड आहे. कुठल्याही शुभ कार्यांची सुरुवात श्रीगणेश स्तवनाने तद्वतच पाद स्पर्शानेचं होत असते.

श्री गणेश ही आरंभ देवता आहे. ती वेदांचीही आद्य देवता आहे.ती वेदांनीही प्रतीपादली आहे. आत्मस्वरूपात रमलेली बुद्धी ही श्रीगणेश आहे. कैवल्य साम्राज्यमूर्ती माऊली महावैष्णव संत ज्ञानेश्वर महाराज ज्ञानेश्वरी च्या पहिल्या ओवीत म्हणतात.

ओम नमोजी आद्या
वेद प्रतिपाद्या जय जयाजी स्वसंवेद्या
आत्मरूपा देवा तूंचि गणेशु
सकलमति प्रकाशु
म्हणे निवृत्तीदासु अवधारी जो जी

माऊलींनी श्री गणेशाचे फार सुंदर वर्णन ज्ञानेश्वरीत केलेले आहे. ज्याप्रमाणे माऊलींनी ओमकार हाच परमात्मा आहे, असे कल्पून ज्ञानेश्वरीस प्रारंभ केला. अगदी तसाच शांतीब्रह्म संत एकनाथांनी सुद्धा गजवंदन करून भावार्थ रामायण लेखनास प्रारंभ केला.

वेदवेदांतवेद्या वंद्यही परमवंद्या
स्वसंवेद्या श्रीगणेशा तुझे निर्धारिता रुप
केवळ स्वरूपाचे स्वरूप तेथे अवयव
कल्पिता अमूप तव कल्पनेचा लोप
स्वरूपी तुझ्या या लागी जैसा असशी
तैसियासी नमन साकार निराकारासी
तवं अंगत्व मुकले अंगत्वासी भज्य
भजले भजकांसी अव्दैत

अशा शब्दात संत एकनाथांनी भावार्थ रामायणानातून गणेश वंदना केली आहे. अनादी अश्या वेद वेदांनाही परम वंदनीय असलेल्या आणि जो केवळ स्वतःला जाणू शकतो. अशा श्री गणेशाला संत एकनाथ भावार्थ रामायणातून वंदन करतात. 'तूं' म्हणजे अरुपाचे रुप आहेस. तुझे अवयव कल्पना न करावी एवढी आहेत. शेवटी कल्पनेचा लोप होतो. त्यामुळे तू जसा असशील साकार वा निराकार रूपात असशील; तसे तुला नमन असो. तुझ्या भक्तीने भक्त आणि तुझ्यातलं व्दैतत्त्व संपून जातं.

श्री गणेशाचे स्तवन हा ग्रंथकाराचा अथवा संत वांङ्मयाचा महत्त्वाचा भाग राहिलेला आहे. संत तुकारामाने रचलेल्या गाथेतील पुढील अभंगातून श्री गणेशाच्या ओमकार रूपाचे वर्णन वेदवाणीच्या प्रमाणाने दिले आहे.

ओमकार प्रधान रूप गणेशाचे
हे तिन्ही देवांचे जन्मस्थान
अकार तो ब्रह्म उकार तो विष्णू
मकार महेश्वर जाणियेला
ऐसे तिन्ही देव जेथोनि उत्पन्न
तो हा गजानन मायबाप
तुका म्हणे ऐसी आहे वेदवाणी
पहावी पुराणी व्यासांचिया

सृष्टीच्या उत्पत्तीच्या वेळी जो नादब्रम्ह झाला तो ओमकारआहे. अकार, उकार, मकार या तिन्हीं मात्रांनी ओमकार सिद्ध होतो. यातील अकार विश्वनिर्मितीचे अधिकारी ब्रह्मदेव. उकार श्रीहरी विष्णू सृष्टीचे पालनकर्ते. तर श्री शंकर म्हणजे मकार होय. ब्रम्हा, विष्णू, महेश हे तिन्ही देव मूळ गणेश तत्वापासून निर्माण झाले आहे. तुकाराम महाराज म्हणतात... हे जर खोटे वाटत असेल तर व्यासांच्या पुराणांना विचारावे. श्री गणेश आद्य व आरंभदेवता कशी आहे हे संत साहित्यातून उमगते.

समर्थ रामदास स्वामींनी सुद्धा दासबोध ग्रंथाच्या पहिल्या दशकाच्या दुसऱ्या समासात श्री गणेशाचे स्तवन केलेले आहे.


ओम नमोजी गणनायका
सर्व सिद्धी फलदायका अज्ञान भ्रांती
छेदता बोधरूपा

असे वर्णन केलेले आहे. अशा एकंदरीत श्री गणेश स्तवनाच्या तीस ओव्या आहेत. संत आणि सत्पुरुषांनी केलेल्या व्याख्यानावरून आणि वर्णनावरून श्री गणेशाचे आद्यत्व, निराकत्व,निर्गुणातत्व, आणि त्या मागचा आध्यात्मिक अर्थ स्पष्ट होतो. श्री समर्थांनी रचललेल्या गणेशाच्या आरतीतील भाव फार सुंदर आहे.

दास रामाचा वाट पाहे सदना संकटी
पावावे निर्वाणी रक्षावे सुरवर वंदना
जय देव जय देव जय मंगलमूर्ती
दर्शन हेळामात्रे कामनापुर्ती

इथे त्यातला भाव असा आहे की, तू आमच्या घरी येऊन कधी स्थापन होशील. तुझी स्थापना करून मागणे मागायचे आहे. तुझी उपासना केल्यानंतर तू आम्हाला संकटातून सोडवशील. कारण तू आदी, अंत, मध्य तूच तू आहे. कारण पालनकर्ता, तारणहार, बुद्धीदाता, विघ्ननाशाय साधकांचा चिंतामणी आहेस. तुला वारंवार नमन.

जय गणेश.. जय गणेश..!



**शशिकांत मधुकर तोटे**
**दारव्हा, जि. यवतमाळ**
**९१३०८३५४५८**

# हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद

आज २९ ऑगस्ट, राष्ट्रीय क्रीडा दिन. हॉकीचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद या महान खेळाडूचा गौरव म्हणून हा दिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. या दिवशी राष्ट्रपतींच्या हस्ते खेळाडूंना खेलरत्न पुरस्कार, अर्जुन पुरस्कार आणि द्रोणाचार्य पुरस्कारांचे वितरण केले जाते. शिवाय खेळातील सर्वोच्च जीवनगौरव पुरस्कार म्हणून २००२ पासून मेजर ध्यानचंद पुरस्कार देण्यात येतो. आपल्या कारकिर्दीत खेळात असामान्य कर्तृत्व दाखवणाऱ्या आणि निवृत्तीनंतरही त्या खेळासाठी जीवन वेचणाऱ्या क्रीडापटूला मेजर ध्यानचंद जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खेलरत्न पुरस्काराला देखील मेजर ध्यानचंद यांचे नाव देऊन मेजर ध्यानचंद यांच्या कार्याचा यथोचित असा गौरव केला आहे.

ज्या खेळाडूंनी वर्षभर सर्वोत्तम कामगिरी करून जागतिक पातळीवर देशाचे नाव उज्ज्वल केले आहे अशा खेळाडूंना हा पुरस्कार दिला जातो. हा पुरस्कार क्रिडा क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार समजला जातो.

२९ ऑगस्ट १९०५ रोजी उत्तरप्रदेश मधील अलाहाबाद येथे मेजर ध्यानचंद यांचा जन्म झाला. त्यांचे वडील सोमेश्वर दत्त हे आर्मीमध्ये असल्याने त्यांच्या वारंवार बदल्या होत. वडिलांच्या निवृत्तीनंतर १९२२ मध्ये वयाच्या सोळाव्या वर्षी ते स्वतः आर्मीत दाखल झाले. त्यावेळी ते आर्मीच्या रेजिमेंटमध्ये होणाऱ्या हॉकी सामन्यात खेळत असे. हॉकीतील त्यांचे कौशल्य पाहून मेजर बाले तिवारी यांनी त्यांना हॉकीमधील बारकावे शिकवले. ते त्यांचे हॉकीमधील गुरू होते. पुढे मेजर ध्यानचंद हॉकीमध्ये इतके रमले की हॉकी हाच त्यांचा जीव की प्राण ठरला. १९२२ ते १९२६ या कालावधीत त्यांनी रेजिमेंटच्या विविध स्पर्धांमध्ये आपले कौशल्य दाखवले. हॉकीतील त्यांच्या कर्तुत्वामुळे न्यूझीलंड दौऱ्यावर जाणाऱ्या इंडियन आर्मी संघात त्यांची निवड झाली. हा दौरा त्यांनी गाजवला. या दौऱ्यात त्यांनी आपल्या संघाला १८ विजय मिळवून दिले. दोन लढती बरोबरीत सुटल्या तर केवळ एका लढतीत पराभव स्वीकारला. हा दौरा त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला. या दौऱ्याने त्यांना जगभर नाव मिळवून दिले. या दौऱ्यानंतर त्यांना लान्स नायक म्हणून बढती मिळाली. केवळ भारतातीलच नाही तर जगभरातील दिग्गज खेळाडू त्यांच्या खेळाच्या प्रेमात पडले. मेजर ध्यानचंद यांचे हॉकी खेळण्याचे कौशल्य अफलातून होते. चेंडूवरचे नियंत्रण ही त्यांची खासियत



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

होती. चेंडू त्यांच्या ताब्यात असताना, मैदानात कोणी खेळत नाही असेच वाटायचे. चेंडू त्यांच्या स्टीक जवळून हलतच नसे म्हणून त्यांच्या स्टिकमध्ये चुंबक बसवला आहे अशी अफवा तेंव्हा पसरली होती. हॉकी हा सांघिक खेळ आहे तो संघ भावनेनेच खेळला पाहिजे असे त्यांचे मत होते म्हणूनच चेंडूवर अफलातून नियंत्रण असूनही ते आपल्या सहकाऱ्यांना अचूक पास द्यायचे. हॉकीतील त्यांच्या या कौशल्यामुळेच त्यांना हॉकीचे जादूगार असे म्हटले जाते. मेजर ध्यानचंद यांनी आपल्या जादुई खेळाने देशाला १९२८ (एमस्टरडॅम) १९३१ (लॉस अँजेलीस) १९३६ (बर्लिन) अशा



सलग तीन ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये सुवर्णपदक जिंकून दिले होते. १९३६ मधील भारत जर्मनी यांच्यात झालेल्या ऑलिम्पिकच्या अंतिम लढतीत ध्यानचंद यांनी एकहाती विजय मिळवून दिला होता. ही लढत पाहायला जर्मनीचे हुकूमशहा एडॉल्फ हिटलर उपस्थित होते. ध्यानचंद यांच्या खेळाने ते चांगलेच प्रभावित झाले. ध्यानचंद यांच्या हॉकीतील कौशल्याने जर्मनीचा हुकूमशहा एडॉल्फ हिटलर यांनाही वेड लावले होते. त्यांच्या असामान्य कौशल्याने भारावलेल्या हिटलर यांनी त्यांना जर्मन नागरिकत्व देण्याची तसेच इंग्लिश इंडियन आर्मीत मेजरपद व कर्नल पदापर्यंत बढती देण्याचीही ऑफर दिली होती ; पण देशप्रेमी आणि स्वाभिमानी ध्यानचंद यांनी ती नम्रपणे नाकारली होती. लॉस अँजेलीस मध्ये खेळलेल्या भारतीय संघाचे वर्णन एका अमेरिकन पत्रकाराने पूर्वेकडील वादळ असे केले होते. ध्यानचंद १९५६ मध्ये निवृत्त झाले. त्याचवर्षी भारत सरकारने त्यांना पद्मभूषण देऊन गौरवले. निवृत्तीनंतर पटियाला येथील क्रीडा संस्थेत मुख्य प्रशिक्षक म्हणून त्यांनी तरुण खेळाडूंना प्रशिक्षण दिले. ३ डिसेंबर १९७९ रोजी या महान खेळाडूचे निधन झाले. भारताला सुवर्णयुगाची अनुभूती देणाऱ्या या महान हॉकीच्या जादूगाराला मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने गौरवावे अशीच तमाम भारतीय क्रीडा रसिकांची इच्छा आहे.

हॉकीचे जादुगर मेजर ध्यानचंद यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन !

## अशोकायन...

### वन्दे - मातरम्

हॅलो हॅलो
काय म्हणता ?
'वन्दे मातरम्'
म्हणू या ... !

स्वतंत्र भारताचे
आपण नागरीक
देशाची स्वतंत्र
ओळख निर्माण करू या !!



**प्रा.अशोक सारडा मेहकर**
**(९४२२३९४३३९)**

## ताडदेवकरांना दिलासा पण हा खेळ उघड झाला कसा ?

**मुंबई, दि. २८ : प्रतिनिधी**

ताडदेवमधील वेलिंग्टन हाइट्स इमारतीतील शेकडो रहिवाशांच्या डोक्यावर कोर्टाच्या आदेशामुळे घरं गमावण्याची नामुष्की ओढवली होती. बिल्डरच्या गैरव्यवहारामुळे आणि वर्षानुवर्षे रखडलेल्या ऑक्युपन्सी सर्टिफिकेटच्या फाईलमुळे सामान्य नागरिकांना बेघर होण्याची भीती निर्माण झाली होती. मात्र, या सर्व गोंधळात एका धावत्या निर्णयाने नागरिकांना दिलासा मिळाला. रहिवाशांची काहीही चूक नसताना त्यांना शिक्षा होऊ नये, या भूमिकेतून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने हस्तक्षेप केला. संबंधित विभागाला "सर्व अनुपालन पूर्ण असेल तर ओसी द्या" असा आदेश देऊन नागरिकांचे डोळ्यातले पाणी पुसले. या निर्णयानंतर ताडदेवकरांमध्ये आनंदाची लहर उसळली आहे. "जनतेवर अन्याय होऊ नये, यासाठी देवाभाऊ नेहमीच सोबत उभे राहतील" असे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी ठणकावले. मुख्यमंत्री फडणवीसांच्या हस्तक्षेपाबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. अखेर वेलिंग्टन हाइट्सच्या रहिवाशांना न्याय मिळाला, पण या प्रकरणाने बिल्डर-प्रशासनातील काळा कारभारही चव्हाट्यावर आला आहे. पुढचा मोठा धक्का कोणाला बसतो, हे पाहणं बाकी आहे.

## 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमातून संपूर्ण राज्यात नागरिकांची आरोग्य तपासणी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचा पुढाकार

**मुंबई, दि. २८ : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून संपूर्ण महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये 'श्रीगणेशा आरोग्याचा' या विशेष मोहिमेअंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत.

या उपक्रमात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांशी संलग्न तज्ज्ञ डॉक्टर यांचा संयुक्त सहभाग राहणार आहे. याशिवाय मोठ्या संख्येने गणेश मंडळे या उपक्रमात सक्रिय सहभागी झाले आहेत. मंडपांमध्ये किंवा जवळपास उभारण्यात येणाऱ्या शिबिरांमध्ये गणेशभक्त आणि स्थानिक नागरिक यांची मोफत आरोग्य तपासणी केली जात आहे.




शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना केंद्र व राज्य शासनाच्या आरोग्य योजनांची माहिती दिली जाणार असून, तपासणी दरम्यान आजार आढळणाऱ्या रुग्णांना पुढील उपचार संबंधित योजनांतर्गत मोफत उपलब्ध करून दिले जात आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमाचा उद्देश फक्त तपासणीपुरता मर्यादित नसून नागरिकांच्या आरोग्याबाबत सातत्यपूर्ण जागरूकता निर्माण करणे हा देखील आहे.

प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्थापन करण्यात आलेल्या कक्षाच्यावतीने गणेश मंडळांशी संपर्क साधून भव्य आरोग्य शिबिरे राबवली जात आहेत. यात महात्मा फुले जन आरोग्य योजनेत नोंदणीकृत रुग्णालये, स्थानिक वैद्यकीय महाविद्यालये, तसेच धर्मादाय रुग्णालयांचे तज्ज्ञ डॉक्टर आणि त्यांची संपूर्ण टीम सक्रिय सहभागी झाले आहेत.

नागरिकांना या उपक्रमाची माहिती मिळावी यासाठी मागील आठवडाभर गणेश मंडळांकडून बॅनर, पत्रकांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती सुरू आहे. परिणामी या शिबिरांचा लाभ घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक आणि भाविक पुढे येत आहेत. आरोग्य तपासणीच्या माध्यमातून उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, कर्करोग आदी आजारांचे लवकर निदान करून वेळेत उपचार मिळण्याची सोय होणार आहे.

गणेशोत्सवासारख्या मोठ्या सणाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे ही मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांची अभिनव कल्पना आहे. 'श्री गणेशा आरोग्याचा' या उपक्रमातून हजारो नागरिकांना त्यांच्या आरोग्याची मोफत तपासणी करण्याची संधी मिळत आहे. तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या रुग्णांना पुढील मोफत उपचारही दिले जाणार आहेत. हा उपक्रम म्हणजे आरोग्यसेवेतील लोकाभिमुख आणि जनहिताचा उत्तम आदर्श ठरत आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष प्रमुख श्री रामेश्वर नाईक यांनी कळविले आहे.

## बालसंगोपन संस्थांतील मुलांच्या मानसिक आरोग्यासाठी "मासूम" मुख्यमंत्र्यांच्या संवेदनशील निर्णयामुळे 3,337 मुलांना लाभ

**मुंबई, दि. २८ : प्रतिनिधी**

राज्यातील बालसंगोपन संस्थांमध्ये (Child Care Institutions - CCI) राहणाऱ्या समस्याग्रस्त आणि विधी संघर्षीत मुलांना मानसिक आरोग्यसेवा व समुपदेशन करण्यासाठी महिला व बालविकास विभाग एमपॉवर संस्थेच्या माध्यमातून "मासूम" प्रकल्प राबवित आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील निर्णयामुळे या प्रकल्पाचा आजपर्यंत ३,३३७ मुलांना लाभ झाला असून एकूण ९५९३ वैयक्तिक समुपदेशन सत्रे पार पडली आहेत.

महाराष्ट्रातील महिला व बालविकास विभाग (WCD) राज्यातील बालकल्याण व मानसिक आरोग्याच्या कार्याला बळकटी देण्यासाठी, आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या Mpower या उपक्रमामार्फत 'मासूम' प्रकल्प राबवीत आहे. या प्रकल्पांतर्गत अडचणीत असलेल्या व विधी संघर्षीत मुलांना, जे बाल संगोपन संस्थांमध्ये (Child Care Institutions – CCIs) राहतात, त्यांना मानसिक आरोग्य सेवा व समुपदेशन (counselling) पुरवले जाते. हा सार्वजनिक-खाजगी भागीदारीचा उपक्रम, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आला आहे.

सेवेची भावना या उद्देशाने व बांधिलकीने Mpower व आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या संस्थापिका व अध्यक्षा, श्रीमती नीरजा बिर्ला यांनी अनेक उपक्रम राबवले आहेत. त्यांच्या प्रयत्नातून १८० दशलक्षाहून अधिक लोकांपर्यंत पोहोचून, Mpower हे दक्षिण आशियातील मानसिक आरोग्य साक्षरता, क्षमता-वृद्धी आणि सामुदायिक संपर्कावर लक्ष केंद्रित करणारे सर्वांत मोठे खासगी व्यासपीठ ठरले आहे.

महिला व बालविकास विभाग (WCD) सोबतच्या सामंजस्य करारानंतर हा प्रकल्प मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर आणि नाशिक या विभागांमध्ये राबवला जात आहे. एकूण १९ बालसंगोपन संस्थांना पाच मानसशास्त्रज्ञाच्या टीमकडून सेवा दिल्या जात आहेत. या प्रकल्पांतर्गत मानसशास्त्रज्ञ रोटेशन पद्धतीने सीसीआयला भेट देतात, स्तिथीपरत्वे समुपदेशन करतात, मुलांचे मानसिक आरोग्य स्क्रिनिंग करतात आणि गरजेनुसार थेरपी सेवा पुरवतात. याशिवाय गंभीर प्रकरणांमध्ये बालकल्याण समिती (CWC) आणि किशोर न्याय मंडळाला (JJB) तज्ज्ञांचे सहकार्य दिले जाते. थेरपिस्ट काही मुलांच्या आरोग्य आणि मानसिक परिस्थितीनुसार त्यांचे तणाव मापन पट्टी (Stress Scale), आक्रमकता मापन पट्टी (Aggression Scale), स्थिती-गुणधर्म चिंतामापन चाचणी (State Trait Anxiety Test), मानसिक आरोग्य व कल्याण मापन पट्टी (Psychological Well-Being Scale) यांसारख्या साधनांद्वारे सखोल परीक्षण केले जाते.

मुलांच्या कुटुंबियांनाही समुपदेशनाची सुविधा दिली जाते. पालकांचे समुपदेशन केल्याने , मुले घरी परतल्यावर त्यांना पुर्वीप्रमाणे मोकळे वातावरण मिळेल हा या प्रकल्पाचा उद्देश आहे. मासूम प्रकल्प हा राज्यातील बालसंगोपन संस्थांमध्ये मानसिक आरोग्य सेवांना बळकटी देणारा ठरला असून मुलांच्या पुनर्वसन प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

या प्रकल्पासंदर्भात Mpower व आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या संस्थापिका व अध्यक्षा नीरजा बिर्ला म्हणाल्या की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील संस्थांमध्ये राहणाऱ्या मुलांच्या मानसिक आरोग्याला दिलेले प्राधान्य हे दूरदर्शी नेतृत्वाचे द्योतक आहे. या सार्वजनिक-खासगी भागीदारीद्वारे Mpower चे कार्य म्हणजे अडचणीत असलेल्या व विधी संघर्षीत मुलांना त्वरित ट्रॉमा रिलिफ व सर्वसमावेशक मानसशास्त्रीय आधार देणे. प्रशिक्षित मानसशास्त्रज्ञांच्या मदतीने विद्यमान प्रणालीला बळकटी देऊन मुलांच्या पुनर्वसन व समाजात पुन्हा समावेशक होण्यासाठी सुरक्षित व सहाय्यकारी वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

## 'माविम'च्या माध्यमातून बारामतीच्या महिलांकडून 40 मेट्रिक टन हिरवी मिरची दुबईला निर्यात

**मुंबई, दि. २८ : प्रतिनिधी**

ग्रामीण महिलांना औद्योगिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) 'नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पा'अंतर्गत विविध उपक्रम राबवित आहे. या अंतर्गतच बारामतीतील ३० महिला शेतकऱ्यांनी उच्च दर्जाची हिरवी मिरची पिकवून तब्बल ४० मेट्रिक टन उत्पादन दुबईला निर्यात केले असून यामुळे इतर महिलांनाही प्रोत्साहन मिळत आहे.

ग्रामीण महिलांनी कृषी क्षेत्रात नेतृत्व करत आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळविले आहे. महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) यांच्या मार्गदर्शनाखाली बारामतीतील ३० महिला शेतकऱ्यांनी उच्च दर्जाची हिरवी



मिरची पिकवून तब्बल ४० मेट्रिक टन उत्पादन दुबईला निर्यात केले. हा उपक्रम 'नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पा'अंतर्गत राबविण्यात आला.

या उपक्रमाची अंमलबजावणी संघर्ष क्लस्टर मायक्रो रिसोर्स सेंटर (CMRC), बारामती यांच्या माध्यमातून झाली असून कृषी विज्ञान केंद्र, बारामती यांनी तांत्रिक मार्गदर्शन केले. तसेच खरेदी व बाजारपेठेसाठी आदी नेचर फूड्स प्रा. लि. यांच्याशी खरेदी हमी करार करण्यात आला.

**शेतीत आधुनिक पद्धतींचा अवलंब**

२२ एकर क्षेत्रावर प्रायोगिक तत्वावर सुरू झालेल्या या शेतीत ठिबक सिंचन, मल्चिंग पेपर, सेंद्रिय खतांचा वापर व एकात्मिक कीड व्यवस्थापनासारख्या आधुनिक पद्धतींचा अवलंब करण्यात आला. नेदरलँड तंत्रज्ञानावर आधारित उगमशिव मिरचीची रोपेही वापरण्यात आली.

एकूण उत्पादनात प्रति महिला सरासरी ६,००० किलो मिरची मिळाली. त्यात स्मिता पवार (७,६९२.५ किलो), रोहिणी जाधव (७,६६७.५ किलो) आणि राणी जामधडे (६,०५२.५ किलो) यांचे विशेष योगदान राहिले.

अनियमित पाऊस, काढणी नंतरची गुणवत्ता व निर्यातीतील आव्हाने यावर मात करण्यासाठी सतत फील्ड मार्गदर्शन, पीक विमा सल्ला व प्रक्रिया प्रशिक्षण दिले गेले. पुढील टप्प्यात उत्पादनाच्या गुणवत्तेसाठी स्थळावर ग्रेडिंग युनिट उभारण्याची योजना आहे.

**कृषी मूल्यसाखळीत महत्त्वपूर्ण भूमिका**

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील महिलांचे आर्थिक उत्पन्न वाढले असून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचा अनुभव, तांत्रिक ज्ञान आणि उद्योजकीय कौशल्य विकसित झाले आहे. ग्रामीण महिला जागतिक कृषी मूल्यसाखळीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात, हे या प्रयोगातून अधोरेखित झाले आहे. बारामतीचा हा यशस्वी उपक्रम ग्रामीण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी एक 'स्केलेबल व रीप्लिकेबल मॉडेल' ठरत आहे.

## जरांगे ओबीसीतूनच का मागतात? आरक्षणाच्या रणांगणात फडणवीसांचा थेट सवाल

**मुंबई, दि. २८ : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर पुन्हा एकदा राज्यातील राजकारण पेटले आहे. किल्ले शिवनेरीवरून निघालेला मनोज जरांगे यांचा मोर्चा सध्या मुंबईच्या दिशेने कूच करत आहे. "आरक्षण घेतल्याशिवाय माघारी नाही" असा पवित्रा घेतलेल्या या मोर्च्यामुळे मुंबईत प्रवेशाच्या आधीच सरकार व प्रशासनाची झोप उडाली आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आक्रमक सूर लावत जरांगे यांच्या मागण्यांवर थेट सवाल उभा केला आहे. "मराठा समाजाला आम्ही स्वतंत्र १० टक्के आरक्षण दिले. तरीसुद्धा जरांगे ओबीसी प्रवर्गातूनच आरक्षणाची मागणी का करतात? ओबीसी प्रवर्गात



आधीच ३५० जाती आहेत. मग तरीही ही मागणी का?" असा प्रश्न उपस्थित करत फडणवीसांनी आंदोलकांवर अप्रत्यक्ष दबाव टाकला.

त्याचवेळी त्यांनी मराठा व ओबीसी समाजाला एकमेकांसमोर उभे न करण्याचे आश्वासन दिले. "दोन्ही समाजांच्या हितांचे रक्षण करणे हीच सरकारची जबाबदारी आहे. न्यायालयाने ठरवलेल्या चौकटीत आंदोलन झाले तर चर्चेतून प्रश्न सोडवू," असे ते म्हणाले.

शिवनेरीवरून निघालेला मराठा मोर्चा आता आझाद मैदानावर उपोषणासाठी सज्ज होत असताना, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर वाहतूक आणि कायदा सुव्यवस्था बिघडण्याचा धोका वाढला आहे. सरकार आणि आंदोलकांमधील चर्चेतून काही तोडगा निघतो का, की आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या राजकारणाला पेटवतो, हे पाहणे आता सर्वांचेच लक्ष लागलेले आहे.

फडणवीसांचा थेट सवाल आणि जरांगे यांचा निर्धार – यानंतर मराठा आरक्षणाचे रणांगण आणखी तापणार, यात शंका नाही!

## सणासुदीच्या हंगामानिमित्त ॲमेझॉनने ४० नवीन आश्रय सेंटर्स सुरू करण्यासाठी एचपीसीएलसोबत सहयोग केला

**मुंबई, २८ ऑगस्ट :** ॲमेझॉन इंडियाने आज हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) सोबत सहयोग करून देशभरात ४० नवीन आश्रय सेंटर सुरू करण्यासाठी प्रोजेक्ट आश्रयचा विस्तार करण्याची घोषणा केली. दिल्लीच्या वायव्य मतदारसंघातील माननीय खासदार योगेंद्र चंडोलिया यांनी नवी दिल्लीच्या रोहिणी परिसरात या नवीन सेंटर्स उद्घाटन केले. उद्घाटनाला एचपीसीएलचे नॉन-फ्यूल बिझनेसचे कार्यकारी संचालक मुरलीकृष्ण व्ही. वाद्रेवू, ॲमेझॉन ऑपरेशन्सचे भारतातील संचालक सलिम मेमन आणि ॲमेझॉन यूएस ट्रान्सपोर्टेशन, सस्टेनेबिलिटी व कूपर पब्लिक पॉलिसीचे उपाध्यक्ष ॲश्ले डि ला टोरे उपस्थित होते. यासह ॲमेझॉनची आता १३ शहरांमध्ये ६५ आश्रय सेंटर आहेत, ज्यासह कंपनी २०२५ च्या अखेरपर्यंत अशी १०० सेंटर स्थापन करण्याच्या उद्दिष्टाच्या जवळ पोहोचली आहे. ॲमेझॉन आता दिल्ली एनसीआरमध्ये एकूण २४ आश्रय सेंटर चालवते.

''प्रोजेक्ट आश्रय भारतात झपाट्याने विस्तारणाऱ्या गिग अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक आहे आणि मी ॲमेझॉनच्या दूरदृष्टीचे कौतुक करतो,'' असे दिल्ली वायव्य मतदारसंघाचे माननीय खासदार श्री. योगेंद्र चंडोलिया म्हणाले. ''आपला देश डिजिटल व्यापार पायाभूत सुविधा मजबूत करत असताना ही सेंटर डिलिव्हरी व्यावसायिकांना आवश्यक पाठिंबा देतात, जे दररोज लाखो कुटुंबांशी आमचे व्यवसाय जोडतात. भारताच्या आर्थिक विकासाच्या अजेंडाला पुढे नेताना कामगारांच्या प्रगतीला चालना देणाऱ्या अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांना सरकारचा मोठा पाठिंबा आहे. या उपक्रमामधून निदर्शनास येते की, तुमच्या कामाप्रती तुमचे समर्पण खरोखर उल्लेखनीय आहे, तसेच अत्यंत कौतुकास्पद आहे.''

''ॲमेझॉनमध्ये आम्ही आमच्या डिलिव्हरी सहयोगींच्या कल्याणाला प्रथम प्राधान्य देतो,'' असे ॲमेझॉन ऑपरेशन्सचे भारतातील संचालक सलिम मेमन म्हणाले. ''ही आश्रय सेंटर गर्दीच्या रहदारी आणि प्रतिकूल हवामान परिस्थितीतून मार्ग काढताना डिलिव्हरी सहयोगींना सामना कराव्या लागणाऱ्या आव्हानांचे निराकरण करतात. सर्व डिलिव्हरी कर्मचाऱ्यांना ते कोणत्याही कंपनीसाठी डिलिव्हरी करतात याकडे न पाहता आवश्यक सुविधा मोफत उपलब्ध करून देत आम्ही डिलिव्हरी सहयोगींच्या कल्याणाप्रती आमची कटिबद्धता अधिक दृढ करत आहोत. एचपीसीएलसोबतचा आमचा सहयोग आम्हाला हे नेटवर्क वेगाने विस्तारण्यास आणि भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या आघाडीच्या कर्मचाऱ्यांना पाठिंबा देण्यास सक्षम करतो.''

## झी टीव्हीवरील लोकप्रिय शो जमाई नं. १ घेणार प्रेक्षकांचा निरोप!


**मुंबई, २८ ऑगस्ट:** झी टीव्हीवरील लोकप्रिय कौटुंबिक नाट्य जमाई नं. १ आता एका भावनिक पण समाधानकारक शेवटासह संपणार आहे. नील परांजपे (अभिषेक मलिक) आणि रिद्धी चोटवानी (सिमरन कौर) यांची प्रेमकहाणी, त्यांचे संघर्ष आणि कांचन चोटवानी (पापिया सेनगुप्ता) यांनी घडवून आणलेली नाट्यमय वळणे या सगळ्यांमुळे या शोने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. मालिकेच्या केंद्रस्थानी आहे नीलचा अनोखा प्रवास, जो चोटवानी कुटुंबाचा घरजमाई होऊन आपल्या खेळकर आणि वेगळ्या अंदाजात त्यांच्या जीवनात हलकासा गोंधळ माजवतो. या कथानकात रोमांस, कौटुंबिक नातेसंबंध आणि उच्चस्तरीय नाट्य यांचे सुंदर मिश्रण करून प्रत्येक वळणावर प्रेक्षकांना खिळवून ठेवण्यात आले.

मालिकेदरम्यान अनेक रंगतदार पात्रांची ओळख करून देण्यात आली, ज्यांना निशिगंधा वाड आणि सोनल वेंगुर्लेकर यांसारख्या प्रतिभावान कलाकारांनी पडद्यावर जिवंत केले आणि त्यामुळे कथेला अधिक गहिरेपणा व आकर्षण प्राप्त झाले. कथानक शेवटाकडे सरकताना प्रेक्षकांना न्याय मिळाल्याचे दिसेल, तर नील आणि रिद्धी अखेर एकत्र येऊन त्यांच्या प्रेमाचा उत्सव साजरा करतील हा तो आनंदी शेवट आहे, ज्याची चाहत्यांना आतुरतेने प्रतीक्षा होती.

आपल्या प्रवासाबद्दल विचार मांडताना अभिषेक मलिक म्हणाला, जमाई नं. १ सारख्या शोसाठी काम करणे हा एक अप्रतिम अनुभव होता, ज्यामध्ये अविस्मरणीय क्षण, वैयक्तिक प्रगती आणि अनेक आठवणी मिळाल्या. नीलची भूमिका साकारताना आधार देणारा मुलगा, संरक्षक पती, आणि सर्व अडचणींवर मात करून प्रेम व न्यायासाठी उभा राहणारा व्यक्ती अशा अनेक भावना मला अनुभवता आल्या. प्रत्येक भागाने मला त्या पात्रात प्रामाणिकपणा, भावना आणि सूक्ष्मता आणण्यास प्रवृत्त केले; आणि मला प्रत्येक क्षणाचा मनापासून आनंद मिळाला. सिमरन एक अप्रतिम सहकलाकार ठरली असून, आमची जुळलेली मैत्री पडद्यावरच्या केमिस्ट्रीत नैसर्गिकपणे उमटली, ज्यामुळे कथा आणखी हृदयस्पर्शी व प्रभावी झाली. आपल्या समर्पणाने, उत्कटतेने आणि सर्जनशीलतेने प्रत्येक दृश्याला उंची दिली त्या सर्व कलाकार व तांत्रिक टीमसोबत काम करणे हेही तेवढेच प्रेरणादायी ठरले. प्रेक्षकांनी नील आणि रिद्धीच्या कथेशी जोडून घेतलेले नाते पाहणे अत्यंत समाधानकारक आहे आणि आम्हाला मिळालेले प्रेम व पाठबळ मी नेहमीच जपून ठेवेन.

आपल्या अनुभवाबद्दल बोलताना सिमरन कौर म्हणाली, रिद्धी माझ्या हृदयात नेहमीच एक खास स्थान ठेवेल. तिची भूमिका साकारणे हा भावनांचा एक अविस्मरणीय प्रवास होता ताकद, असुरक्षितता, प्रेम, जिद्द आणि चिकाटी या सगळ्यांनी मिळून तिचा प्रवास घडवला. हा अनुभव खरोखरच संस्मरणीय ठरला कारण मला इतके मजबूत आणि अनोखे व्यक्तिमत्त्व साकारण्याची संधी मिळाली. या शोच्या संपूर्ण कलाकार व तांत्रिक टीमसोबत काम करणे आनंददायी होते; प्रत्येक दृश्यात आम्ही एकमेकांना पाठबळ दिले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मी त्या चाहत्यांची मनःपूर्वक आभारी आहे ज्यांनी सुरुवातीपासून नील आणि रिद्धीच्या प्रेमकथेला नेहमीच दाद दिली. आनंदी आणि समाधानकारक शेवटासह शो संपवणे म्हणजे प्रेमाचा आणि आपल्याला जोडणाऱ्या नात्यांचा उत्सवच वाटतो.

## शब्दकोडे क्रमांक २२०४



**आडवे शब्द :-**
१) पायापर्यंत लोंबणारा अनेक पदरी हार
६) तोंड वासून मोठ्या आवाजात रडणे
१०) धनी
११) सोने
१३) चाळीस शेराचे वजन
१४) वाहणारी हवा
१६) दरवाजा
१७) जिव्हामूलावर लोंबणारा एक मांसपिंड
२०) चावी
२१) रंग
२२) कौशल्य, पटुत्व
२३) तमाशातील एक लोकप्रिय गीतप्रकार
२५) पदार्थाचा सूक्ष्मकण
२६) बांबू
२८) रेशीमासारखा एक प्रकारचा मऊ कापूस
२९) आश्चर्य
३१) भाळाचा झोपाळा
३२) होडी
३३) निरर्थक भटकंती
३४) कुंतीचे पांच पुत्र
३५) अगदी सारखे
३७) गरीब, साधानीतिमान
३९) वालुकामय जमीन
४०) सेवक
४३) नंतर
४५) मोठे माकड
४७) मदतनीस
४८) समुद्रकिनारा
५०) श्रीमंत
५२) अल्प, थोडे
५३) किंमत
५४) दृष्टीभेट
५७) समशेर
६०) दिनांक
६१) गवताचे पान
६२) मीठ
६५) दारू, मद्य
६६) मुख चेहरा
६९) भुईपाडळ नावाची वेल
७१) शाई वा रंगाचा ठिपका कलंक
७२) कर्ज देणारा
७४) क्वचित
७५) मान्यतेचा शब्द
७६) एक प्रश्नार्थक शब्द
७७) बेडकाचे ओरडणे

**उभे शब्द :-**
१) कमीतकमी व जास्तीत जास्त
२) सामान
३) अर्धांगवायू
४) निद्रा
५) जत्रेतील लाकडी घोड्याचा फिरता पाळणा
६) छिद्र
७) कोलकाताचे विमानतळ
८) गोव्याची राजधानी
९) सडक पथ
१२) दारावरील आवाज
१५) दशानन
१८) स्तुती
१९) बारदान
२४) वरपांगी, दिखाऊ
२५) मनाचा ओढा
२६) कीव येणे, व्यथित होणे
२७) उत्तराधिकारी
२८) हिंदीत श्रावण
३०) पर्णवस्त्र
३१) वर्षप्रतिपदा
३२) अंधार
३५) दुष्ट स्त्री, प्रारब्ध देवता
३६) महिना
३७) वर्षानुवर्षे
३८) युद्ध
४१) राजा
४२) मनगटात बांधलेला मंतरलेला धागा
४४) विधवा
४६) माणूसघाणा, मत्सरी
४९) तृण
५०) भटक्या एका जागी स्थिर, मुक्काम न करणारा
५१) दारू पिणे
५५) वाकलेला, नम्र
५६) राख
५८) छोटासा
५९) वाळूवर रेघोट्या मारून भविष्य सांगण्याची विद्या
६३) बारीक झणझण
६४) सुगंध
६७) पत्थर
६८) फुरसत
७०) च्या बरोबर
७२) प्रामाणिक
७३) तुरुंग

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



## महत्त्वाचे

### प्रा. संजय पवार यांना मानाचा राज्यस्तरीय साहित्य भूषण पुरस्कार

**सिन्नर ।** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मेडिकल लॅब टेक्निशियन या कोर्स बद्दल गोडी निर्माण करून असंख्य विद्यार्थ्यांना रोजगार, स्वयंरोजगार निर्मितीसाठी अथक परिश्रम घेतले. तसेच अनेक पुस्तके लिहून साहित्य क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले, याबद्दल सिन्नर येथील मराठा विद्या प्रसारक समाजाच्या गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील प्रा. संजय पवार यांना



तेजस बहुउद्देशीय सामाजिक संस्था नाशिक यांचा मानाचा राज्यस्तरीय साहित्य भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार सोहळा डॉ. मौलाना आझाद संशोधन केंद्र संभाजीनगर येथे नुकताच संपन्न झाला. याप्रसंगी सिने अभिनेत्री मेघा डोळस, कवी सुभाष सोनवणे यांचे शुभहस्ते पुरस्कार वितरण संपन्न झाले. पवार यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सरचिटणीस अँड. नितीन ठाकरे, संचालक कृष्णाजी भगत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन. यू.पाटील, उपप्राचार्य प्रा. आर. व्हि. पवार, उप प्राचार्य एस.पी. शेलार, प्रा. गिरीष गुजराथी, प्रा. सुनील भागवत, प्रा. गणेश पाटील, प्रा. जयंत महाजन, प्रा. कैलास काळे, प्रा. देवराम ढोली, प्रा. आर. टी. सोनवणे, बाळासाहेब डावरे, प्रा. दत्ता वेळजाळी, सिन्नर सह्याद्रीचे संचालक सुदाम शिंदे, मधुकर डावरे, विद्यार्थी, ग्रामस्थ यांनी प्रा. पवार यांचे अभिनंदन केले.

### आजार, विकारांवर संगीतोपचार प्रभावी ठरतात : डॉ. नेहा लाड

**नाशिक ।** शरीर व मनाचे योग्य संतुलन निरोगी जीवनासाठी महत्वाचे आहे हे विज्ञानही सांगते. संगीत ही केवळ करमणूक नसून ते मनावर औषधाप्रमाणे प्रभावी ठरते. उच्च व कमी



रक्तदाब, डिप्रेशन व विविध आजार, विकारांवर संगीतोपचार प्रभावी ठरतात. डॉ.नेहा लाड यांनी असे प्रतिपादन स्वरवेद संगीत थेरपी केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना केले. स्वर सुगंध संगीत अकॅडमी गुरूपौर्णिमा उत्सव व स्वर वेद संगीत थेरपी केंद्राच्या उद्घाटनाचा कार्यक्रम हर्ष - राज सभागृहात आयोजित करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नितीन लाड, डॉ.नेहा लाड, पवार तबला अकादमीचे संचालक नितीन पवार, त्वचाविकार तज्ज्ञ डॉ. सदानंद नायक, दीपा नायक, पाटबंधारे विभाग कार्यकारी अभियंता सोनल शहाणे आदी मान्यवर उपस्थित होते. अर्चना अरगडे यांनी स्वागत केले. त्या म्हणाल्या, संगीताचे मार्गदर्शन करतांना त्याचे सामर्थ्य उमजले. पुढे त्याचा उपयोग सामाजिक स्वास्थ्यासाठी व्हावा असे ठरवल्यावर अनेकांचे सहकार्य लाभले. त्यातूनच स्वरवेद संगीत थेरपी केंद्राची निर्मिती झाली. राखी पाटील यांनी प्रास्ताविक केले.

### डॉ. पवार रुग्णालयात होणाऱ्या कार्यशाळेत मोफत तपासणी

**नाशिक ।** नाकाचे हाड व बाहेरील आकार वाकडा असणे, दुभंगलेल्या ओठांमुळे नाक वाकडे असणे, नाकाचा जास्त उंचवटा, चपटे नाक, नकटे नाक, खूप मोठे नाक अशा आणि इतर नाकाच्या




सौंदर्यावर तसेच कार्यावर परिणाम करणाऱ्या समस्या सुधारण्यासाठी मविप्रच्या आडगाव येथील डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय व संशोधन केंद्रात होणाऱ्या कार्यशाळेत सेप्टो-रायनोप्लास्टी केल्या जाणार आहेत. या कार्यशाळेअंतर्गत रुग्णांची मोफत विशेष तपासणी व रोगनिदान मोहिम राबविली जाणार असून, या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन रुग्णालयाच्या कान, नाक, घसा विभागाच्यावतीने करण्यात आले आहे. या कार्यशाळेत जागतिक दर्जाचे शल्यचिकित्सक डॉ. क्षितिज पाटील व डॉ. राजेंद्र नेहेते शस्त्रक्रिया करणार आहेत. यासाठी लागणाऱ्या सर्व तपासण्या मोफत होणार असल्याने त्याकरिता विशेष तपासणी मोहिमेचा लाभ गरजूंनी घ्यावा, तसेच आडगाव येथील मविप्र रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभागातील कान, नाक, घसा कक्ष क्र. ९ येथे त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, सर्व पदाधिकारी व संचालक आणि शिक्षणाधिकारी डॉ. ज्ञानेश्वर लोखंडे, अधिष्ठाता डॉ. सुधीर भामरे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. वसंतराव कवडे व कान नाक घसा विभाग प्रमुख प्रा.डॉ.श्रिया कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाख़ाली ही कार्यशाळा आयोजित केली जाणार आहे.

# प्रवासी 'गोदावरीच्या राजा'ला लागला ब्रेक...

## राजकारण्यांसह रेल्वे प्रशासनाचा ढिसाळ कारभार; प्रवाशांसह चाकरमाने,शालेय विद्यार्थी आणि नागरिकांचे हिरमोड...

नैवेद्या बिदरी

**मनमाड ।** एकीकडे देशभरासह राज्यात वर्षभर वाट पाहून श्री गणरायाचे आगमन होत असतानाच राज्यातच नव्हे तर देशात प्रवासी गणपती म्हणून ओळख असलेल्या गोदावरी राजाचे प्रवास थांबल्याने प्रवाशांसह चाकरमाने,शालेय विद्यार्थी आणि नागरिकांचे हिरमोड झाल्याचे पहावयास मिळाले.

देशासह राज्यात ख्याती असलेल्या उत्तर महाराष्ट्र सह नाशिक जिल्ह्यातील चाकरमान्यांची वाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मनमाड - लोकमान्य टिळक टर्मिनस - मनमाड कुर्ला गोदावरी एक्सप्रेस गणेश मंडळ या मंडळाचा धावत्या गाडीतील श्री गणेश उत्सवाला यंदाही ब्रेक लागणार आहे. अनेक वर्ष सातत्यपूर्ण मागणी करूनही गोदावरी एक्सप्रेस सुरू झाली नाही. त्यामुळे चाकरमान्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. त्यामुळे श्री गणरायाला घडणारा मनमाड ते कुर्ला हा दररोज तीनशे किलोमीटरचा प्रवास याही वर्षी गणेशोत्सवात खंडित होणार आहे. मंडळाचे २७ वर्ष होते. गेल्या २७ वर्षापासून धावत्या गाडीमध्ये साजरा होणारा


(फोटो : संग्रहित)

हा गणेशोत्सव नाशिक जिल्ह्यात नव्हे तर राज्यातसह देशात प्रसिद्धीच्या झोतात आला होता. मनमाड-कुर्ला गोदावरी एक्सप्रेस या गाडीमध्ये दरवर्षी नियमित प्रवास करणारे चाकरमाने व प्रवासी वर्ग यांनी गणेश मंडळाच्या माध्यमातून या उत्सवाचा श्री गणेश केला गोदावरी एक्सप्रेसच्या सीजन तिकिट अर्थात मासिक पास बोगीत आकर्षक सजावट करून श्री गणरायाच्या मूर्तीची स्थापना दरवर्षी केली जात होती. मनमाडहून गाडी सुटल्यानंतर आणि परतीच्या प्रवासात नाशिक येथून गाडी सुटल्यानंतर दररोज गाडीमध्ये श्रींची आरती होऊन सर्व प्रवाशांना प्रसाद वितरण केले जात होते. यानिमित्त मासिक पासबोगीची आकर्षक सजावट करून सुशोभित करण्यात येत होती. पण कोविड काळात गोदावरी एक्सप्रेस बंद झाली त्यानंतर रेल्वेने स्वतंत्र बोगी उपलब्ध करून दिली त्या बोगीमध्ये या गणेशाची स्थापना होऊ लागली. मात्र गोदावरी एक्सप्रेस पुन्हा सुरू व्हावी यासाठी चाकरमान्यांसह प्रवासी आणि विद्यार्थी देखील आग्रही होते. वारंवार खासदार आणि केंद्रीय मंत्री भारती पवार यांना मागणी करून देखील मनमाड लोकमान्य टिळक टर्मिनस कुर्ला मनमाड गोदावरी एक्सप्रेस सुरू न झाल्याने यंदाच्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये त्यांना पराभवाचा झटका देखील बसला. दरम्यान लोकसभेच्या निवडणुकी वेळी शरदचंद्र पवार गटाचे भास्कर भगरे यांनी गोदावरी एक्सप्रेसचा हायलाईट करत निवडणूक जिंकली.मात्र अद्यापही विद्यमान खा.भास्कर भगरे यांना गत वर्षभरात हा प्रश्न सोडवण्यात यश आले नाही.

### गाडी बदलली पण गोदावरी एक्सप्रेस सुरु झाली नाही...

गोदावरी एक्सप्रेस पूर्ववत सुरू करावी, अशी वारंवार मागणी करूनही ही गाडी अद्याप पर्यंत सुरू होत नाही. याच गाडीच्या वेळेत समर स्पेशल पर्यायी मनमाड मुंबई गाडी सुरू करण्यात आली होती. त्यानंतर सध्या गोदावरी एक्सप्रेस ऐवजी धुळे -मुंबई ही पर्यायी गाडी या वेळेत धावते पण या गाडीमध्ये गणेशोत्सवात श्रींची स्थापना करणे आणि गणेशोत्सव साजरा करणे शक्य नाही. दरम्यान मतदारसंघातील खासदार बदलला तरी प्रश्न मार्गी लागला नाही अशी चर्चा मतदारसंघात होत आहे.

> गोदावरीच्या राजाचा प्रवास सलग दुसऱ्या वर्षी थांबला आहे. कारण गोदावरी एक्सप्रेस अजून सुरू झालेली सुरू झालेली नाही. रेल्वेच्या असहकाराच्या धोरणामुळे उत्सव करू शकत नाही. रेल्वे प्रशासनाकडे प्रवासी संघटनेने सातत्याने पाठपुरावा करूनही रेल्वे प्रशासन गोदावरी एक्सप्रेस का सुरू करू शकत नाही याची ठोस कारण देत नाही. कोरोना काळापासून रेल्वेने ही गाडी रोखून धरली आहे. प्रवासी संघटनेने वेळोवेळी राजकीय पक्षांसह रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा केला. मात्र रेल्वे प्रशासनाच्या आडमुठे धोरण व असहकारामुळे गोदावरीच्या राजाचा प्रवास आखेर थांबला..
>
> **– नरेंद्र खैरे, मंडळाचे जेष्ठ कार्यकर्ते व प्रवास संघटना सदस्य**

## बहिणीला भेटून घरी परतणाऱ्या भावाचा मृत्यू...



**मनमाड ।** मनमाड- नांदगाव रोडवरील नागापूर गावा नजीक असलेल्या



वळणावर बुधवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास मनमाडहून नांदगावकडे जाणाऱ्या दुचाकी स्वाराचा दुचाकी वरील नियंत्रण सुटल्याने भरधाव वेगात रस्त्याच्या मधोमध असलेल्या दुभाजकाला धडकल्याने भीषण अपघात घडला या अपघातामध्ये ३३ वर्षीय चालकाला हातापायाला आणि डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली.

याबाबत अधिक माहिती अशी की, बुधवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास शहरापासून नजीक असलेल्या नागपूर येथील वळणावर बहिणीला भेटून होंडा शाईन कंपनीच्या एमएच-४१ बीयू ४८७२ या दुचाकीहून घरी परतत असतांना दुचाकी वरील नियंत्रण सुटल्याने भरधाव वेगात रस्त्याच्या मधोमध असलेल्या दुभाजकाला धडकल्याने भीषण अपघात घडला. या अपघातामध्ये हातापायाला आणि डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने समाधान भिका हिरे, वय - ३३, रा. साकोरा येथील तरुणाचा जागीच मृत्यू झाले.

**मनमाड नांदगाव रस्ता झाला मृत्यूचा सापळा...**

मनमाड - नांदगाव रस्त्यावर गतिरोधक नसल्याने वेगाने वाहने धावतात. त्यातच या आठवड्यातील अपघाताची ही दुसरी घटना आहे. दरम्यान या रोडच्या बाजूला पदचाऱ्यांसाठी बनवण्यात आलेल्या फूटपाथवर अतिक्रमण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे.तसेच मनमाड नजीकच इंधन कंपन्या व गॅस कंपनी असल्याने मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची वाहतूक या रस्त्याने होत असते.दरम्यान अवजड वाहने हे बेशिस्तपणे रस्त्यावर उभे राहत असल्याने यापूर्वी अनेक अपघात देखील झाले आहेत.

## सी. पी. राधाकृष्णन यांना आ. अँड. राहुल ढिकले यांनी दिल्या शुभेच्छा!



**उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीतील एनडीएचे अधिकृत उमेदवार, महाराष्ट्राचे राज्यपाल आदरणीय सी. पी. राधाकृष्णन यांची राजभवन, मुंबई येथे नाशिक पूर्वचे आमदार ॲड. राहुल ढिकले यांनी भेट घेतली. यावेळी त्यांना उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी दिल्या. याप्रसंगी समवेत शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे आ. दिलीपजी बोरसे उपस्थित होते.**

## मैत्रीचे नाते जपणाऱ्यांपैकी एक नाव म्हणजे शैलेश कुटे : साहेबराव साळुंखे

**नाशिक ।** मैत्री हे एक असं नातं आहे जे प्रत्येकाच्या जीवनात महत्त्वाचं स्थान ठेवतं. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर मैत्रीचं नातं आपल्याला आनंद, सहकार्य आणि आधार देतं. ह्या नात्याची खासियत म्हणजे ते कोणत्याही स्वार्थाशिवाय आणि अपेक्षाशिवाय असतं. खरं तर मैत्रीची व्याख्या करणं खूप अवघड आहे. ढोबळमानाने मैत्री म्हणजे दोन किंवा अधिक व्यक्तींमध्ये असलेल्या आपुलकीचं आणि विश्वासाचं नातं. अशा प्रकारचे नाते जपणाऱ्यांपैकी एक नाव म्हणजे हॉटेल एसएसके ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे संचालक शैलेश कुटे होय, असे मत यशस्वी उद्योजक साहेबराव साळुंखे यांनी व्यक्त केले. शैलेश कुटे यांच्या ५८



व्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय जनता पक्षाचे माजी शहर प्रमुख गिरीश पालवे होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक सतीशबापू सोनवणे, नायब तहसीलदार सुधीर सातपुते, महापालिकेतील अभियंता समीर रकटे, भाजपचे नेते गणेश कांबळे आदी उपस्थित होते. श्री साळुंखे पुढे म्हणाले की, मैत्रीच्या नात्यात आपल्याला कोणतंही बंधन नसतं, आणि ती आपल्या मनाला, विचारांना आणि भावनांना समजून घेणारी असते. मानव एक सामाजिक प्राणी आहे. एकटेपणा कोणालाही सहन होत नाही. जीवनात आपल्याला अशा व्यक्तींची गरज असते ज्यांच्याशी आपण आपल्या भावना, विचार शेअर करू शकू. मैत्री ही ह्या गरजेची पूर्तता करते. शैलेश कुटे यांनी सर्वांशीच मैत्रीचे संबंध जोपासले. यावेळी शिवसेनेच्या शिंदे गटाचे नेते नितीन साळवे म्हणाले की, मैत्रीचे अनेक प्रकार असू शकतात. प्रत्येक प्रकारचं नातं वेगळं असतं आणि त्यात वेगवेगळ्या भावना, अनुभव असतात. बालपणातील मैत्री ही कायमच स्मरणात राहते. जॉगर्स क्लब चे अध्यक्ष दीपक भोसले, शेखरआप्पा निकुंभ, जगदीश कोठिया, जॉनी शिंदे, सुभाष कडलग, दादा माळी, शिवा देशमुख, मुन्ना हिरे, माणिक काठे, राजू पटेल, रंजीते आदींनी मनोगते व्यक्त केली. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशीभाई कन्सारा यांनी सूत्रसंचालन केले. भाजपचे नेते प्रशांत कोटकर यांनी आभार मानले.

## महाराष्ट्र प्लंबिंग असोसिएशनतर्फे झाला जलसंवर्धक मित्रांचा सन्मान

**नाशिक ।** समाजात प्लंबरचे महत्व खूप मोठे आहे. त्यांना जल अभियंता म्हणणे योग्य असून तो त्यांचा बहुमान आहे. देशात सर्वात श्रेष्ठ प्लंबर नरेंद्र मोदी आहेत. कारण त्यांनी देशाची आर्थिक पाईपलाईन स्वच्छ केल्याने शासनाचा प्रत्येक पैसा थेट खालपर्यंत पोहोचतो असे प्रतिपादन आ. सीमा हिरे यांनी केले.

महाराष्ट्र प्लंबिंग असोसिएशनच्या १४ व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सोमवारी (दि.२५) उंटवाडी रोडवरील इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग असोसिएशनच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात प्लंबिंग व जलसंवर्धन क्षेत्रात सातत्याने योगदान देणाऱ्या ११ प्लंबर मित्रांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आ. सीमा हिरे, भाजपा शहराध्यक्ष सुनील केदार, पोलिस उपअधीक्षक गुलाब पाटील, उपस्थित होते. नामदेव चौधरी यांनी स्वागत केले. संस्थेचे अध्यक्ष रवि पाटील यांनी संस्थेच्या कार्याविषयी प्रास्ताविकात माहिती व वाटचालीचा आढावा घेतला. ते म्हणाले, संघटनेच्या राज्यभरात २२ शाखा असून लवकरच ३ शाखा सुरू होत आहेत. नाशिकच्या आयटीआयमध्ये प्लंबिंग लॅब सुरू करण्यात यावी. सध्याच्या अभ्यासक्रमात काळानुरूप बदल होणे अपेक्षित आहे. प्लंबरसाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग, गॅस पाईपलाइन, सोलर वॉटर लाईन, अग्निसुरक्षा ही क्षेत्रे विकसित होत आहेत असे त्यांनी सांगितले. धक्कादायक म्हणजे नाशिकमधील अनेक शासकीय इमारतीत रेन हार्वेस्टिंग यंत्रणा नसल्याचे त्यांनी नमूद केले. संस्थेचे सचिव श्रीहरी गांगल यांनी सूत्रसंचालन केले तर वैभव जोशी यांनी आभार मानले. कार्यक्रमाला सभासद, निमंत्रित मान्यवर व पर्यावरणदक्ष नागरिक उपस्थित होते.



### या जलरक्षकांचा झाला सन्मान!

राज्यभरात जलरक्षणाचे अखंड कार्य करणाऱ्यांना गौरविण्यात आले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विवेक पंडित (धुळे), रविंद्र पुनसे (वर्धा), विजय शिनगारे (बीड), रतन बिजेवार (नागपूर), नाना महाजन (जळगाव), बन्सीलाल शेठ (सातारा), प्राचार्य मुकुंद शिंदे (अहिल्यानगर), ललित भुतडा (सिन्नर) आणि नंदकिशोर जोगळेकर (नाशिक) यांना भेटवस्तू, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. विशेष म्हणजे नाशिक महापालिकेतील कर्मचारी भारती चिंचोलीकर (व्हॉल्व्ह मन) व दत्ता जाधव (भूमिगत गटार योजना) यांचाही सन्मान करण्यात आला.

# चेन्नई क्रिकेट दौऱ्यासाठी नाशिकचा साहिल पारख महाराष्ट्राचा कर्णधार





**नाशिक ।** आंतरराष्ट्रीय क्रिकेट मधील पदार्पणाच्या मालिकेत झंझावाती शतक झळकावलेल्या नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनचा युवा खेळाडू ,आक्रमक डावखुरा सलामीवीर साहिल पारख याची, १९ वर्षांखालील वयोगटातील महाराष्ट्र संघाच्या चेन्नई दौऱ्यासाठी कर्णधारपदी निवड झाली आहे. त्यासह नाशिकचा अष्टपैलू डावखुरा समकित सुराणा याचा देखील संघात समावेश करण्यात आला आहे.

## अष्टपैलू समकित सुराणा देखील संघात

महाराष्ट्राच्या १९ वर्षांखालील संघाच्या सराव सामन्यांसाठी महाराष्ट्र संघ चेन्नई येथे जाणार आहे. या सराव क्रिकेट दौऱ्यासाठी महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदी साहिल पारख याची निवड करणात आली आहे. १८ खेळाडूंचा १९ वर्षांखालील महाराष्ट्र संघ चेन्नई येथे चार दिवसीय सामने खेळणार आहे. नाशिकचा खेळाडू भारतीय संघात असावा हे सर्व नाशिककरांचे स्वप्न साहिल पारख साकार करत सप्टेंबर २०२४ मध्ये ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत आक्रमक डावखुरा सलामीवीर साहिल पारखने १९ वर्षांखालील भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करतांना, आपल्या लौकिकास साजेशी फलंदाजी करत, केवळ ७५ चेंडूत नाबाद १०९ धावा फटकावत, भारतीय संघाला केवळ २२ षटकांतच ९ गडी राखून जोरदार विजय मिळवून दिला होता. त्यानंतर मागील २०२४-२५ च्या हंगामात साहिल पारख याची बीसीसीआयच्या विनू मंकड स्पर्धे साठी, १९ वर्षांखालील वयोगटातील महाराष्ट्र संघाच्या उपकर्णधारपदी निवड झाली होती .साहिल पारख ६ मे ते १६ मे दरम्यान झालेल्या भारतीय क्रिकेट नियामक मंडळ - बीसीसीआय - तर्फे आयोजित नॅशनल क्रिकेट अकादमी - एन सी ए - च्या बेंगळुरू येथे झालेल्या इंटर सेंटर ऑफ एक्सलन्स स्पर्धेत निवडला गेला होता. भारतभरातील उदयोन्मुख युवा खेळाडूंसाठी बीसीसीआयच्या एन सी ए, बेंगळुरू तर्फे आयोजित राष्ट्रीय पातळीवरील शिबीरात साहिलची गेल्या सलग ३-४ वर्षांपासून निवड होत आहे. वेळोवेळी झालेल्या राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धेत केलेल्या लक्षणीय कामगिरीच्या जोरावरच १९ वर्षांखालील महाराष्ट्राच्या संघाच्या कर्णधारपदी निवड झाली आहे. नाशिकचा डावखुरा समकित सुराणा हा उदयोन्मुख अष्टपैलू खेळाडू असून नुकत्याच संपलेल्या हंगामात १९ वर्षांखालील नाशिक जिल्हा क्रिकेट संघाचे कर्णधार पद भूषवताना राज्यस्तरीय आमंत्रितांच्या क्रिकेट (एम.सी.ए. इन्विटेशन लीग)स्पर्धेत फलंदाजी व डावखुरी फिरकी गोलंदाजीत जोरदार कामगिरी केली होती. वेळोवेळी झालेल्या राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धेत केलेल्या लक्षणीय कामगिरीच्या जोरावरच या दोन नाशिककर खेळाडूंची १९ वर्षांखालील महाराष्ट्राच्या संघाच्या चेन्नई दौऱ्यासाठी निवड झाली आहे. साहिल व समकितच्या या निवडीबद्दल नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेचे चेअरमन विनोद शहा, सेक्रेटरी समीर रकटे यांनी दोघांचे अभिनंदन करून स्पर्धेतील यशस्वी कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# कोणाला वजन वाढवायचे आहे?

सणासुदीच्या या काळात वाढत्या वजनावर नियंत्रण ठेवण्यासाठी काय करावे, हे अनेकजण सांगतात. मात्र काही महिलांना कमी वजनाची समस्या असते. काहीही आणि कितीही खाल्ले तरी वजनच वाढत नाही, ही त्यांची तक्रार असते. खूप कमी वजनाचे तोटे त्यांना सहन करावे लागतात. अशा वेळी वजन वाढण्यासाठी काय करावे, हे आज पाहू या.

निरोगी राहण्यासाठी आणि वजन वाढवण्यासाठी लोक सहसा काजू, बदाम आणि अक्रोड खातात. परंतु खजूर हा यासाठीचा उत्तम सुकामेवा असून त्याच्या सेवनाने आरोग्याला प्रचंड फायदे होतात खेरीज सकाळी दुधासोबत घेतल्यास वजनवाढीच्या दृष्टीनेही अनेक लाभ बघायला मिळतात. खजूर अनेक पोषक तत्त्वांनी परिपूर्ण आहे. आयुर्वेदातही खजूरांचा उल्लेख आहे. खजूर शरीर मजबूत बनवण्याचे काम करतो असे हे शास्त्र सांगते. म्हणूनच दूध आणि खजूर आहारात समाविष्ट केले तर चांगले परिणाम दिसतात.

**स्टे फिट ||**

तुम्ही वजन वाढवण्याचा विचार करत असाल तर दुधात भिजवलेले खजूर खाल्ल्याने चांगले परिणाम मिळतील. दररोज सकाळी रिकाम्या पोटी खजूर खाणे खूप फायदेशीर मानले जाते. दूध आणि खजूर या दोन्हीमध्ये प्रथिने आढळतात, जे वजन वाढवण्यास मदत करतात. तुम्हाला १५ दिवस ते एक महिन्याच्या आत परिणाम दिसतो. म्हणूनच हा उपाय अवश्य करुन बघा.



* दूध आणि खजूर एकत्र खाल्ले तर हाडे मजबूत होतील. यासोबतच स्नायूंचे दुखणेही कमी होईल. थोडक्यात हाडांशी संबंधित आजारांचा धोका कमी होईल. तुम्ही दररोज रात्री दुधात खजूर भिजवून सकाळी ते खाऊ शकता. आवडत असल्यास सकाळी दुधामध्ये खजूर उकळून घ्या आणि थंड झाल्यावर खा.

* रोज सकाळी रिकाम्या पोटी दुधात भिजवलेले खजूर खाल्ल्याने कामाचा उत्साह वाढतो. अमिनो ॲसिडने समृद्ध असल्याने हे परिणाम बघायला मिळतात. स्वाभाविकच तुमचे शरीर तंदुरुस्त राहते.

* दूध आणि खजूर हे दोन्ही घटक पचनसंस्था मजबूत करण्याचे काम करतात. म्हणूनच ते रोजच्या आहारात समाविष्ट केले तर बद्धकोष्ठता, आम्लता आणि गॅसची समस्या दूर होतात.

* खजूर हा लोहाचा चांगला स्रोत आहे. हिमोग्लोबिन वाढवण्यासोबतच याच्या सेवनाने शरीरातील अस्वास्थ्य देखील दूर होते. म्हणूनच तुम्हाला अशक्तपणा असेल तर आहारात खजूराचा समावेश करायला हवा. दररोज सकाळी रिकाम्या पोटी खजूर खाल्ले तर तुम्हाला दिवसभर ऊर्जावान वाटते आणि वजन वाढण्यासही मदत होईल.

* खजूर हा व्हिटॅमिन डी आणि व्हिटॅमिन सीचा चांगला स्रोत आहे. याच्या सेवनाने त्वचा निरोगी राहते. सुरकुत्या आणि बारीक रेषा दूर होतात.

# अस्मिता

## वैभवीची वैभवगाथा

**वैभवी मर्चंटने सहाय्यक नृत्य दिग्दर्शक म्हणून कारकिर्दीला सुरुवात केली. १९९९ मध्ये आलेल्या 'हम दिल दे चुके सनम'ने तिला बॉलिवूडमध्ये ओळख मिळवून दिली. या चित्रपटातील आधी उल्लेख केलेल्या गाण्यासाठी कोरिओग्राफर म्हणून तिला पहिला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्यावेळी ती फक्त २१ वर्षांची होती. त्या अजाण वयात आपल्याला या पुरस्काराचे खरे महत्त्व समजले नव्हते... असे आज ती स्वत: स्पष्ट करते.**

अलिकडेच राष्ट्रीय पुरस्कार जिंकणाऱ्या कोरिओग्राफर वैभवी मर्चंटने पुन्हा एकदा आपली क्षमता सिद्ध केली आणि सर्वांच्या तोंडी तिचे नाव आलेले आपण पाहिले. बॉलिवूडची प्रसिद्ध कोरिओग्राफर म्हणून आता तिच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे. अर्थातच हे यश तिच्या कठोर परिश्रम आणि समर्पणाचे प्रतीक म्हणायला हवे.

'हम दिल दे चुके सनम' या गाजलेल्या चित्रपटातील 'ढोली तारो ढोल बाजे' या गाण्यासाठी वैभवी मर्चंटने वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी प्रथम राष्ट्रीय पुरस्कार जिंकला होता. आता अलिकडेच तिला 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' मधील 'धिंडोरा बाजे रे' साठी सर्वोत्कृष्ट कोरिओग्राफरचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. हे गाणे युट्यूबवर ३५ दशलक्षाहून अधिक वेळा पाहिले गेले आहे. तेव्हा आज या मानिनीविषयी जाणून घेऊ या.

वैभवी मर्चंटने सहाय्यक नृत्य दिग्दर्शक म्हणून कारकिर्दीला सुरुवात केली. १९९९ मध्ये आलेल्या 'हम दिल दे चुके सनम'ने तिला बॉलिवूडमध्ये ओळख मिळवून दिली. या चित्रपटातील आधी उल्लेख केलेल्या गाण्यासाठी कोरिओग्राफर म्हणून तिला पहिला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्यावेळी ती फक्त २१ वर्षांची होती. त्या अजाण वयात आपल्याला या पुरस्काराचे खरे महत्त्व समजले नव्हते... असे आज ती स्वत: स्पष्ट करते.

**मानिनी ||**

या पहिल्या राष्ट्रीय पुरस्कारानंतर अलिकडेच तिला पुन्हा एकदा हा सन्मान मिळाला. 'धिंडोरा बाजे रे' हे सुपरहिट गाणे, त्याची कोरिओग्राफी प्रेक्षकांना भलतीच आवडली. यूट्यूबवर हे गाणे खूप लोकप्रिय झाले. त्यानेच वैभवीला 'बॉलिवूडमधील सर्वात प्रतिष्ठित कोरिओग्राफरपैकी एक' अशी नवी ओळख मिळवून दिली. आजपावेतो तिने 'लगान', 'देवदास', 'धूम', 'वीरझारा', 'स्वदेश', 'बंटी और बबली', 'रंग दे बसंती', 'क्रिश', 'रब ने बना दी जोडी', 'दिल्ली ६', 'डॉन २', 'जब तक है जान', 'बँड बाजा बारात', 'दबंग ३', 'टायगर जिंदा है', 'टायगर ३' आणि 'जवान' यासारख्या सुपरहिट चित्रपटांचे नृत्यदिग्दर्शन केले आहे. तेव्हा तिच्या कामाचे कौतुक करावे तितके कमी पडेल.

वैभवी मर्चंट ही चेन्नईची रहिवासी असून ती नृत्यदिग्दर्शनातील महान व्यक्तिमत्व असणाऱ्या बी. हिरालाल यांची नात आहे. तिची बहीण श्रुती मर्चंट देखील प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक आहे. थोडक्यात तिचे कुटुंबच नृत्यदिग्दर्शन आणि चित्रपट जगताशी संबंधित आहे. त्यामुळे वैभवीची कारकीर्दही येथे घडली, यात नवल वाटण्याजोगे काही नाही. वैभवीने प्रचंड मेहनतीतून, कलेतून स्वत:ला सिद्ध केले आहे. आज ती आपल्या क्षेत्रात धडाडीने पुढे येत आहे. अशा या गुणी महिलेला, तिच्या प्रतिभेला राष्ट्रीय पुरस्कारासारखी मोठी मान्यता मिळणे हा योग्य सन्मान म्हणायला हवा.



# जेवल्यानंतर काय टाळावं?



जेवल्यानंतर केलेल्या काही चुकांमुळे आपलं आरोग्य बिघडू शकतं. काही गोष्टींमुळे आपलं वजनही वाढू शकतं. आरोग्य उत्तम राखण्यासाठी जेवणानंतर काय टाळायला हवं याविषयी...

▶ जेवल्यानंतर कधीही लगेच आंघोळ करू नये. जेवल्यानंतर लगेच आंघोळ केल्यामुळे पचनसंस्थेचं कार्य बिघडतं. अन्नपचन नीट होत नाही. आंघोळ केल्यानंतर रक्तसंचार पोटाशिवाय शरीराच्या इतर भागांकडे जातो. त्यामुळे जेवणानंतर किमान दोन तास आंघोळ करू नये.

**डाएट अँड न्यूट्रिशन ||**

▶ चहामुळेही पचनकार्यात अडचणी येतात. चहामध्ये आम्ल असतं. या आम्लामुळे पचनसंस्थेत अडथळे निर्माण होतात. जेवणातल्या प्रथिनांमुळे आम्ल कठीण होतं. यामुळे पचनात अडथळे निर्माण होतात. तसंच चहामुळे शरीर अन्नातलं लोह शोषून घेऊ शकत नाही. त्यामुळे जेवल्यानंतर लगेच चहा-कॉफी पिऊ नये.

▶ बरेचजण जेवल्यानंतर चालायला जातात. यामुळे अन्नपचन अधिक चांगल्या प्रकारे होतं, असा अनेकांचा समज असतो. पण प्रत्यक्षात जेवणानंतर कोणतीही शारीरिक हालचाल करू नये. यामुळे अन्नपचनात अडचणी येतात तसंच ॲसिड रिफ्लक्सची समस्या निर्माण होते.

▶ जेवल्यानंतर थंड पाणी पिणं टाळावं. जेवल्यानंतर थंड पाणी प्यायल्यामुळे पचनात अडचणी निर्माण होतात. थंड पाण्यामुळे शरीर पोषक कण शोषून घेऊ शकत नाही. यामुळे शरीराला बराच त्रास होतो.

# खोटं बोलणं कसं सोडू?

**रसगंधा ||**

मी ३३ वर्षांची महिला आहे. मला खोटं बोलायची सवय आहे. वैयक्तिक तसंच व्यावसायिक आयुष्यातही मी खोट्याचा आधार घेते. माझं खोटं अनेकदा पकडलं गेलं आहे. मी स्वत:ला वाचवण्यासाठीच प्रत्येक वेळी खोटं बोलते असं नाही तर काही वेळा अजाणतेपणीही माझ्या तोंडून खोटं बाहेर पडतं. खोटं बोलण्याच्या सवयीमुळे माझ्या आयुष्यात बऱ्याच समस्या निर्माण होतात. सहकारी, मित्रमैत्रिणी, नातेवाईक माझ्यापासून चार हात लांब रहातात. मला ही सवय सोडायची आहे. मी काय करू?

– मैत्रिणी, खोटं बोलण्याची सवय वाईट आहे, यात शंका नाही. ही सवय सोडण्यासाठी खूप प्रयत्न करणं गरजेचं आहे. सर्वात आधी खोटं बोलण्याच्या कारणांचा शोध घे. तू कोणत्या प्रसंगांमध्ये खोटं बोलतेस हे जाणून घे. खोटं बोलण्याची ही सवय चुकीची असल्याची जाणीव तुला झाली आहे ही मोठी बाब आहे. खोटं बोलण्याची सवय सोडण्यात समुपदेशकांचीही मदत होऊ शकते. खोटं बोलण्याची सवय सोडवण्यासाठी टप्प्याटप्प्याने पुढे जा. ही सवय हळूहळू सोड. जवळच्या माणसाशी खोटं बोलणं कमी कर. कामाच्या ठिकाणी खोटं बोलणं टाळ. एखाद्या जवळच्या व्यक्तीला विश्वासात घे. या परिस्थितीतून बाहेर पडताना त्यांची मदत होऊशकेल.



# मिळवा नो मेक अप लूक



छान दिसण्यासाठी प्रत्येक वेळी मेक अप करायलाच पाहिजे असं नाही. 'नो मेक अप लूक'मध्येही छान दिसू शकता. पण तुम्हाला हा लूक नीट कॅरी करता येणं गरजेचं आहे. अगदी सौम्य आणि मोजका मेक अप करूनही तुम्ही छान दिसू शकता. मध्यंतरी करिना कपूरचा नो मेक अप लूक चांगलाच गाजला होता. यामध्ये मेक अप तर असतो. पण तो अगदी सौम्य प्रमाणात... तो कसा कॅरी करायचा याबद्दल काही टिप्स...

**ब्युटी टॉक ||**

- त्वचा चमकदार दिसण्यासाठी नियमितपणे मॉईश्चरायझर लावा. न लावल्यास त्वचा कोरडी दिसू शकते. यामुळे चेहऱ्यावरचा मेक अप कोरडा दिसू शकतो. त्वचा खूपच कोरडी असेल तर हेवी मॉईश्चरायझरचा वापर करा. हे मॉईश्चरायझर नाक, गाल अशा अधिक कोरड्या पडणाऱ्या भागावर लावा. त्वचा तेलकट असल्यास जेल बेस्ड क्रीमचा वापर करता येईल.
- मॉईश्चरायझर लावल्यानंतर प्रायमर लावा. यामुळे मेक अप चेहऱ्यावर नीट बसतो. बऱ्याच काळपर्यंत राहतो. नीट ब्लेंडही होतो.
- नैसर्गिक लूक हवा असल्यास कंसीलर लावणं गरजेचं आहे. स्कीन टोन समान करायचा असेल तर येलो टोन्ड कंसीलरचा वापर करावा. डोळ्यांच्या खाली तसंच ओठांलगत, नाकाजवळ कंसीलर लावता येईल. चेहऱ्याच्या इतर भागावरही कंसीलर लावा.
- कंसीलरनंतर फाउंडेशन लावा. त्वचेच्या रंगाशी मिळतंजुळतं फाउंडेशन निवडा. फाउंडेशन ब्लेंड करण्यासाठी ब्युटी ब्लेंडर वापरा. मानेवरही फाउंडेशन लावा.
- त्वचा ताजी, टवटवीत दिसण्यासाठी गालांवर ब्लश लावा. ब्लशचा रंग त्वचेशी मिळताजुळता हवा. नाक, हनुवटी आणि कपाळावरही ब्लश लावल्यामुळे गालांना छान उभारी येते.
- डोळ्यांचं सौंदर्य खुलवण्यासाठी न्यूड आयलायनरचा वापर करा. कृत्रिम पापण्याही लावता येतील.

# स्टायलिश कुर्ता विथ साडी

फॅशनेबल कपडे म्हटले की पाश्चिमात्य, ट्रेंडी भारतीय पेहरावांचा विचार मनात येतो. पण साडी खूप फॅन्सी आहे. ही साडी तुम्ही वेगवेगळ्या पद्धतींनी कॅरी करू शकता. त्यावरचे आकर्षक ब्लाउज खूप सुंदर दिसतात. वेगवेगळ्या नेक स्टाईलचे ब्लाउज कॅरी करता येतात. साडीवर जॅकेट घालता येतं, बेल्टही लावता येतो. इतकंच नाही, तर कुर्ताही साडीसोबत पेअर करता येतो. सध्या कुर्ता विथ साडी ही संकल्पना लोकप्रिय ठरत आहे. अनेक बॉलिवूड सेलेब्ज साडीसोबत कुर्ता कॅरी करत आहेत.

**स्टाईल स्टेटमेंट ||**

कुर्ता, साडी हे कॉम्बिनेशन कसं करायचं जाणून घेऊ



1. तुमच्याकडची एखादी शॉर्ट कुर्ती साडीसोबत घालता येईल. कुर्ती आणि साडीचा रंग पूरक हवा. स्टँडिंग कॉलरवाली साडी असेल तर कुर्तीसोबत छान दिसेल. साडीसोबत हा कुर्ता कॅरी करा.
2. नी लेंग्थ कुर्ताही साडीसोबत घालता येईल. कुर्ता आणि साडी एकमेकाना साजेशी असायला हवी. कुर्ता आणि साडी मिक्स मॅचही करता येईल.
3. अंगरखा स्टाईल कुर्ता आणि साडी हे कॉम्बिनेशनही हिट आहे. कॉंट्रास्ट मॅचिंगचा फंडा वापरता येईल. फ्लोर लेंग्थ अंगरखा स्टाईल कुर्ता आणि साडी सुंदर दिसेल.

तुमच्याकडचे कुर्ते फक्त लेगिंग्ज, चुडीदार, इतर बॉटम्सवर घालायची गरज नाही. साडीसोबत त्यांची जोडी जमवता येईल.

# लागवड उपयुक्त वनस्पतींची

मैत्रिणींनो, कढीपत्ता असो, कोथिंबिर असो किंवा मग पुदीना... यामुळे पदार्थांची लज्जत अनेकपटींनी वाढते. भाजी किंवा आमटीला कढीपत्त्याचा तडका द्यायचा असतो. आमटीतकोथिंबिर घातली की चव वाढते. अशा वेळी या घटकांची लागवड घरीच केली तर.. तुमच्या घरातली छोटी बाल्कनी असो, गच्ची असो किंवा स्वंपाकघरातल्या खिडकीबाहेरची छोटी जागा असो, पुदीना, कोथिंबिर, कढीपत्ता यांची लागवड अगदी सहज करता येईल.

कढीपत्ता, कोथिंबिर, पुदिन्याच्या रोपट्यांना भरपूर सूर्यप्रकाश लागातो. त्यामुळे उजेड असणाऱ्या जागेची निवड करा. प्लास्टिकचे कंटेनर्स, पुठ्ठ्याचे खोके, कुंड्या यापैकी काहीही घ्या. कंटेनर्स, खोके किंवा कुंडीच्या तळाची भोकं पाडा. पाण्याचा निचरा होणं गरजेचं आहे. प्लास्टिकच्या बाटल्या, दूध किंवा फळाच्या रसांचे बॉक्स यामध्येही या वनस्पतींची लागवड करता येईल. कुंड्या किंवा कंटेनर्सच्या खाली एखादा ट्रे ठेवा. यात गळकं पाणी, कचरा जमा होईल.

**परसबाग ||**

या वनस्पतींच्या लागवडीसाठी घरगुती माती आणि खताचा वापर करता येईल. बागेतली माती ५० टक्के आणि घरी तयार केलेलं कंपोस्ट खत ५० टक्के असं साहित्य घ्या. ही माती आणि खत कुंडीत भरा. घरातल्या ओल्या कचऱ्यापासून छान खत तयार होईल. यानंतर वनस्पतींची लागवड करा. गरजेनुसार पाणी घाला. यामुळे कोथिंबिर, कढीपत्ता, पुदीना आणण्यासाठी वारंवार बाजारात जावं लागणार नाही. तसंच घरच्या खाण्यात रसायनविरहित वनस्पती वापरता येतील.



# यम्मी फ्रेंच हॉट चॉकलेट



**ब्युटी टॉक ||**

***साहित्य:*** अर्धा कप गरम पाणी, तीन कप दूध, डार्क चॉकलेट, कॅडबरी, साखर, व्हिप्ड क्रीम आणि मार्शमॅलो

थंडीत गरमागरम पेयं प्यावीशी वाटतात. सूप, चहा, कॉफी यांचं सेवन केलं जातं. मात्र काही तरी वेगळं ट्राय करायचं असेल तर फ्रेंच हॉट चॉकलेट करून बघा. रात्री जेवण झाल्यावर किंवा संध्याकाळी चहाऐवजी या हॉट चॉकलेटचा आनंद लुटता येईल. लहान मुलांसोबतच मोठ्यांनाही हॉट चॉकलेट खूप आवडेल.

**कृती**: डार्क आणि कॅडबरी चॉकलेटचे तुकडे करून घ्या. हे चॉकलेट वितळवून घ्यायचं आहे. यासाठी एका पातेल्यात पाणी गरम करा. पाणी उकळल्यावर पातेल्यावर झाकण ठेवा. त्यावर चॉकलेटचे तुकडे असणारं भांडं ठेवा. यात थोडं गरम पाणी घाला आणि चॉकलेट वितळेपर्यंत थांबा. काही वेळात चॉकलेट वितळून जाईल. आता या वितळलेल्या चॉकलेटमध्ये दूध आणि साखर घाला. नीट हलवून घ्या. हॉट चॉकलेट तयार आहे. हे हॉट चॉकलेट एका कपमध्ये ओता. त्यात व्हिप्ड क्रीम किंवा मार्शमॅलो घाला. मस्तपैकी प्या. गप्पा मारता मारता हॉट चॉकलेटचा आनंद घेणं हा खूप छान अनुभव ठरू शकतो.

**हेअर केअर**

## लसणाने घालवा कोंडा

केसांमध्ये कोंडा होणं ही सर्वसामान्य समस्या बनली आहे. या कोंड्यामुळे केस गळतात, डोकं खाजू लागतं. कोंडा घालवणारी अनेक उत्पादनं बाजारात उपलब्ध आहेत. विविध प्रकारचे शँपू, तेलं कोंड्यावर प्रभावी उपाय ठरत असल्याचे दावे केले जातात. हे शँपू, तेलं वापरण्यासोबतच काही घरगुती, नैसर्गिक उपायांमुळेही कोंड्याची समस्या दूर होऊ शकते. लसणाचा पॅक बनवून तुम्ही केसांमधला कोंडा घालवू शकता. यासाठी सहा ते सात लसूण पाकळ्या घ्या. एक चमचा मध घ्या. लसूण किसून रस काढून घ्या. त्यात चमचाभर मध घाला. ही पेस्ट स्काल्पवर लावा. साधारण २० मिनिटांनी केस शँपूने धुवून टाका. हा उपाय आठवड्यातून दोन वेळा करा.



**स्कीन केअर**

## तंत्र डायमंड फेशियलचं



चेहरा चमकदार दिसण्यासाठी बरेच प्रयत्न केले जातात. डायमंड फेशियलमुळे चेहरा उजळ आणि चमकदार दिसतो. मात्र यासाठी डायमंड फेशियलचं तंत्र आत्मसात करणं गरजेचं आहे. तुम्ही घरच्या घरी डायमंड फेशियल करू शकता. त्यात विविध वस्तू असतात. डायमंड क्लींजरमुळे चेहरा स्वच्छ होतो. चेहरा स्वच्छ केल्यानंतर स्क्रबचा वापर करायचा असतो. डायमंड मसाज जेलने चेहऱ्याचा मसाज करायचा असतो. यानंतर डायमंड मसाज क्रीमने मसाज करावा. सर्वात शेवटी डायमंड फेस पॅक लावावा. वाळल्यावर धुवून टाकावा. यामुळे चेहरा चमकदार दिसेल.

**स्मार्ट शॉपिंग**

## खरेदी हिऱ्याच्या दागिन्यांची

लग्नप्रसंगी हिऱ्याचे दागिने घेतले जातात. मात्र हे दागिने घेताना नीट लक्ष द्यायला हवं. अन्यथा, फसवणूक होण्याची शक्यता असते. हिऱ्याचे दागिने सेलमध्ये घेऊनका. सवलतीत मिळणाऱ्या दागिन्यांमधले हिरे बनावटही असू शकतात तसंच कमी दर्जाचे हिरे दिले जाऊ शकतात. हिऱ्याची खरेदी करण्याआधी बजेट ठरवा. अन्यथा, हिऱ्यांची खरेदी महाग पडू शकते. हिऱ्याच्या दागिन्यांचा विमा करून घ्या. हिऱ्याच्या आकारानुसार त्याची किंमत ठरते. त्यामुळे याबाबत माहिती करून घ्या. लहान आकाराच्या हिऱ्याची किंमत मोठ्या हिऱ्याच्या तुलनेत कमी असते. हिऱ्याचा आकार सारखा असला तरी त्याचं वजन कमी-जास्त असू शकतं. या सगळ्या बाबींचा विचार करून मगच हिऱ्याच्या दागिन्यांची खरेदी करा.



**किचन टिप्स**

## अशी स्वच्छ करा किचन चिमणी

आजकाल स्वयंपाक करताना निर्माण होणाऱ्या धुराचा त्रास होऊ नये, म्हणून चिमण्या बसवल्या जातात. मात्र या चिमण्यांची नीट काळजी घेतली नाही, स्वच्छता राखली नाही तर आग लागू शकते. त्यामुळे घरात चिमणी बसवली असेल तर तिची खास देखभाल करायला हवी. बॅफल फिल्टरवाल्या चिमण्या दर दोन ते तीन महिन्यांनी बदला तसंच स्वच्छही करा. किचन चिमण्या सर्फ आणि पाण्याने स्वच्छ होतीलच असं नाही. त्यामुळे कॉस्टीक सोडा किंवा सोडियम हायड्रॉक्साइडचा वापर करा.





# ट्रम्प टॅरिफमुळे सेन्सेक्स 705 अंकांनी कोसळला
## गुंतवणूकदारांचे 4 लाख कोटींचे नुकसान

**सेन्सेक्स 80,080**
**निफ्टी 24,500**

**मुंबई, दि. २८ प्रतिनिधी**

ट्रम्प टॅरिफ लादल्यामुळे गुरुवारी २८ ऑगस्ट रोजी भारतीय शेअर बाजार मोठ्या घसरणीसह उघडले. दिवसभर निफ्टी आणि सेन्सेक्सवर विक्रीचे वर्चस्व राहिले. अमेरिकेतून भारतातून आयातीवर अतिरिक्त २५% टॅरिफ लादल्याने गुंतवणूकदार चिंतेत आहेत. बाजार तज्ज्ञांचे म्हणणे आहे की यामुळे अल्पावधीत बाजारांवर दबाव राहू शकतो.

सेन्सेक्स ३० अंकांनी घसरून ८०,७५४ वर उघडला. त्यानंतर घसरण आणखी वाढली. ट्रेडिंग दरम्यान तो ८०,०१३ अंकांवर घसरला. शेवटी ७०५.९७ अंकांनी घसरून ८०,०८० वर बंद झाला. त्याचप्रमाणे राष्ट्रीय शेअर बाजार (एनएसई) निफ्टी देखील २४,६९५ अंकांनी घसरणीसह उघडला. दिवसभरात तो २४,४८१ अंकांवर घसरला. अखेर निफ्टी २११.१५ अंकांनी घसरून २४,५०० वर बंद झाला.

मंगळवारी निफ्टी आणि सेन्सेक्स दोन्हीही जवळपास १% घसरले, ही तीन महिन्यांतील एका दिवसातील सर्वात मोठी घसरण होती. बुधवारी स्थानिक सुट्टीमुळे देशांतर्गत बाजार बंद होते. नवीनतम घसरणीसह,दोन व्यवहार सत्रांमध्ये बाजार जवळजवळ २ टक्क्यांनी घसरले आहेत. बाजारातील मोठ्या घसरणीमुळे गुंतवणूकदारांना ४ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान झाले आहे. मंगळवारी (२६ ऑगस्ट) बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल ४४९,९५,०६८ कोटी रुपये होते. ते गुरूवारी ४,४५,४३,४५३ कोटी रुपयांवर पोहोचले. अशाप्रकारे गुंतवणूकदारांना ४५१,६१५ कोटी रुपये नुकसान झाले. सेन्सेक्स कंपन्यांमध्ये एचसीएल टेकच्या शेअरमध्ये सर्वात मोठी घसरण झाली. शेअर जवळजवळ ३ टक्क्यांनी घसरला. इन्फोसिस, सन फार्मा, पॉवर ग्रिड, टीसीएस, एचडीएफसी बँक, हिंदुस्तान युनिलिव्हर हे शेअर्स सर्वाधिक घसरले.दुसरीकडे, टायटन, एल अँड टी, मारुती, अ‍ॅक्सिस बँक आणि रिलायन्स हे शेअर्स वधारले. क्षेत्रीय आघाडीवर सर्व क्षेत्रांमध्ये विक्री नोंदवली गेली. निफ्टी रिअल्टीमध्ये १.२६ टक्क्यांची सर्वात मोठी घसरण झाली. निफ्टी फार्मा, निफ्टी फायनान्शियल सर्व्हिसेस, निफ्टी मेटल आणि निफ्टी पीएसयू बँक देखील घसरले. टॅरिफच्या चिंता आणि कंपन्यांच्या जून तिमाहीच्या मंद निकालांच्या पार्श्वभूमीवर परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी ऑगस्टमध्ये आतापर्यंत २.६६ अब्ज डॉलर्सचे भारतीय शेअर्स विकले आहेत. फेब्रुवारीनंतर परदेशी गुंतवणूकदारांनी केलेली ही सर्वात मोठी विक्री आहे.

# अटारी- वाघा बॉर्डर जलमय
## पाकिस्तानच्या पंजाबमध्ये 2 लाख लोक बेघर

**अटारी, दि. २८ वृत्तसंस्था**



भारतासह पाकिस्तानच्या पंजाबपर्यंत पावसामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. अटारी-वाघा बॉर्डर पूर्णपणे पाण्याखाली आहे, ज्यामुळे सुरक्षेची चिंता वाढली आहे. भारतातील गुरुदासपूर, पठाणकोट आणि तरनतारन सारख्या जिल्ह्यांपासून ते पाकिस्तानच्या पंजाब प्रांतापर्यंत, नद्यांना पूर आला आहे. धुसी धरण फुटल्यामुळे आणि करतारपूर कॉरिडॉरभोवती पाणी साचल्याने अनेक गावं पाण्याखाली गेली आहेत.

दोन्ही बाजूंचे हजारो लोक बेघर झाले आहेत आणि त्यांना मदत छावण्यांमध्ये आश्रय घेण्यास सांगितलं जात आहे. मान्सूनच्या पावसामुळे भारत आणि पाकिस्तानच्या दोन्ही बाजूंची परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. वाघा बॉर्डरवरील फोटोंमध्ये, संपूर्ण परिसर पाण्यात बुडालेला दिसत आहे, ज्यामुळे सुरक्षा यंत्रणांचीही चिंता वाढली आहे. पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे.

पंजाबमधील गुरुदासपूर जिल्ह्यातील सीमावर्ती भागात रावी नदीच्या जलप्रवाहामुळे डेरा बाबा नानक येथील श्री करतारपूर कॉरिडॉर दर्शन स्थळ येथे बांधलेलं धुसी धरण फुटलं. त्यानंतर संपूर्ण परिसरात पाणी शिरलं आणि अनेक गावं पाण्याखाली गेली. धुसी धरण फुटल्यामुळे हजारो एकर शेतजमीनही पाण्याखाली गेली आहे. डेरा बाबा नानक शहरातील घरं पाण्याखाली गेली आहेत आणि लोक प्रशासनाकडे मदतीची याचना करत आहेत. विध्वंसाची स्थिती स्पष्टपणे दिसून येत आहे.

पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातही कमी-अधिक प्रमाणात अशीच परिस्थिती आहे. वृत्तसंस्था एपीच्या वृत्तानुसार, २,१०,००० हून अधिक लोक विस्थापित झाले आहेत. तिथे पुरामुळे गावं पाण्याखाली जात आहेत आणि पावसामुळे जलद वाहणारं पाणी भारतीय बॉर्डरकडे येत आहे, ज्यामुळे सीमेलगतच्या भागांची परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. करतारपूर कॉरिडॉरच्या पुलाखालून जलद प्रवाहात वाहणारे पाणी दोन्ही बाजूंच्या लोकांसाठी धोक्याचं आहे.

# फसवणुकीच्या जाळ्यात अडकले राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष?

**नागपूर, दि. २८ प्रतिनिधी**

नागपूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला हादरवणारी घटना उघडकीस आली आहे. शहराध्यक्ष दुनेश्वर पेठे यांच्या नावाशी संबंधित तब्बल २३ लाखांच्या फसवणुकीचे प्रकरण समोर आले आहे. या घटनेमुळे केवळ राजकीय वर्तुळच नव्हे, तर नागपूरच्या सामान्य जनतेतही एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पेठे यांच्या खात्यातील शेअर परस्पर अन्य खात्यात ट्रान्सफर करण्यात आले. या अत्यंत शक्कली पद्धतीने रचलेल्या कारस्थानामुळे मोठ्या रकमेचा गैरव्यवहार झाला. प्राथमिक तपासात ही फसवणूक आर्थिक व्यवहारांशी निगडित असून, यामध्ये काही संगणक प्रणालींचा दुरुपयोग झाल्याचेही संकेत पोलिसांना मिळाले आहेत.

या प्रकरणी नंदनवन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, नंदन ओमप्रकाश गोस्वामी याच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू असून या प्रकरणात अजून किती लोक सामील आहेत, याचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

दुनेश्वर पेठे यांची राजकीय प्रतिमा आणि पक्षातील स्थान लक्षात घेता या फसवणुकीच्या घटनेला वेगळेच राजकीय वळण लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. एवढ्या मोठ्या रकमेची फसवणूक नेमकी कशी घडली? यामागे अजून कोणते सुतराम गुंतेले आहेत? हे तपासातूनच स्पष्ट होणार आहे.

सध्या मात्र नागपूरच्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात एकच चर्चा सुरू आहे "राष्ट्रवादीच्या नेत्याला जाळ्यात ओढणाऱ्या फसवणूक करणाऱ्यांची खरी ताकद कोणाची?"

# भारतावर अणुबॉम्ब टाका, ट्रम्प यांची हत्या करा...
## तरुणीचा विद्यार्थ्यांवर गोळीबार; रायफलवर आक्षेपार्ह वाक्य


**वॉशिंग्टन, दि.२८ वृत्तसंस्था**

अमेरिकेतील राजकीय अभ्यासक लॉरा लूमर यांनी बुधवारी मिनेसोटा कॅथोलिक शाळेत गोळीबार करणाऱ्या २३ वर्षीय तरुणीची छायाचित्रे शेअर केली आहेत. शेअर केलेल्या छायाचित्रांमध्ये सामूहिक गोळीबारात वापरल्या गेलेल्या शस्त्रांवर 'माशाल्लाह', 'न्यूक इंडिया' (भारतावर अणुबॉम्ब टाका), 'किल ट्रम्प' आणि 'इस्रायल मस्ट फॉल' असे लिहिलेले दिसत आहे.

रॉबिन वेस्टमन नावाच्या या आरोपी तरुणीने अ‍ॅन्युन्सिएशन कॅथोलिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांवर काचेच्या खिडक्यांमधून गोळीबार केला. यामध्ये दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू आणि १७ जण जखमी झाले होते. विद्यार्थ्यांवर गोळीबार केल्यानंतर या तरुणीनेही आत्महत्या केली. ही आरोपी तरुणी या शाळेची माजी विद्यार्थिनी होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गंभीर जखमींपैकी १४ मुले ६ ते १५ वयोगटातील आहेत, जी सर्व वाचतील अशी अपेक्षा आहे. यासह जखमींमध्ये तीन वृद्धांचा समावेश आहे.

"मिनेसोटात गोळीबार करणाऱ्या तरुणीने



तिच्या बंदुकीवर माशाल्लाह आणि न्यूक इंडिया लिहिले होते. याचबरोबर इस्रायल मस्ट फॉल असेही लिहिले होते. ही तरुणी भारतविरोधी आणि यहुदीविरोधी इस्लामिक प्रचाराने प्रभावित होती हे स्पष्टपणे दिसत आहे. इल्हान ओमरच्या जिल्ह्यात राहणाऱ्या या तरुणीने कॅथोलिक लोकांना मारताना पाहणे खरोखर धक्कादायक नाही. हे रेड-ग्रीन युतीचे आणखी एक उदाहरण आहे", असे लॉरा लूमर यांनी एक्सवरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे. यावेळी त्यांनी सामूहिक हत्याकांडात वापरल्या गेलेल्या शस्त्रांची छायाचित्रेही शेअर केली आहेत.

# पाकिस्तानचे तीन दहशतवादी नेपाळमार्गे बिहारमध्ये शिरल्याचा संशय, पोलिसांकडून स्केच प्रसिद्ध

**पाटणा, दि. २८ वृत्तसंस्था**

बिहार पोलीस मुख्यालयाने गुरुवारी राज्यभरात हायअलर्ट जाहीर केला. पाकिस्तानमधील दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदशी संबंधित असलेले तीन अतिरेकी राज्यात शिरल्याची गुप्तवार्ता मिळाल्यानंतर बिहार पोलिसांनी खबरदारीचे उपाय म्हणून हा इशारा दिला आहे. बिहार पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयितांची ओळख पटली असून त्यांनी अतिरेक्यांचे स्केचही सार्वजनिक केले आहे.



हसनैन अली (रावलपिंडी, पाकिस्तान) आदिल हुसैन (उमरकोट, पाकिस्तान) मोहम्मद उस्मान (बहावलपूर, पाकिस्तान)

पोलिसांच्या माहितीनुसार, रावळपिंडीमधील हसनैन अली, उमरकोट येथील आदिल हुसेन आणि बहावलपूर येथील मोहम्मद उस्मान अशी तीन अतिरेक्यांची नावे आहेत. गुप्तचर विभागाच्या माहितीनुसार, ते ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात काठमांडूला पोहोचले होते. मागच्या आठवड्यात त्यांनी बिहारमध्ये प्रवेश केला.

पोलिसांनी राज्याच्या सीमेवरील जिल्ह्या पोलिसांनी संशयित अतिरेक्यांच्या पासपोर्टशी संबंधित तपशील शेअर केले आहेत. तसेच सुरक्षा यंत्रणांना गस्त वाढविण्याचे आणि गुप्त सूचना गोळा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्याच्या गुप्तचर विभागांना प्रत्येक संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवून त्यावर आवश्यक ती कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

बिहारमध्ये ऑपरेशन सिंदूरनंतर आणि आगामी विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम लक्षात घेता भारत-नेपाळ सीमाभाग आणि सीमांचल जिल्ह्यांवर सुरक्षा वाढविण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. मधुबनी, सीतामढी, सुपौल, अररिया, पूर्व आणि पश्चिम चंपारण जिल्ह्यांसह सीमावर्ती भागात गस्त वाढविण्यात आली आहे.

बिहार आणि नेपाल यांच्यात ७२९ किमींची विस्तीर्ण अशी सीमा आहे. घुसखोरी आणि सीमेपलीकडून होणाऱ्या हालचालींसाठी बिहार हे एक प्रमुख केंद्र बनले आहे. राज्यातील सात जिल्ह्ये खुल्या सीमेवर वसलेले आहेत. त्यामुळे या भागात सतत देखरेख आणि सुरक्षा पुरविण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर असते.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'अरण्य' चित्रपटाचे पोस्टर अनावरण

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मराठी चित्रपट 'अरण्य'च्या पोस्टरचे नुकतेच अनावरण करण्यात आले. अमोल दिगांबर करंबे लिखित व दिग्दर्शित हा चित्रपट सामाजिक वास्तवावर प्रकाश टाकणारी प्रभावी कहाणी प्रेक्षकांसमोर आणणार आहे. 'अरण्य' हा चित्रपट १९ सप्टेंबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीला चित्रपटगृहांत येणार आहे.



सामान्य कुटुंबातील एका बापाची आणि त्याच्या मुलीच्या पार्श्वभूमीवर आधारित या चित्रपटात एका नक्षलवाद्याच्या आयुष्यातील मानवी पैलू आणि त्याचे आपल्या लहान मुलीशी असलेले नाते प्रभावीपणे मांडण्यात आले आहे.

**सिनेरंग**

एस. एस. स्टुडिओ निर्मित आणि एक्सपो प्रेसेंट या चित्रपटाची निर्मिती शरद पाटील आणि अंजली पाटील यांनी केली असून, 'तुझ्यात जीव रंगला' या मालिकेचे फेम हार्दिक जोशी या चित्रपटात प्रमुख भूमिकेत झळकणार आहेत. त्यांच्यासोबत हितीका पाटील, वीणा जगताप, विजय निकम, सुरेश विश्वकर्मा, अमोल खापरे आणि चेतन चावडा यांच्याही भूमिका आहेत. आदिवासी लोककलेवर आधारित संगीत या चित्रपटाची खासियत असून, प्रेक्षकांना अस्सलपणा सोबत सिनेमॅटिक अनुभव देखील देईल.यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "सिनेमात परिवर्तनाची कथा सांगण्याची ताकद आहे. 'अरण्य' हा अशा लोकांचा प्रवास दाखवतो, ज्यांनी हिंसेऐवजी शिक्षण आणि शांततेचा मार्ग स्वीकारला. हा चित्रपट प्रेक्षकांवर नक्कीच प्रभाव टाकेल, असा मला विश्वास आहे. यांची 'एक तिकीट, एक वृक्ष ' लावायची ही संकल्पना मला विशेष भावली."

# "लास्ट स्टॉप खांदा" चित्रपटातून उलगडणार प्रत्येकाच्या प्रेमाची गोष्ट




आयुष्याचा प्रवास सुरु झाला की प्रत्येकाला प्रेमाच्या स्टॉप वर थांबावंसं वाटतंच , काहीजणं थांबतात , काहीजणं रमतात , काहीजणं भेटतात . प्रवास पुढे चालू राहतो पण त्या स्टॉप वरचं रेंगाळण मनात साठून राहतंच . अशीच प्रत्येकाच्या प्रेमाची गोष्ट असलेला "लास्ट स्टॉप खांदा" हा संगीतमय चित्रपट २१ नोव्हेंबर रोजी प्रदर्शित होत आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर लॉन्च करण्यात आले आहे.

शिवम फिल्म क्रिएशन सिग्नेचर ट्यून्स, स्नेहा प्रॉडक्शन्स यांनी "लास्ट स्टॉप खांदा"... प्रत्येकाच्या प्रेमाची गोष्ट या चित्रपटाची निर्मिती केली आहे. सचिन कदम आणि सचिन जाधव यांनी या चित्रपटाती प्रस्तुती केली आहे. प्रदिप मनोहर जाधव हे या चित्रपटाचे निर्माते असून सचिन कदम, अमृता सचिन जाधव सहनिर्माते आहेत. श्रमेश बेटकर लिखित या चित्रपटाचं दिग्दर्शन विनीत परुळेकर यांनी केलं आहे. चित्रपटात अभिनेता श्रमेश बेटकर अभिनेत्री जुईली टेमकर, निखिल बने, मंदार मांडवकर, शशिकांत केरकर, सुदेश जाधव, महेश करपेकर, प्रियांका हांडे, डॉ. सचिन वामनराव, गणेश गुरव, निशांत जाधव, गिरीश तेंडुलकर, जयश्री गोविंद अशी तगडी स्टारकास्ट आहे. प्रेमाच्या नात्याचा वेध आजवर अनेक चित्रपटांमधून घेतला गेला आहे. तरीही प्रेम या संकल्पनेच्या नवनव्या गोष्टी चित्रपटांतून मांडल्या जातात. "लास्ट स्टॉप खांदा..." प्रत्येकाच्या प्रेमाची गोष्ट या चित्रपटातूनही अशीच एक नावीन्यपूर्ण कहाणी मांडण्यात आली आहे. या गोष्टीला श्रवणीय संगीताचीही साथ आहे. चित्रपटातून एक तरुण आणि त्याच्या प्रेमाची गोष्ट उलगडणार असून प्रत्येकाला रीलेट होईल अशीच ही गोष्ट आहेत्यामुळे संपूर्ण कुटुंबाचं मनोरंजन करणारा हा चित्रपट पाहण्यासाठी आता २१ नोव्हेंबरपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे.

**लोकरंजन**

# 'वडापाव'मध्ये दिसणार गोड कुटुंबाची तिखट लव्हस्टोरी




वडापाव म्हटलं की जिभेला पाणी सुटतं. वडा जसा तिखट-चुरचुरीत असतो तसंच नात्यांमध्येही गोडवा आणि तिखटपणा असला तरच ती नाती खरी रंगतदार होतात. अगदी हाच अनुभव देणारा कौटुंबिक चित्रपट 'वडापाव' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकताच या चित्रपटाचा धमाल टीझर सोशल मीडियावर प्रदर्शित झाला असून टीझरवरून हा चित्रपट एक गोड कुटुंबाची तिखट लव्हस्टोरी असणार हे स्पष्ट होतंय. ही रुचकर पाककृती प्रसाद ओक प्रेक्षकांसाठी घेऊन येत आहेत. विशेष म्हणजे हा चित्रपट प्रसाद ओक यांच्या अभिनय कारकिर्दीतील शंभरावा चित्रपट असल्यामुळे ते पहिल्यांदाच एकाच वेळी दिग्दर्शक आणि अभिनेते अशा दुहेरी भूमिकेत झळकणार आहेत. त्यामुळे हा प्रवास अधिकच संस्मरणीय ठरणार आहे.

टीझर अत्यंत सुटसुटीत आहे. धमाल मनोरंजन आणि कौटुंबिक मूल्यांचा संगम असलेली ही कथा प्रेक्षकांसाठी खास मेजवानी ठरणार आहे. या चित्रपटात प्रसाद ओक, अभिनय बेर्डे, गौरी नलावडे, रसिका वेंगुर्लेकर, शाल्व किंजवडेकर, रितिका श्रोत्री, समीर शिरवाडकर, सिद्धार्थ साळवी, अश्विनी देवळे-किन्हीकर आणि सविता प्रभुणे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. एबी इंटरनॅशनल फिल्म्स एलएलपी, मर्ज एक्सआर स्टुडिओ, व्हिक्टर मुव्हीज लिमिटेड आणि अमेय विनोद खोपकर एंटरटेनमेंट आणि मोहसीन खान प्रस्तुत, सिनेमॅटिक किडा बॅनर अंतर्गत, प्रसाद ओक दिग्दर्शित या चित्रपटाचे अमित बस्नेत, प्रजय कामत, स्वाती खोपकर आणि निनाद नंदकुमार बत्तीन निर्माते आहेत. तर सहनिर्माते तबरेझ एम. पटेल आणि सानीस खाकुरेल असून संजय मेमाणे हे चित्रपटाचे छाया दिग्दर्शक आहेत. तर सिद्धार्थ साळवी यांनी चित्रपटाचं लेखन केले आहे.

# तेजश्री प्रधान आणि शिवानी सोनारने व्यक्त केला गणपती आगमनाचा उत्साह !



वीण दोघातली ही तुटेना' मालिकेतील स्वानंदी म्हणजेच अभिनेत्री तेजश्री प्रधान हिने ह्यावर्षीचा गणेशोत्सव कसा आणि कुठे साजरा करणार याबद्दल सांगितले आमच्या घरचा गणपती हा फिरता असतो, या वर्षी माझ्या सख्या काकाच्या घरी म्हणजे गोरेगावला गणपती आहे आणि आम्ही सर्व तिकडे गणेशोत्सव साजरा करणार आहोत. म्हणजे मला लक्षात आहे कि माझा जन्म झाल्यापासून गणपती स्थापना प्रधानांच्या घरी होत असताना पहिली आहे. गणपती उत्सवात मला सर्वात जास्त मोदक आवडतात, डायट असो काही असो मोदक खाण टाळणं खूप अवघड आहे. मोदक आणि माझी वीण खूप घट्ट आहे.त्यामुळे मी उपाशी राहीन पण मोदक नक्की खाईन.''

'तारिणी' मालिकेतील तारिणी म्हणजेच अभिनेत्री शिवानी सोनार आपलं शूट संपवून पुण्याला पोहचली आहे. लग्नानंतरचा पहिला गणेशोत्सव साजरा करायला. शिवानीने आपल्या उत्साह व्यक्त करताना सांगितले- ३६५ दिवसांपैकी गणपती उत्सवाचे जे १० दिवस असतात ते माझ्यासाठी खूप खास असतात. या वर्षीचा गणेशोत्सव माझ्यासाठी खास आहे, कारण लग्नानंतरचा माझा हा पहिला गणेशोत्सव आहे. माझ्या माहेरी १० दिवसांचा गणपती असतो, पण माझ्या सासरी इतके वर्ष दीड दिवसाचा गणपती असायचा पण या वर्षांपासून माझ्या सासूबाईंनी ठरवले आहे कि आपण ५ दिवसांचा गणपती ठेवायचा. माहेरी आणि सासरी दोन्हींकडे गणपती असणार आहे तर तारांबळ उडणार आहे.''तेव्हा बघायला विसरू नका 'वीण दोघातली ही तुटेना' सोम- शनि संध्या ७:३० वा. आणि 'तारिणी' सोम- शुक्र ९:३० वा. सदैव तुमच्या झी मराठीवर.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# राजस्थानमध्ये महिलेने 55व्या वर्षी दिला 17व्या मुलाला जन्म

**उदयपूर, दि. २८ वृत्तसंस्था**

राजस्थानमध्ये एक दुर्मिळ घटना समोर आली आहे. एक ५५ वर्षांची महिला १७व्यांदा आई झाली आहे. राजस्थानच्या उदयपूर जिल्ह्यातल्या लिलावास गावात सदर महिला तिच्या कुटुंबासोबत राहते. रेखा कालबेलिया असे या महिलेचे नाव असून झडोल ब्लॉकच्या कम्युनिटी हेल्थ सेंटरमध्ये त्यांची प्रसूति झाली. हा प्रकार उघड झाल्यानंतर सर्वत्र त्यासंदर्भात चर्चा सुरू झाली आहे. विशेष म्हणजे ही आपली चौथी प्रसूति असल्याचं या महिलेनं डॉक्टरांना खोटं सांगितलं होतं. खरी बाब समजल्यानंतर डॉक्टरांनीदेखील महिलेच्या प्रकृतिसंदर्भात चिंताजनक स्थिती झाली असती, असं विधान केलं आहे. कावरा राम कालबेलिया यांच्या ५५ वर्षीय पत्नी रेखा कालबेलिया १७व्यांदा गर्भवती राहिल्या तेव्हाच त्यांच्याबाबत चर्चा सुरू झाली होती. याआधी रेखा यांनी १० मुले व ६ मुली झाल्या. यापैकी ४ मुले व एक मुलगी जन्मल्यानंतर काही दिवसांतच दगावली. नव्या प्रसूतिमध्ये या दाम्पत्याला मुलगा झाला असून आता त्यांना एकूण ७ मुले व पाच मुली आहेत.

या दाम्पत्याची दोन मुले व तीन मुलींची लग्नं झाली आहेत. खुद्द कावरा कालबेलिया यांनीच ही माहिती दिली. या विवाहित मुलांना प्रत्येकी दोन ते तीन मुले आहेत. त्यामुळे रेखा कालबेलिया १७व्यांदा गर्भवती राहण्याच्याही काही वर्षे आधीच त्या आज्जी झाल्या होत्या. त्यांच्या प्रसूतिच्या काही दिवस आधीच त्यांना आणखी एक नातू झाला होता. प्रसूतिनंतर त्यांचे नातूही त्यांना भेटायला आले होते!

### आरक्षणाच्या रणांगणात 'ती' मागणी फसली?
## शिंदे समितीचा अहवाल ठरला गेमचेंजर!

**मुंबई, दि. २८ प्रतिनिधी**

मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र मिळावे, यासाठी मनोज जरांगे-पाटील ठाम आहेत. मुंबईच्या आंदोलनाची हाक देत त्यांनी हैद्राबाद, मुंबई आणि सातारा गॅझेट लागू करण्याची मागणी पुढे केली. या गॅझेटमध्ये मराठा समाजाची कुणबी म्हणून नोंद असल्याचा त्यांचा दावा आहे.

मात्र, ही मागणीच निरर्थक असल्याचे वास्तव शिंदे समितीने उघड केले आहे. तत्कालीन गॅझेटमध्ये केवळ समाजगटांची आकडेवारी आहे, व्यक्तीगत माहिती नाही. त्यामुळे निव्वळ या कागदपत्रांच्या आधारे आरक्षण देता येणार नाही, असा स्पष्ट निष्कर्ष समितीने नोंदवला.

यासाठीच समितीने तेलंगणा दौरा करून हैद्राबाद गॅझेटची छाननी केली. हजारो कागदपत्रे तपासल्यानंतरही व्यक्तीनिहाय माहिती मिळाली नाही, असा अहवाल तयार झाला. दरम्यान, या तिन्ही गॅझेटचा सखोल अभ्यास सुरू असल्याची माहिती उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

सरकारने शिंदे समितीला सहा महिन्यांची मुदतवाढ दिली असून, अहवाल आल्यानंतरच अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. "गुंतागुंतीच्या या प्रक्रियेत अन्याय टाळायचा आहे," असे विखे पाटील म्हणाले.

आता सगळ्यांचे लक्ष एका मुद्द्यावर खिळले आहे की, जरांगे-पाटलांची मागणी राजकीय पातळीवर किती वजनदार ठरणार, आणि शिंदे समितीचा निष्कर्ष आरक्षणाच्या भवितव्याला कोणता वळण देणार?

# दुसऱ्या दिवशीही रेल्वे सेवा ठप्प; मुसळधार पावसाने लोहमार्ग दुरुस्तीला अडथळा

**उमरी, दि.२८ वृत्तसंस्था**

हैदराबाद विभागातील सिकंदराबाद–निजामाबाद दरम्यान मुसळधार पावसाचा फटका बसला असून, गुरुवारी (२८ ऑगस्ट) सलग दुसऱ्या दिवशी अनेक रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या. भिकनुर–तळमडला व अक्कणपेठ–मेडक लोहमार्गावर पाणी साचल्याने रुळाखालून पाणी गेले. बुधवारी सकाळपासून बंद असलेला मार्ग गुरुवारी सायंकाळपर्यंतही सुरळीत झाला नाही. त्यामुळे रेल्वे वाहतूक ठप्प झाली असून प्रवाशांचे हाल झाले.

भर पावसातही रेल्वे कर्मचारी दुरुस्तीचे काम सुरू ठेवत होते, मात्र संततधार पावसामुळे अडथळे निर्माण झाले. "पाऊस पूर्ण थांबून दुरुस्तीचे काम पूर्ण होईपर्यंत या मार्गावरील रेल्वे सेवा सुरू होणार नाही", असे रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

निजामाबाद–नांदेड सवारी गाडी, कृष्णा एक्सप्रेस, अजिंठा एक्सप्रेस, इंटरसिटी एक्सप्रेस, रायचूर एक्सप्रेस या गाड्याही गुरुवारी (दि.२८) रद्द झाल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले. ग्रामीण भागातून शहराकडे जाणाऱ्या अनेकांना प्रवास न करता परतावे लागले.

आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि मराठवाड्यात बुधवारी सुरू झालेला मुसळधार पाऊस गुरुवारीही कायम होता. त्यामुळे रेल्वे रुळाच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाले नसल्याने शुक्रवार (२९ ऑगस्ट) रोजीही काही रेल्वे रद्द राहणार असल्याचे रेल्वे विभागाने स्पष्ट केले आहे.

# भिन्न धर्मीयांमधील जमिनीच्या व्यवहारांना पोलिसांची परवानगी आवश्यक, आसाम सरकारच्या नव्या निर्णयाची चर्चा !

**गुवाहाटी, दि. २८ वृत्तसंस्था**

आसामचे मुख्यमंत्री हेमंत बिस्व सरमा यांनी नुकतीच एक मोठी घोषणा कली आहे. आसाममध्ये वेगवेगळ्या धर्माच्या व्यक्ती वा गटांमध्ये होणाऱ्या जमिनींच्या व्यवहारांसाठी आसाम पोलिसांचं ना हरकत प्रमाणपत्र सक्तीचं करण्यात आलं आहे. खुद्द हेमंत बिस्व सरमा यांनी प्रसारमाध्यमांना ही माहिती दिली आहे. राष्ट्रीय सुरक्षा व सामुदायिक सौहार्दाच्या दृष्टीने ही बाब आवश्यक असल्याचं त्यांनी नमूद केलं आहे. या पार्श्वभूमीवर या निर्णयाची फक्त आसाममध्येच नसून देशभरात चर्चा होऊ लागली आहे. अशा प्रकारे धर्माच्या आधारावर आर्थिक व्यवहारांमध्ये नियम लागू करता येऊ शकतात का? असा प्रश्नदेखील उपस्थित केला जाऊ लागला आहे.

मुख्यमंत्री हेमंत बिस्व सरमा यांनी गुरुवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बैठकीत घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांची माहिती त्यांनी दिली. त्यात जमिनीच्या व्यवहारांसंदर्भातील निर्णयाचाही समावेश होता. "आसामसारख्या संवेदनशील राज्यामध्ये दोन धर्मीयांमध्ये होणारे जमिनींचे व्यवहार अतिशय काळजीपूर्वक हाताळले जायला हवेत. त्यामुळे आता अशा सर्व व्यवहारांचे प्रस्ताव राज्य सरकारकडे येतील आणि सरकारच्या स्पेशल ब्रँचकडून त्यांची सखोल तपासणी केली जाईल", असं सरमा यांनी जाहीर केलं आहे.

आसामच्या मंत्रिमंडळाने जारी केलेल्या सूचनेनुसार, अशा जमीन व्यवहारांची तपासणी करण्यासाठी आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना लवकरच जारी केल्या जातील. कोणतीही स्थावर मालमत्ता जर अशा भिन्नधर्मीय व्यवहारांच्या केंद्रस्थानी असेल, तर अशा व्यवहारांची तपासणी या सूचनांच्या आधारे आसाम पोलिसांच्या स्पेशल ब्रँचकडून केली जाईल. या प्रक्रियेमुळे सामाजिक सलोखा बिघडण्यास कारणीभूत ठरणारे, फसवणूक होणारे किंवा बेकायदेशीर स्वरूपाचे व्यवहार टाळता येणं शक्य होईल. तसेच, राज्यघटनेतील समानतेच्या तत्वाला अनुसरून ही प्रक्रिया काम करेल, असंही या सूचनेमध्ये नमूद करण्यात आलं आहे.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219